पुणे, सोमवार, २१ ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 310 • वर्ष ३ रे, अंक ३१० • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS

महाराष्ट्र विधानसभा निवडणुक

## भाजपची ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर, फडणवीसांसह चंद्रकांत पाटील यांचा समावेश

# विद्यमान 'आमदारांवर'च महायुतीचा विश्वास!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीची जागावाटपाची बोलणी अद्याप नक्की झालेली नसताना, भाजपने पहिली यादी जाहीर केली आहे. विद्यमान आमदारांवर भाजपने विश्वास ठेवला असल्याचे ९९ उमेदवारांच्या पहिल्या यादीतून समोर येते. भाजपच्या पहिल्या यादीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह दिग्गज नेत्यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. भाजपने तब्बल ७१ विद्यमान आमदारांना पुन्हा उमेदवारी दिली आहे, तर केवळ ३ आमदारांना तिकिट नाकारले आहे.

पुण्यातील कोथरूड मतदार संघात चंद्रकांत पाटील यांची, शिवाजीनगर मध्ये सिद्धार्थ शिरोळे तर पर्वती मधून माधुरी मिसाळ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. तसेच काही जणांची तिकीट कापण्यात आले आहे. अनेक ठिकाणी विद्यमान आमदारांना संधी देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे भोकरमधून खासदार अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे. कल्याणमधून आमदार गणपत गायकवाड यांच्या » पान ७ वर

### भाजपच्या यादीत १३ महिला उमेदवार

• विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. अनेक नेत्यांच्या बैठकांवर बैठका सुरु आहेत. यातच आज विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाची ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. या यादीमध्ये अनेक विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा » पान ७ वर

### भाजप उमेदवार यादीतील वैशिष्ट्य

- एकूण उमेदवार जाहीर संख्या ९९
- महिला उमेदवार १३
- चंद्रशेखर बावनकुळे यांना मिळाले तिकीट
- अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया यांना तिकीट
- नितेश राणेंना कणकवली येथून उमेदवारी
- बहुतेक ठिकाणी विद्यमान आमदार कायम

### मुंबईतील तीन विद्यमानांना उमेदवारी नाही

• भाजपच्या ९९ उमेदवारांच्या पहिल्या यादीत मुंबईतील तीन विद्यमान आमदारांची उमेदवारी जाहीर झालेली नसल्याने त्यांच्या उमेदवारीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ११ विद्यमान आमदारांना पक्षाने पुन्हा उमेदवारी दिली आहे.

• भाजपच्या यादीत मुंबईतील १२ जणांचा समावेश आहे. यापैकी एक वगळता सर्व विद्यमान आमदार आहेत. पक्षाच्या पहिल्या यादीत सुनील राणे (बोरिवली), भारती लव्हेकर » पान ७ वर



“ मागील तीन वेळा पर्वती मतदारसंघातील मतदारांनी मला प्रचंड बहुमताने विजयी केले. यंदा पक्षाने पुन्हा एकदा माझ्यावर विश्वास दाखवला याबद्दल मी पक्षाची, महायुतीची ऋणी आहे. गेल्या पंधरा वर्षात पर्वती परिसरासाठी मी केलेल्या विकासकामांची साक्षीदार असलेले मतदार मला पुन्हा एकदा विधानसभेत प्रतिनिधित्व करण्याची संधी देतील, याची खात्री आहे.

**माधुरी मिसाळ, पर्वती मतदारसंघ, भाजप उमेदवार**



“ पुण्याच्या छत्रपती शिवाजीनगर मतदार संघातून मला पुन्हा एकदा उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल मी पक्षश्रेष्ठींचा मनापासून आभारी आहे. शिवाजीनगरच्या रहिवाश्यांचा आशीर्वाद व पाठींबा, तसेच गेल्या ५ वर्षात माझ्या कार्यसमुहाने दिलेल्या सातत्यपूर्ण सेवेमुळे मला शिवाजीनगर मतदार संघाचे मतदार पुन्हा एकदा आशीर्वाद देवून त्यांचे प्रतिनिधित्व करण्यास विधानसभेत पाठवतील असा मला विश्वास आहे. **— सिद्धार्थ शिरोळे, शिवाजीनगर मतदारसंघ, भाजप उमेदवार**

## दोघांचा बुडून मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पौड :** मुळशी तालुक्यात खांबोली येथे पर्यटनासाठी आलेल्या दोघांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ओजस आनंद कठापुरकर (वय २२, रा. प्राधिकरण निगडी, पुणे) आणि राज संभाजी पाटील (वय २२, रा. अमळनेर जळगाव) अशी दोन मृतांची नावे आहेत. ही घटना रविवारी (दि. २०) सकाळी ९.३० च्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, फर्ग्युसन कॉलेज येथे शिकणारे आदेश राजेंद्र भिडे, सुमेध सतीश जोशी, प्रशांत संभाजी आरगडे, तेजस्विनी साहेबराव पवार, निधी सत्यनारायण हळदंडकर, तृप्ती चंद्रकांत देशमुख, चैतन्या जयंत कांबळे, ओजस आनंद कठापुरकर आणि राज संभाजी पाटील हे नऊ जण दुचाकीवरून खांबोली तलावाजवळ फिरण्यासाठी रविवारी सकाळी आले होते. हे सर्व पाण्यात उतरले होते. यावेळी ओजस आणि राज गाळात अडकले, तर उर्वरित पाण्यातून बाहेर आले.

# महायुतीचा तिढा दोन दिवसांत सुटेल : शिंदे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई:** विधानसभा निवडणुकीत विजयी वाटचाल करण्याच्या दृष्टीने महायुतीने रणनीती आखली आहे. २८८ मतदार संघात उमेदवार निवडून आणण्यासाठी महायुतीने मोर्चेबांधणी केली आहे. जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला असून, ३०-३५ जागांचा तिढा दिल्ली दरबारी एक-दोन दिवसांत सुटेल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

जागा वाटपावर महायुतीची चर्चा सकारात्मक सुरू असून चर्चा अंतिम टप्प्यात आहे. सर्व जागांबाबत १-२ दिवसांत निर्णय होईल. ३०-३५ जागांवर निर्णय बाकी आहे. तो ही लवकरच होईल. राज्यात तो निर्णय सुटला नाही तर गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत एक बैठक होईल. त्यावर त्याविषयी तोडगा निघेल, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

विधानसभा निवडणुकीत विजयी होणारे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जागा वाटपाची चर्चा महायुतीत सुरू आहे. जागा » पान ७ वर

### मुख्यमंत्रीपदाचा चेहरा निकालानंतरच

• महायुतीच्या मुख्यमंत्रीपदाचा चेहरा निकालानंतरच ठरणार, यावर महायुतीच्या नेत्यांची दिल्लीत अमित शाहांसोबत झालेल्या बैठकीत निर्णय झाल्याची माहिती आहे. महायुतीतील जागा वाटपाचा तिढा आणि तदानुषंगिक मुद्यांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांची दिल्लीत अमित शाहांसोबत चर्चा झाली. मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण असावा, यावर मात्र निर्णय झालेला नाही. यासंदर्भात, महायुतीकडून कोणत्याही नेत्याचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून समोर केला जाणार नाही याची काळजी घेतली जावी, असे निर्देश अमित शाहांनी तिन्ही नेत्यांना दिले. तसेच निकालानंतर ज्याच्या जास्त जागा त्या पक्षाचा मुख्यमंत्री होण्याबाबतही एकमत झाल्याचे समजते.



## पुण्याला लवकरच ४ नव्या वंदे भारत

**पुणे :** पुण्याला लवकरच ४ नव्या वंदे भारत ट्रेन सोडण्यात येणार असल्याची माहिती आहे. पुणेकरांचा ट्रेनचा प्रवास जलद झाला आहे. पुण्यातून नुकत्याच काही दिवसांपूर्वी दोन वंदे भारत एक्सप्रेस झाल्या होत्या. आता पुणे ते कोल्हापूर, पुणे ते हुबळी तसेच मुंबई ते सोलापूर अशा ३ वंदे भारत रेल्वे गाड्या पुण्याला मिळाल्या आहेत. त्यातच अजून काही नव्या बंदे भारत गाड्यांची भर यात पडणार आहे त्यामुळे पुणेकरांचा प्रवास अधिक सुकर होणार आहे. पुणे ते शेगाव, पुणे ते बडोदा, पुणे ते सिकंदराबाद, पुणे ते बेळगाव या मार्गांवर वंदे भारत ट्रेन होणार सुरू होणार आहेत.

# घुसखोरीचा डाव उधळला दोन दहशतवादी जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर:** बारामुला जिल्ह्यातील उरी भागात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरू असून, पूंछ येथून दोन दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. भारतीय लष्कराच्या चिनार कॉर्प्सच्या अधिकृत सोशल मीडिया पोस्टनुसार, या भागात संयुक्त घुसखोरीविरोधी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

» दहशतवाद

संभाव्य घुसखोरीच्या गुप्तचर माहितीच्या आधारे, भारतीय लष्कर आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी नियंत्रण रेषेच्या उरी सामान्य भागात एक संयुक्त घुसखोरीविरोधी मोहीम सुरू केली. कर्तव्यावर असणाऱ्या जवानांनी संशयास्पद हालचाली शोधून त्यांना आव्हान दिले, परिणामी दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. तर जवानांनी गोळीबाराला प्रत्युत्तर दिले. जम्मू आणि काश्मीरचे अतिरिक्त पोलीस महासंचालक (एडीजीपी) आनंद जैन यांनी शनिवारी (दि.19) एएनआयला सांगितले की, अटकेमुळे अनेक ग्रेनेड हल्ल्याच्या प्रकरणांची उकल करण्यात मदत झाली आहे. ग्रेनेड फेकणे आणि देशविरोधी पोस्टर लावणे आणि गुरुद्वारा, मंदिरे, रुग्णालये आणि लष्कराच्या स्थानांवर ग्रेनेड फेकणे यासारख्या कारवाया करणाऱ्या दोन दहशतवाद्यांना आम्ही अटक केल्याने आम्हाला मोठे यश मिळाले आहे. जिथे दहशतवाद्यांचा उद्देश त्या भागातील जातीय सलोखा बिघडवणे हा होता. शुक्रवारी सुरक्षा दलांनी सुरनकोट सेक्टरमधील दुंडक भागात एका दहशतवाद्याशी संबंध असलेल्या एकाला अटक केली. संशयिताकडून चार ग्रेनेड जप्त करण्यात आले होते.

# आचारसंहितेतही मिळणार नागरिकांना आनंदाचा शिधा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभेची आचारसंहिता लागू झाल्याने रेशन दुकानातून आनंदाचा शिधा मिळणार का? असा संभ्रम नागरिकांमध्ये होता. मात्र, आंनदाच्या शिधाची पिशवी वगळून शिधामधील संपूर्ण रेशन कार्ड धारकांना मिळणार असल्याचे पुरवठा विभागाने सांगितले आहे. गणेश चतुर्थी निमित्त नागरिकांना या आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय शासनाने घेतला. परंतु प्रत्यक्षात गणेशोत्सव झाल्यानंतर आनंदाचा शिधा प्राप्त झाला. त्यामुळे या उत्सवाचा शिधा वाटप सुरू असतानाच मंगळवारी विधानसभेची आचारसंहिता लागू झाली.




पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे फोटो असलेल्या पिशवीमध्ये आनंदाचा शिधा वाटप केला जातो. त्यामुळे विधानससभेच्या निवडणुकीची आचारसंहिता सुरू असल्याने हा शिधा वाटप होईल का? असा संभ्रम नागरिकांमध्ये होता. परंतु, यावर पर्याय काढत त्या राजकीय पिशवीविनाच कार्डधारकांना शिधामधील साहित्य देण्यास काही हरकत नसल्याचे स्पष्टीकरण पुरवठा विभागाकडून देण्यात आले आहे. दोन महिन्यात ५ लाख २७ हजार ३४२ लाभार्थ्यांपैकी ३ लाख १७ हजार ७४३ लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला आहे. तर उवरींत २ लाख ९ हजार ५९९ लाभार्थ्यांना किट वाटपाची प्रक्रिया सुरू आहे.

## भीषण अपघातात ८ मुलांसह १२ ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राजस्थानमधील धौलपूर जिल्ह्यात शनिवारी (दि. १९) रात्री उशिरा आराम बस-टेम्पोमध्ये झालेल्या भीषण अपघातात १२ जण ठार झाले. मृतांमध्ये आठ मुलांचा समावेश आहे. या भीषण दुर्घटनेत दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बारी शहरातील करीम गुमट येथे राहणारे नहून आणि झहीर कुटुंबातील १४ जण एक कार्यक्रमानिमित्त नातेवाईकाच्या घरी गेले होते. रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास ते एका टेम्पोमध्ये घरी परतत होते. राष्ट्रीय महामार्ग-11 बी वरील सुन्नीपूर गावाजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या आराम बसने टेम्पोला धडक दिली. ही धडक एवढी भीषण होती की, टेम्पोचा चक्काचूर झाला. » पान ७ वर

## जल्लोष कोथरुडमध्ये...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**निर्धार:** कोथरुड भाजपने महायुतीचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटील यांना कोथरुडमधून पुन्हा एकदा उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर भाजपसह, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीतील सर्व घटक पक्षातील कार्यकर्त्यांनी जल्लोष करत नामदार पाटील यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## बिश्नोई टोळीच्या नावाने खंडणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची मुंबईत गोळ्या झाडून नुकतीच हत्या करण्यात आली. बिश्नोई टोळीने त्याची जबाबदारी स्वीकारली होती. तसेच, या प्रकरणात पुण्यातील वारजे परिसरातून एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. त्यामुळे पुणे शहरातही बिश्नोई टोळी सक्रिय असल्याचे दिसून येत आहे. यानंतर आता लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या नावाने शहरातील एका नामांकित सराफ व्यावसायिकाला ई-मेलद्वारे दहा कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार शनिवारी समोर आला आहे. हा ई-मेल दोन दिवसांपूर्वी पाठविण्यात आल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. » पान ७ वर

## मेट्रोचे ७० टक्के काम पूर्ण, मार्च महिन्यात ट्रेन धावणार

# हिंजवडीच्या आयटी कर्मचाऱ्यांना दिलासा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हिंजवडी ते शिवाजीनगरदरम्यान काम सुरू असलेल्या पुणेरी मेट्रोचे एकूण ७० टक्क्यांपेक्षा अधिक काम पूर्ण झाले असून, मार्च २०२५अखेर येथून मेट्रो ट्रेन धावणार आहे. त्यामुळे रोजच्या वाहतूक कोंडीने वैतागलेल्या आयटी आणि इतर कर्मचाऱ्यांना लवकरच दिलासा मिळणार आहे.

हिंजवडी भागात पुण्यातील सर्वाधिक मोठे औद्योगिक आणि आयटी क्षेत्र आहे. या भागात असंख्य कर्मचारी, अधिकारीवर्ग कामानिमित्त दररोज खासगी आणि कंपन्यांच्या वाहनाने (बस, कार) ये-जा करतात. मात्र, त्यांना दररोज येथील रस्त्यांवर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. येथील कोंडीने कर्मचारी आणि स्थानिक रहिवासी अक्षरश: वैतागलेले आहेत.


त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने येथील नागरिकांच्या सोयीसाठी मेट्रो सुरू करण्याचे काम सुरू आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हे काम सुरू आहे. ते कधीपर्यंत पूर्ण होईल आणि आमची रोजच्या वाहतूक कोंडीतून कधी सुटका होईल, असे या भागातील स्थानिक रहिवासी, आयटियन्स आणि चाकरमान्यांना पडले आहेत.

पुणेरी मेट्रोकडून आता हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोसाठी अत्याधुनिक थर्ड रेल सिस्टिमचा वापर करण्यात येणार आहे. या थर्ड रेल प्रणालीचा अवलंब केल्यामुळे हिंजवडी ते शिवाजीनगर या २३.३ किलोमीटरच्या मार्गावर मेट्रोला रुळांच्या शेजारून, खालून विद्युतपुरवठा केला जाईल. या संपूर्ण मार्गावर कुठेही » पान ७ वर

#रा

## झिशान सिद्दिकीचा मारेकऱ्यांना इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई:** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि माजी राज्यमंत्री बाबा सिद्दिकी यांची १२ ऑक्टोबर रोजी मुंबईत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. वांद्रे येथील निर्मल नगरमधील आमदार झिशान सिद्दिकी यांच्या कार्यालयाबाहेर बाबा सिद्दिकींवर गोळीबार करण्यात आला. या हल्ल्याची जबाबदारी बिश्नोई टोळीने घेतली आहे. या हत्या प्रकरणाचा पोलीस कसून तपास करत असून त्यांनी या हल्ल्यातील काही संशयित आरोपींना महाराष्ट्रासह देशाच्या वेगवेगळ्या भागातून अटक देखील केली आहे. » पान ७ वर

# मविआची सत्ता आली, तर ते योजना बंद करतील...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांची वीजबिल माफी, अशा अनेक योजनांना केंद्र सरकारचे सहकार्य मिळत आहे. त्यामुळेच हे डबल इंजन सरकार महाराष्ट्राच्या जनतेसाठी काम करीत आहे.महाविकास आघाडीची सत्ता चुकूनही राज्यात आली, तर ते आता सुरू असलेल्या योजना बंद करतील. केंद्र सरकार मदत करण्यासाठी तयार असले तरीदेखील ते मदत घेणार नाहीत आणि महाराष्ट्राचे अपरिमित नुकसान करतील, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केली.

बावनकुळे म्हणाले की, महायुतीमध्ये ९० टक्के जागांवर एकमत झाले आहे. केवळ दहा टक्के जागांवर एकमत बाकी आहे. तेदेखील लवकरच होईल. भाजप उमेदवारी देताना जातीचा विचार करत नाही. उमेदवार हा त्याच्या क्षमतेवर ठरतो. मतदारसंघातील जनतेचे मत काय आहे? तेथील कार्यकर्त्यांचे मत काय आहे? यावर बरेच काही अवलंबून असते. त्यामुळे समाज म्हणून कोणताही निर्णय घेण्यापेक्षा उमेदवाराच्या कर्तृत्वावर निर्णय केला » पान ७ वर

## दुर्लक्ष : प्रशासनाकडून अद्यापही टोलवाटोलवीच

# शहरातील सीसीटीव्ही बंद अवस्थेतच..

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहराच्या वेगवेगळ्या भागांतील सीसीटीव्ही बंद आहेत. त्यांच्या देखभाल दुरुस्तीचे काय? सीसीटीव्ही बसविल्यानंतर अडीच ते तीन वर्षे महापालिकेची जबाबदारी आणि त्यानंतर पोलिसांची अशी भूमिका घेत या प्रश्नाबाबत प्रशासनाकडून टोलवाटोलवी केली जात आहे.

प्रभात रस्ता परिसरात चंदनचोरी व दहशत पसरविण्याच्या घटनांसह महिलांवरील अत्याचार, जीवघेणे अपघात, जबरी चोरी, दरोडा यासारख्या गंभीर घटना शहरात घडत आहेत. महत्त्वाच्या ठिकाणी बसवलेले महापालिकेचे सीसीटीव्ही बंद असल्याने पुढील कारवाईला अडचणी येत आहेत. असे असतानाही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखभाल दुरुस्तीबाबत महापालिका प्रशासन गंभीर नसल्याचे वास्तव आहे.



### सीसीटीव्हीचे फायदे

- एखादी घटना घडल्यानंतर आरोपींचा माग काढणे सोपे होते. दहशतवादाची शहरावर छाया आहे. अशा परिस्थितीत संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे सोपे जाऊ शकते.
- शहरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. यासाठी व्यापारी, उद्योजकांची मदत घेण्यात आली होती. शहरातील चौकांमध्ये हे कॅमेरे बसवण्यात आले होते. शहरातील मुख्य बाजारपेठेतही कॅमेरे आहेत. सर्व प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा, उद्याने, मैदाने, शाळा, महाविद्यालये व महत्त्वाची स्थळे आदी ठिकाणी कॅमेरे असावेत.

पोर्शे कार अपघात प्रकरण, प्रभात रस्ता परिसरातील चंदनचोरी व दहशत पसरविणारी घटना, बोपदेव घाटासारखी महिलांवरील अत्याचाराची गंभीर घटना यासारख्या अनेक गंभीर घटना मागील काही महिन्यांत घडत आहेत. याबरोबरच रस्त्यांवरील अपघात, वाहनचोरी, जबरी चोरी, दरोडा, वर्दळीच्या ठिकाणी खून, खुनाचा प्रयत्न अशा या घटनांची संख्यादेखील लक्षणीय आहे.

या घटनांवरून शहरात सीसीटीव्हीची किती गरज आहे, हे अधोरेखित होते. दरम्यान, प्रभात रस्ता परिसरातील चंदनचोरी प्रकरणाच्या तपासावेळी तेथील महापालिकेचे सीसीटीव्ही बंद असल्याचा प्रकार उघडकीस आला. त्यावरून महापालिका प्रशासन नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत किती गंभीर आहे, हेदेखील उघड झाले.

शहराला मोठ्या प्रमाणात सीसीटीव्हींची आवश्यकता असतानाच दुसरीकडे उपलब्ध असलेल्या सीसीटीव्हींची देखभाल दुरुस्ती करण्याकडे दुर्लक्ष होत आहे. महापालिका व पोलिस प्रशासन याबाबत एकमेकांकडे टोलवाटोलवी करत असल्याचे यापूर्वी उघड झाले होते. मात्र महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी त्यावर पडदा टाकत गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तात्पुरता निधी देत मध्यवर्ती भागातील सीसीटीव्हींची देखभाल दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यास सांगितले होते.

त्यानुसार महापालिकेच्या विद्युत विभागाकडून शहराच्या मध्यवर्ती भागातील प्रमुख रस्त्यांवरील सीसीटीव्ही देखभाल दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र गणेशोत्सव, नवरात्रोत्सव झाल्यानंतर आणि दिवाळी सण तोंडावर आलेला असतानाही सीसीटीव्ही देखभाल दुरुस्तीचे काम अद्याप झाले नसल्याची सद्यःस्थिती आहे.

### सद्यःस्थिती अशी

- २२८९ - बसविलेले एकूण सीसीटीव्ही
- १५६२ - दुरुस्तीची मुदत संपलेले
- ८३७ - देखभाल दुरुस्ती झालेले
- ७२५ - देखभाल दुरुस्ती आवश्यक



> महापालिका आयुक्तांनी मध्यवर्ती भागातील सीसीटीव्ही देखभाल दुरुस्तीबाबत आदेश दिला होता. त्यानुसार बहुतांश ठिकाणी देखभाल दुरुस्ती झाली आहे. काही ठिकाणी तांत्रिक अडचणींमुळे उशीर होत आहे.
> **- मनीषा शेकटकर,** प्रमुख, विद्युत विभाग, महापालिका

---

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## तरुणीला 'मनोर्धेय' योजनेंतर्गत दिलासा

### पाच लाख रुपयांची नुकसान भरपाई

**कोंढवा :** बोपदेव घाटात सामुहिक अत्याचार करण्यात आलेल्या तरुणीला 'मनोर्धेय' योजनेंतर्गत पाच लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळणार आहे. भरपाई मिळण्याच्या अर्जास त्वरित मंजूर देत विधी सेवा प्राधिकरणाने तरुणीला दिलासा दिला आहे. अर्ज केल्यानंतर तो केवळ नऊ दिवसांत मंजूर करण्यात आला आहे. कोंढव्यातील टेबल पॉइंट परिसरात तीन ऑक्टोबरला रात्री तरुणीवर सामुहिक अत्याचार करण्यात आला होता. दरम्यान 'मनोधैर्य' योजनेंतर्गत नुकसान भरपाई मिळावी म्हणून तरुणीने प्राधिकरणात अर्ज केला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता प्राधिकरणाने त्वरित अर्जाची पडताळणी करत नुकसान भरपाई मंजूर केली आहे. यातील २५ टक्के रक्कम तरुणीला रोख स्वरूपात देण्यात येईल. तर ७५ टक्के रक्कम १० वर्षांसाठी तिच्या नावे बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात येईल. येणाऱ्या व्याजातून ती पुढील उपचार घेऊ शकते. दैनंदिन खर्च भागविण्यासाठी तिला यातून मदत होणार आहे.

> या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता मुलीला लवकरात लवकर नुकसान भरपाई देण्याला आमचे प्राधान्य होते. त्यामुळे कोणताही विलंब न करता प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनानुसार त्वरित अर्ज निकाली काढण्यात आला. तरुणीने ११ ऑक्टोबर अर्ज केला होता तो १९ ऑक्टोबरला निकाली काढण्यात आला. मनोर्धेयचे अर्ज तत्परतेने निकाली काढत झिरो पेंडन्सी तत्त्वावर प्राधिकरण कार्यरत आहे.
> **-सोनल पाटील,** सचिव, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

### काय आहे 'मनोधैर्य' योजना -

अत्याचार झालेले बालक किंवा महिलेचे पुनर्वसन करण्यासाठी 'मनोधैर्य' योजना आहे. प्राधिकरणाच्या माध्यमातून या योजनेची अंमलबजावणी होत असते. योजनेंतर्गत अत्याचारीत महिलेला ३० हजार रुपयापासून ते १० लाख रुपयापर्यंत भरपाई देण्यात येते. अत्याचारीत मुलगी किंवा महिलेला पुन्हा त्याच प्रकारच्या शोषणाला बळी पडावे लागू नये यासाठी तातडीने आधार व धैर्य देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

---





### श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकीच्या एनएसएसचा उपक्रम

## आकार 2.0 : ज्ञान, संघर्ष आणि यश मंत्रांचा संगम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वडगाव :** सिंहगड शिक्षण संस्था सांस्कृतिक केंद्रात 'आकार 2.0' या विशेष प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्रीमती काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) वतीने आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्याला योग्य दिशा आणि प्रेरणा देणे हा होता. यावेळी विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित मान्यवरांनी आपल्या संघर्षमय जीवनप्रवासातून मिळवलेले अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले आणि यशस्वी जीवनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले ज्याचा लाभ २००० हून अधिक विद्यार्थींनी घेतला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी या प्रसिद्ध समाजसेविका आणि अनाथांच्या माय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या ममताताई सपकाळ होत्या. आपल्या भाषणात त्यांनी समाजसेवेची महती सांगत विद्यार्थ्यांना सेवाभाव आणि समर्पणाचे महत्त्व पटवून दिले. आयुष्यात संघर्ष हा कायम असतो, परंतु त्याला तोंड देऊन समाजासाठी काहीतरी करणे हेच खरे समाधान देणारे आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले.

प्रसिद्ध यूट्यूबर, माधव पाटणकर, पत्रकार शिवानी पांढरे, पत्रकार राजेंद्र कापसे यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले.

'आकार 2.0' या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रेरणा मिळवून दिली. कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संजयकुमार पिंगट, प्रा. भूमी पाटील, प्रा. घनश्याम फिरमे व प्रा. भगवती गलांडे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. विभाग प्रमुख प्रा. डॉ. पूनम रासकर (इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार) व प्रा. रवींद्र बोऱ्हाडे (संगणक) तसेच प्रा. राजु येणारे(उपविभाग प्रमुख) यांचे सहकार्य लाभले.

### वरिष्ठांचे मार्गदर्शन

- सदर कार्यक्रमाला संस्थापक अध्यक्ष प्रा. एम. एन. नवले, संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले, संस्थेच्या उपाध्यक्षा रचना नवले अष्टेकर, उपाध्यक्ष रोहित नवले, प्राचार्य डॉ. अरविंद देशपांडे व उपप्राचार्य डॉ. के. आर. बोरोले आणि प्रा. आर. एच. बोऱ्हाडे यांचे मार्गदर्शनाखाली झाला.

---

### 'अग्निसुरक्षित गणेश मंडळांचा' मान

## पुण्यातील पाच मंडळांचा सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेशोत्सव पुण्यामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. राज्यासह परराज्यातून भाविक उत्सवाच्या कालावधीत शहरात येतात. मंडपाच्या परिसरात आग लागणे, तसेच एखादी दुर्घटना घडल्यास मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून उपाययोजनेच्या दृष्टीने जागरुकता निर्माण करण्यासाठी 'अग्निसुरक्षित गणेश मंडळ' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याच स्पर्धेत नवज्योत मित्र मंडळ, शनी मारुती बाल गणेश मित्र मंडळ, श्री आझाद मित्र मंडळ, आर १९ अड्रेनो कल्चरल कमिटी गणेश मंडळ अमेनोरा, पर्वती एकता मित्र मंडळ ट्रस्ट या पाच मंडळांना 'अग्निसुरक्षित गणेश मंडळांचा' मान मिळाला आहे.

श्रीमंत भाऊसाहेब रंगारी ट्रस्ट मंडळ यांना अग्री व सुरक्षा बाबतीत विशेष प्रेरणादायी गणेश मंडळ पुरस्कार प्रदान केला. काही मंडळांनी विशेष पुढाकार घेतल्याने त्यांना सन्मानित करण्यता आले. या मध्ये अखिल रामनगर मित्र मंडळ, कोकाटे तालीम मंडळ, डियेस्के विश्व गणेश मंडळ, नवरंग मित्र मंडळ हडपसर, शिवशक्ती मित्र मंडळ यांचा समावेश होता.



> गणेशोत्सव काळात दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सुद्धा गंभीर होत चालला आहे. अशा वेळी आग लागल्याची घटना घडल्यास मोठा अनर्थ होऊ शकतो. त्यामुळे उत्सवादरम्यान जर कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवली तर सरकारी यंत्रणांची मदत पोहोचेपर्यंत बचाव कार्य कसे करायचे ? याबाबत कार्यकर्ते प्रशिक्षित असणे आवश्यक आहे.
> **-अर्चना गव्हाणे** अध्यक्षा फएसएआय पुणे

> स्पर्धा पुण्यात भरविण्यात आलेली असतानादेखील याला भरगोस प्रतिसाद मिळाला. गणेश मंडळांतील कार्यकर्त्यांनी आपत्कालीन परिस्थिती कशी हातळायची याचे उत्स्फूर्तपणे प्रशिक्षण घेतले त्यामुळे भविष्यात समाजात काही अनुचित घटना घडल्यास हेच कार्यकर्ते प्रशासनास मदत करण्यास तत्पर असतील.
> **-संतोष गायके ,** पोलिस उपअधीक्षक

### १७० मंडळांनी घेतला सहभाग

- पुणे अग्निशमन दल, "फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया" (एफएसएआय), सिटी कॉर्पोरेशन ली. अमेनोरा यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १७० मंडळांनी सहभाग घेतला होता, त्यातील ४० मंडळे अंतिम फेरीत पोहचली व त्याचे परीक्षण होऊन त्यातील पाच विभागातील मंडळांना विजेते घोषित करण्यात आले. अमेनोरा फायर स्टेशन सभागृह येथे पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

---

## तब्बल ५ हजार २५३ कोटी मुद्रांक शुल्क जमा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहर, पिंपरी-चिंचवड या शहरी भागांबरोबरच मावळ, मुळशी आणि वेल्ह्यातील मालमत्ता नोंदणी वाढली आहे. परिणामी जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत पुण्यात १ लाख ३८ हजार ४१२ मालमत्तांची नोंदणी झाली आहे. त्यातून सरकारी तिजोरीत तब्बल ५ हजार २५३ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्कापोटी जमा झाले आहेत. पुण्यातील रिअल इस्टेट बाजारपेठ वेगाने वाढत आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा मालमत्ता नोंदणी २९ टक्क्यांनी वाढली असून, महसुलात ३८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. नागरिकांच्या उत्पन्नात झालेली वाढ, पतपुरवठ्याच्या विविध संधी, गुंतवणुकीकडे वाढलेला कल, यामुळे रिअल इस्टेटमधील गुंतवणूक वाढत असल्याचे नाईट फ्रँक इंडियाच्या अहवालात म्हटले आहे. सप्टेंबर महिन्यात शहरात ११ हजार ५६ मालमत्तांची नोंदणी झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत नोंदणीत ३३ टक्क्यांनी घट झाली आहे. तर, मुद्रांक शुल्काची रक्कमही १३ टक्क्यांनी घटून ५०८ कोटी रुपयांवर आली. सप्टेंबर महिन्यात श्राद्ध पंधरवडा असल्याने एकूण नोंदणी आणि महसुलावरही विपरित परिणाम झाला आहे.

---

### अभ्यासिकांचे फायर ऑडिट करा,

## युवा सेनेचा पालिकेला आंदोलनाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी पेठ :** शहरात अनेक इमारती, जुन्या वाड्यांमध्ये लहान मोठ्या अभ्यासिका सुरू आहेत. दिल्ली येथे अभ्यासिकेत पाणी घुसल्याने अनेक होतकरू तरुणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर शहरातील अभ्यासिकांच्या सुरक्षिततेबाबत उपाययोजना करणे अपेक्षित होते. मात्र, महापालिका प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले असून प्रत्येक अभ्यासिकेचे अग्निसुरक्षा लेखापरीक्षण (फायर ऑडिट) करण्याची मागणी करण्यात आली आहे. या बाबत महापालिकेने कार्यवाही न केल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला.



गांजवे चौक परिसरातील अभ्यासिकेला आग लागून अभ्यासिकेतील लॅपटॉप, पुस्तके, खुर्च्या आदी साहित्य जळून खाक झाले. या पार्श्वभूमीवर युवा सेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी महापालिका आयुक्तांना पत्र देऊन अभ्यासिकांच्या अग्निसुरक्षा लेखापरीक्षणाचा मुद्दा उपस्थित केला आहे.

शहरात सुरू असलेल्या अभ्यासिकांच्या माध्यमातून अनेकांनी व्यवसाय सुरू केला आहे. विद्यार्थ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या रकमेच्या तुलनेत त्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा या तुटपुंज्या आहेत. त्यामुळे प्रत्येक अभ्यासिकेचे अग्निसुरक्षा लेखापरीक्षण होणे गरजेचे आहे, असे यादव यांनी नमूद केले. तसेच महापालिका प्रशासनाने येत्या आठवड्यात शहरातील सर्व अभ्यासिकांचे अग्निसुरक्षा लेखापरीक्षण न केल्यास न केल्यास, विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या अभ्यासिका चालकांच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

### सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर

- स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अभ्यासिकेमध्ये अभ्यास करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचा जीव महत्त्वाचा आहे. विद्यार्थी राज्यातील विविध ठिकाणाहून स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी पुण्यात येतात. त्यांना सुरक्षित वातावरणात अभ्यास करण्याची सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

#रा

---

Selected

## प्रबोधनाचे काम मोरेश्वर जोशी यांनी केले : विद्यावाचस्पति डॉ शंकर अभ्यंकर



**पुणे :** "कीर्तन हे देवर्षी नारद यांनी प्रवर्तित केले असून त्यात म्हणजे कीर्तनात दहा कलांचा संगम असायला हवा. मुख्य म्हणजे कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाची पूर्तता होणे आवश्यक आहे आणि हे काम सद्गुरू मोरेश्वर जोशी चऱ्होलीकर महाराज हे गेली पन्नास वर्षे अव्याहतपणे करीत आहेत"असे गौरवोदगार काढून ते पुढे म्हणाले कीर्तनात आणि मोरेश्वर जोशी यांच्या व्यक्तिमत्वात दहा कलांचा संगम झाला आहे या कलांमध्ये काव्य, वाद्य, नृत्य, नाट्य, गायन, ताल, पाठांतर, वक्तृत्व, बहुश्रुतता आणि शिष्टाचार यांचा समावेश आहे .हे असेल तर समाज प्रबोधन करता येणे शक्य असून त्यांनी लोकसंग्रह देखील केला आहे. असे विद्यावाचस्पति व आदित्य प्रतिष्ठान प्रमुख डॉ शंकर अभ्यंकर यांनी काढले. बाल शिक्षण सभागृहात राष्ट्रीय कीर्तनकार सद्गुरू मोरेश्वर जोशी चऱ्होलीकर यांचा अमृत महोत्सवी सोहळा आणि कीर्तन क्षेत्रातील सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित कृतज्ञता सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते.

## शिवाजीनगरमध्ये होमी भाभा इस्पितळ सुरू करा : आप ची मागणी



**पुणे :** गेल्या पाच वर्षापासून बांधकाम सुरू असलेल्या मॉडेल कॉलनी शिवाजीनगर भागातील होमी भाभा प्रसुती गृह याचे काम तातडीने पूर्ण करावे या मागणीसाठी आज आप तर्फे आयुक्त व आरोग्य अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या वेळी तातडीच्या प्रसुती शस्त्रक्रिया विषयी अधिकारी गंभीर नसल्याने आप कार्यकर्त्यांशी त्यांचा वाद झाला. गेल्या पाच वर्षात सुरुवातीच्या काळात निधी नसल्यामुळे भवन विभागातर्फे दिले जाणारे बांधकाम रखडले होते आणि आता लिफ्टच्या जागेचे बांधकाम चुकीचे झालेले असल्यामुळे अजूनही लिफ्ट बसवली गेलेली नाही. आता लिफ्ट ही बांधकामाच्या मापाप्रमाणे तयार करून घेणे भाग पडणार आहे. भवन विभाग, विद्युत विभाग आणि आरोग्य विभाग यांच्यात समन्वय नसल्यामुळे अजूनही दोन मजले वापरात नाहीत. या दिरंगाई ला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे आम आदमी पार्टीचे मुकुंद किर्दत यांनी केली आहे. यावेळी सोबत आप चे सतीश यादव, अमोल मोरे, शंकर थोरात आदी उपस्थित होते.

## चित्रपट क्षेत्राला उद्योगाचा दर्जा मिळायला हवा : अभिनेता प्रसाद ओक



**पुणे :** 'आज फिल्म इंडस्ट्री विकसित झाली आहे तरी त्याला उद्योगाचा दर्जा मिळत नाही. ताण-तणाव विसरण्यासाठी उद्योजक आमचा उपयोग करून घेतात पण तरीही सिने क्षेत्राला उद्योगाचा दर्जा नाही. या क्षेत्रालाही व्यवसाय म्हणून पाहिले पाहिजे, असे मत अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक प्रसाद ओक यांनी व्यक्त केले. शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचा उपक्रम असलेल्या याज्ञवल्क्य उद्योजक विकास अभियान (युवा) च्या वर्धापनदिनानिमित्त टिळक स्मारक मंदिर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खासदार प्रा.डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी कॉसमॉस बँकेचे सचिन आपटे, सृजन आर्ट गॅलरीचे चारुहास पंडित, संस्थेचे कार्याध्यक्ष विश्राम कुलकर्णी व कार्यवाह श्रीकांत जोशी उपस्थित होते. सोहळ्यांतर्गत सृजन आर्ट गॅलरी पुरस्कृत सृजन युवा कलाकार पुरस्कार व स्व. चंद्रकांत जोशी स्मृतिप्रित्यर्थ युवा उद्योजक पुरस्कार अनुक्रमे अभिनेता, दिग्दर्शक व निर्माता प्रसाद ओक आणि सर्वत्र टेक्नॉलॉजीज प्रा. लि. चे संस्थापक, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मंदार आगाशे यांना प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

# ताणतणावांचे व्यवस्थापन शास्त्रोक्त पद्धतीने होणे आवश्यक : डॉ. मेधा खासगीवाले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** रोजच्या धकाधकीच्या जीवनात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच कोणत्या ना कोणत्या ताणाला सामोरे जावे लागते. अशावेळी त्या ताण-तणावांचे व्यवस्थापन आपण शास्त्रोक्त पद्धतीने केल्यास जीवन अधिक सुलभ पद्धतीने जगता येईल, असे मत प्रसिद्ध लेखिका डॉ. मेधा खासगीवाले यांनी व्यक्त केले.

साकेत प्रकाशनातर्फे प्रकाशित आणि प्रसिद्ध लेखिका कांचन दीक्षित लिखित 'माईंड अ‍ॅण्ड सेल्फ मॅनेजमेंट' आणि 'टाईम आणि सेल्फ मॅनेजमेंट' या दोन पुस्तकांचे प्रकाशन झाले, त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. मेधा खासगीवाले बोलत होत्या.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अ‍ॅण्ड अ‍ॅग्रीकल्चर सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर साकेत प्रकाशनच्या संचालिका प्रतिमा भांड, लेखिका कांचन दीक्षित आणि डॉ. जयंत बरीदे उपस्थित होते.

> "मन हे न दिसणारे परंतू आपल्या शरीराशी निगडीत महत्त्वाचा घटक आहे. अनेक शारीरिक आजारांचे मूळ आपल्या मानसिक स्थितीत आढळून येते. आपणच आपल्या मनाला प्रशिक्षीत करणे आणि त्याला प्रयत्नपूर्वक शिस्त लावणे आवश्यक आहे."
> — डॉ. मेधा खासगीवाले

## खडकवासला विधानसभा मतदारसंघ अजित पवार गटाला

# वडगांव शेरी भाजपच्या वाट्याला ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरातील बहुतांश जागांबाबत एकमत झाले असून सध्या खडकवासला विधानसभा मतदारसंघ आणि वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाबाबत चर्चा सुरू आहे. भाजपकडे असलेला खडकवासला विधानसभा मतदारसंघ हा अजित पवार गटाला तर अजित पवारांकडे असलेला वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघ भाजपच्या वाटेला येणार असल्याच्या चर्चा सध्या पुण्याच्या राजकीय वर्तुळात पाहायला मिळत आहेत. त्यामुळे एकीकडे वडगाव शेरीमधील भाजपमधील इच्छुकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. तर दुसरीकडे खडकवासला विधानसभा मतदारसंघात देखील अजित पवार गटातील इच्छुकांमध्ये प्रचंड उत्साह संचारलेला पाहायला मिळत आहे.



**चर्चांचे खल सुरू**

● वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघांमध्ये शरद पवार यांनी सभा घेऊन सुनील टिंगरे यांना थेट टार्गेट करत आव्हान दिले. अशा परिस्थितीत जर सुनील टिंगरे यांना उमेदवारी दिल्यास पोर्षे अपघात प्रकरणाचे विरोधी पक्ष भांडवल करू शकतो. याचा निगेटिव्ह इफेक्ट सबंध महाराष्ट्रात देखील होऊ शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे खडकवासला आणि वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघांमध्ये अदलाबदली होणार का? याबाबत चर्चांचे खल सुरू आहेत.

शहरातील आठ विधानसभा मतदारसंघांपैकी सहा मतदारसंघाचा जागा वाटपाचा तिढा सुटला आहे. कोथरूड, पर्वती, शिवाजीनगर, पुणे कॅन्टोन्मेंट, कसबा पेठ आणि हडपसर या मतदारसंघाच्या जागा वाटपाबाबत महायुतीतील मित्र पक्षांमध्ये एक मत असल्याचे बोलले जात आहे. यातील हडपसर विधानसभा मतदारसंघ हा अजित पवाराकडे राहणार असून इतर पाच विधानसभा मतदारसंघ भाजपकडे असतील अशी चर्चा आहे.

खडकवासला विधानसभा मतदारसंघांमधून यंदा उमेदवार बदलावा, अशी जोरदार मागणी भाजपचे स्थानिक नेते करत आहेत. विद्यमान आमदाराबाबत मतदारसंघात आणि भाजपमध्ये अंतर्गत देखील नाराजी असल्याचं सांगण्यात येत आहे. तर दुसरीकडे वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचा विचार केल्यास पोर्षे अपघात प्रकरणामुळे बॅकफूटवर गेलेले अजित पवार गटाचे आमदार सुनील टिंगरे यांना पुन्हा उमेदवारी द्यायची की नाही, याबाबत महायुतीतील मित्र पक्षांमध्ये एकमत होत नसल्याचे बोलले जात आहे. अशातच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाबाबत अद्यापही निर्णय झाला नसून चर्चा सुरू असल्याचे सांगितला आहे.

त्यामुळे खडकवासल्यातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांमध्ये उत्साह निर्माण झाला असून खडकवासल्याची जागा अजित पवार गटाला सुटल्यास आपला दावा भक्कम व्हावा, यासाठी या इच्छुकांकडून आता जोरदार मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे. सोशल मीडियावर पोस्टसह, परिसरातील कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना फोनाफोनी आणि भेटीगाठींचा सत्र सुरू झाले आहे. या विधानसभा मतदारसंघातून अजित पवारांसोबत असलेले माजी महापौर दत्ता धनकवडे हे निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत.

## भरघोस मतांनी विजयी करण्याचा कार्यकर्त्यांचा निर्धार

# ना. चंद्रकांतदादा पाटील म्हातोबाच्या चरणी लीन





> भारतीय जनता पक्षाने माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला मी नेहमीच पात्र राहत आलो आहे. मला उमेदवारी दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, जे. पी. नड्डा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार मानतो. कोथरूड विधानसभा मतदारसंघामधील लोकसभा निवडणुकीत कोथरुड विधानसभा मतदारसंघातून केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांना ७५ हजारांपेक्षा जास्त मताधिक्य मिळाले. यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कठोर परिश्रम घेतले. विधानसभा निवडणुकीत ही कोथरूडची जनता भारतीय जनता पक्ष महायुतीला भरभरून आशीर्वाद देतील, असा विश्वास आहे. — नामदार चंद्रकांत पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोथरूड :** विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष महायुतीचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर कोथरुडचे ग्रामदैवत म्हातोबाचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. त्यानंतर शिवतीर्थावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. यावेळी भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीतील सर्व घटक पक्षातील कार्यकर्त्यांनी जल्लोष करत नामदार पाटील यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, रिपाइंचे अ‍ॅड. मंदार घाटे, भाजपा कोथरूड दक्षिण अध्यक्ष डॉ संदीप बुटाला, उत्तरचे अध्यक्ष सचिन पाषाणकर, प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, पुनीत जोशी, गणेश कळमकर, सुशील मेंगडे, गिरीश भेलके, लहू बालवडकर, प्रल्हाद सायकर, महिला मोर्चाच्या अध्यक्षा कांचन कुंबरे यांच्या सह भाजपचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष साजरा करत आनंद व्यक्त केला. महायुतीचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटील यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचा संकल्प यावेळी सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, आपल्या पक्ष नेतृत्वाने चंद्रकांतदादा पाटील यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे एक लाखाच्या मताधिक्याने दादांना विजयी करायचं आहे. आजपासून प्रत्येक मिनिट आपल्या सर्व कार्यकर्त्यांसाठी महत्वाचा आहे. भारतीय जनता पक्ष महायुयीचे सैन्य आपल्या सेनापतीला विजयी केल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

## हडपसरच्या ५ नगरसेवकांनी साथ सोडली

# अजित पवार यांना दे धक्का

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धक्का बसला आहे. हडपसरमध्ये पाच माजी नगरसेवक अजित पवार यांची साथ सोडणार आहेत. अजित पवार याचे कट्टर समर्थक मानले जाणारे आनंद अलकुंटे साथ सोडणार आहेत. हडपसर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज भरणार असल्याचे समजतेय.

विद्यमान आमदार चेतन तुपे यांच्या विरोधात निवडणूक लढवणार आहेत. आनंद अलकुंटे माजी नगरसेवक आहेत.

सलग तीन वेळा पुणे महापालिका नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. पीएमपीएल चे माजी संचालक म्हणून ही काम केलं आहे. हडपसरमधून अजित पवार समर्थक माजी नगरसेवक प्रशांत म्हस्के, माजी नगरसेविका रुक्साना इनामदार यांचे पती शामशुद्दीन इनामदार यांच्यासह अजून दोन नगरसेवक दादाची साथ सोडणार आहेत. मंगळवारी शक्ती प्रदर्शन करत आनंद अलकुंटे हडपसर मधून अपक्ष उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

# महिला पोलीस कर्मचाऱ्यांची स्तन कर्करोग तपासणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** कर्करोगाच्या प्रकारांमध्ये महिलांमधील स्तनकर्करोगाचे प्रमाण जास्त आहे. परंतु अनेक वेळा महिला त्याकडे दुर्लक्ष करतात त्यातही पोलीस महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या व्यस्त दिनचर्येमुळे स्वतःकडे लक्ष देता येत नाही. त्यामुळे अमनोरा येस फाउंडेशन आणि सहयोगी संस्था यांच्या वतीने पोलीस मुख्यालयात कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १०३ महिला पोलीस कर्मचाऱ्यांची स्तन कर्करोग तपासणी झाली.

बीजे मेडिकल कॉलेज आणि ससून सर्वोपचार रुग्णालय, अमनोरा येस फाउंडेशन, रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज, यु इ लाईफसायन्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ससूनचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार, ससूनचे अधिक्षक डॉ. यल्लप्पा जाधव, पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक पोलीस आयुक्त रंगनाथ उंडे, ससूनच्या शस्त्रक्रिया विभागाच्या प्रमुख डॉ. लता भोईर, सिटी ग्रुप चे उपाध्यक्ष विवेक कुलकर्णी यावेळी उपस्थित होते. डॉ. राजकुमार शिंदे म्हणाले, महिला अजूनही त्यांना काही त्रास होत असेल तर सांगत नाहीत परंतु महिलांनी पुढे येऊन ते सांगणे गरजेचे आहे. स्तन कर्करोग पूर्वतपासणी सर्व महिलांनी करून घेणे आवश्यक आहे.

विवेक कुलकर्णी म्हणाले, महिला पोलिसांना विनामूल्य कर्करोग तपासणीसाठी हेल्थ कार्ड देण्यात आले आहेत. यापूर्वी विविध ठिकाणी झालेल्या ५ शिबिरात २२५ महिला पोलिसांची तपासणी करण्यात आली. यामध्ये १२ महिला पोलिसांना मॅमोग्राफी तर १० जणींना सोनोग्राफी तपासणी सांगण्यात आली होती. पोलीस समाजाची काळजी घेतात त्यामुळे त्यांची काळजी घेणे हे आमचे कर्तव्य आहे.

> पुण्यातील सर्व पोलीस महिला कर्मचाऱ्यांसाठी त्यांना कर्करोग तपासणी शिबिर राबविण्यात येत आहे. महिलांचे देखील चांगले सहकार्य या शिबिराला मिळत आहे. पोलीस मुख्यालयात झालेल्या शिबिरात मॅमोग्राफीसाठी ३९ तर ३ महिला पोलिसांना पुढील तपासणीसाठी सांगण्यात आले आहे. कर्करोगाबद्दल लवकर माहिती मिळाल्यास त्यावर उपचार करता येतात. त्यामुळे महिला पोलिसांनी मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी व्हावे.
> — डॉ. एकनाथ पवार

## अवतीभवती
CITY UPDATE



### 'जैन राजकीय फोरम'ची स्थापना

**पुणे :** सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या जैन समाजाला राजकीय क्षेत्रात अधिक कार्यरत करण्यासाठी महावीर प्रतिष्ठान येथे जैन युवक महासंघतर्फे आयोजित समाजातील प्रतिष्ठित मान्यवरांच्या बैठकीत जैन सामाजातील चार संप्रदायातील जैन राजकीय फोरमची स्थापना करण्यात आली. समाज कार्य करताना त्याची व्याप्ती वाढवायची असल्यास राजकीय क्षेत्रामध्ये जैन समाजाचे प्रतिनिधी असणे आवश्यक आहे. निःस्वार्थ भावनेने काम करताना जैन समाजातर्फे राजकारणात प्रतिनिधित्व असणे आवश्यक आहे. जैन समाजातील कार्यकर्त्यांनी राजकरणात रूची घेत जैन समाजाचे प्रतिनिधित्व करत बहुजन समाजा साठी काम करण्याच्या उद्देशान जैन राजकीय फोरमची स्थापना करण्यात आली.

### बंधुता परिषदेतर्फे आज पहिले रयत विचारवेध संमेलनाचे आयोजन

**पुणे :** विश्वबंधुता साहित्य परिषद आणि रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पहिल्या रयत विचारवेध संमेलनाचे आयोजन केले आहे. उद्या सोमवार,



दि. २१ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता नवी पेठेतील पुणे श्रमिक पत्रकार भवनमध्ये हे संमेलनाला सुरुवात होईल. रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी यांची 'रयतेपासून रयतेपर्यंत' या विषयावर प्रकट मुलाखत, विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांचा अमृतमहोत्सवी सत्कार व डॉ. सविता पाटील लिखित 'विश्वबंधुतेचे सुवर्णपर्व' पुस्तकाचे प्रकाशन असा त्रिवेणी संगम अनुभवता येणार आहे. उद्घाटनप्रसंगी रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव डॉ. शिवलींग मेनकुदळे, डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. अरुण आंधळे आणि डॉ. सविता पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहील. चंद्रकांत दळवी यांच्या 'रयतेपासून रयतेपर्यंत' या मुलाखतीने संमेलनाचा समारोप होईल. दळवी यांच्याशी प्रा. शंकर आथरे आणि संगीता झिंजुरके मुक्त संवाद साधतील. दुपारच्या सत्रात पल्लवी उमरे (नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात मराठी काव्यपंढरी होईल, अशी माहिती रयत विचारवेध संमेलनाचे अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली.

# ऑनलाइन वीजबिल भरण्याकडे ग्राहकांचा कल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महावितरणच्या वीजबिलांचा ऑनलाइन भरणा करण्याकडे ग्राहकांचा कल वाढत आहे. यामध्ये पुणे जिल्ह्यात २५ लाख ८४ हजार तर पश्चिम महाराष्ट्रातील तब्बल ४१ लाख १२ हजार घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वीजग्राहक (८० टक्के) दर महिन्याला सुमारे ११९५ कोटी ७० लाख रुपयांच्या वीजबिलांचा ऑनलाइन भरणा घरबसल्या करत आहेत. तर गेल्या तीन महिन्यांत पश्चिम महाराष्ट्रातील १ कोटी २६ लाख ३८ हजार वीजग्राहकांनी ३५८७ कोटी ३२ लाख रुपयांचा वीजबिलांचा ऑनलाइन भरणा केला आहे.

**या जिल्ह्यांनी महिन्याला केला ऑनलाइन वीजबिल भरणा**

| जिल्हा | ग्राहकांची संख्या | ऑनलाइन भरणा केलेली रक्कम |
|---|---|---|
| पुणे | २५ लाख ८४ हजार | ७९६ कोटी |
| कोल्हापूर | ५ लाख ४४ हजार | १६९ कोटी २७ लाख |
| सोलापूर | ३ लाख २० हजार | ८३ कोटी २७ लाख |
| सातारा | ४ लाख ६३ हजार | ७५ कोटी ८१ लाख |
| सांगली | ३ लाख ४३० | ७१ कोटी ३३ लाख |

# पटोले व राऊत यांच्यातील वादाचे पडसाद पुण्यातही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाविकास आघाडीतील जागा वाटप पूर्ण होत आले आहे. पण मुंबई आणि विदर्भातील जागांवर काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे पक्षात जोरदार रस्सीखेच सुरु आहे. त्यावरून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि खासदार संजय राऊत यांचे वादही झाले. त्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण त्याचे पडसाद पुण्यातही उमटल्याची चर्चा सुरु झाली आहे.

पुण्यात काल विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी महाविकास आघाडीची बैठक आयोजित केली होती. त्यासाठी काँग्रेसकडून शिवसेना ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख संजय मोरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांना निरोप देण्यात आला होता.

आठही विधानसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरताना शक्तीप्रदर्शन करणे, सोशल मिडियावर प्रचार करताना तिन्ही पक्षांची भूमिका समान असावी, प्रचारासाठी येणाऱ्या नेत्यांनी अन्य पक्षाचाही प्रचार करावा, सभा घ्यावी, केवळ ठरावीक मतदारसंघात जाऊ नये, यावर चर्चा करण्यात आली.

तसेच पुण्यातील प्रचारासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना निमंत्रित करावे अशीही चर्चा झाली. प्रचाराची रणनीती ठरविण्यासाठी आयोजित केलेल्या या बैठकीला संजय मोरे उपस्थित नसल्याने शहर प्रमुख गजानन थरकुडे यांना संपर्क साधण्यात आला. पण ऐनवेळी निरोप दिला गेल्याने ते देखील बैठकीला उपस्थित राहू शकले नाहीत.

> "मला बैठकीचा निरोप उशिरा मिळाल्याने या बैठकीला जाऊ शकलो नाही."
> — गजानन थरकुडे
> शहर प्रमुख, शिवसेना उबाठा

> "विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या नियोजनासाठी महाविकास आघाडीची बैठक पार पडली. त्यात तिन्ही पक्षांनी कसा प्रचार करावा याच्या नियोजनावर चर्चा झाली. आमच्याकडून शिवसेनेला बैठकीचा निरोप दिला होता."
> — अरविंद शिंदे,
> शहराध्यक्ष, काँग्रेस

# RS NEWS DIGEST

**शैक्षणिक**

### विद्यार्थ्यांना चौथ्या औद्योगिक क्रांतीचे घटक, तंत्र शिकवावे

**पुणे :** 'शालेय पातळीपासून विद्यार्थ्यांना चौथ्या औद्योगिक क्रांतीचे घटक आणि तंत्र शिकवले पाहिजे. त्यातून देशात औद्योगिक आणि सर्वांगीण विकास होईल," असे मत सुनील चौरे यांनी व्यक्त केले. मराठी विज्ञान परिषद पुणे विभागातर्फे आयोजित व्याख्यानामध्ये ते बोलत होते. कार्यक्रमाची प्रस्तावना विनय र. र. यांनी केली. वक्त्यांची ओळख डॉ. अंजली साठे यांनी करून दिली. अध्यक्षस्थानी परिषदचे अध्यक्ष राजेंद्र सराफ होते. चौरे म्हणाले, "माणसाच्या सांस्कृतिक वाटचालीत शेती आणि संबंधित उद्योग तयार व्हायला दहा हजार वर्षे लागली. वाफेच्या शक्तीने औद्योगिक क्रांती काही शतकात जगभर पसरली. विजेच्या वापराने ती पुढच्या टप्प्यावर गेली. संगणकाने तिसरी औद्योगिक क्रांती घडवली. चौथ्या औद्योगिक क्रांतीचा वाहक घटक म्हणजे वस्तूंचे इंटरनेटीकरण. सोबत सायबर-फिजिकल सिस्टीम, क्लाऊड कॉम्प्युटिंग, सिम्युलेशन तंत्रज्ञान, डिजिटल ट्विन, संज्ञानात्मक संगणन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा समावेश असलेल्या उत्पादन तंत्रज्ञान आणि प्रक्रियांमध्ये ऑटोमेशन आणि डेटा एक्स्चेंज यांचा वापर, पाचव्या, सहाव्या औद्योगिक क्रांतीकडे नेत आहे.'

**एक पाऊल पुढे !**

### सूर्यदत्त कॉलेज ऑफ फिजिओथेरपी महाराष्ट्रात तिसरे

**पुणे :** सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला इंडियन इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कतर्फे (आयआयआरएफ) २०२४ करीता जाहीर केलेल्या क्रमवारीत महाराष्ट्रात तिसरे, पश्चिम विभागात पाचवे, तर देशात ३२ वे स्थान मिळाले आहे. 'आयआयआरएफ'तर्फे नुकतीच देशातील फिजिओथेरपी कॉलेजांची क्रमवारी एज्युकेशन पोस्ट मॅगझीनमध्ये जाहीर करण्यात आली. 'आयआयआरएफ'ची क्रमवारी ही तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्फत विश्लेषण करून अधिकृत व वैविध्यपूर्ण अशा पद्धतीने जाहीर होते, जी उद्योग जगताकडूनही स्वीकारली जाते. रोजगार, अध्यापन-अध्ययन व स्रोत, संशोधन, औद्योगिक उत्पन्न व एकीकरण, प्लेसमेंट धोरण व सहकार्य, भविष्यवेधी मार्गदर्शन आणि बाह्यधारणा व आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन या सात मुद्यांवर सर्वेक्षण करून ही क्रमवारी तयार केली जाते. कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या या यशाबद्दल प्रा. डॉ. संजय चोरडिया यांनी आनंद व्यक्त केला. ही क्रमवारी आमचा उत्साह वाढवणारी आणि सूर्यदत्तमध्ये दिल्या जाणाऱ्या मूल्याधिष्ठित शिक्षणाचा गौरव करणारी आहे,असे ते म्हणाले.

**कोथरूड मतदारसंघ**

### महायुतीतील विजय डाकले यांच्या भूमिकेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष

**कोथरूड :** कोथरूड विधानसभा मतदार संघात महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विजय डाकले निवडणुकीची जय्यत तयारी करत असल्याने राजकीय वातावरण तापले आहे. महायुतीत या मतदार संघात भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे निवडणूक लढवण्यासंदर्भात विजय डाकले काय भूमिका घेणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



कोथरूड मतदार संघातून चंद्रकांत यांना आज उमेदवारी जाहीर झाली. महायुतीतील पक्ष असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे विजय डाकले हे पदाधिकारी आहेत. चंद्रकांत पाटील यांच्या कामांवर टीकेची झोड उठवत डाकले यांनी निवडणुकीच्या रिंगणात आपण प्रमुख दावेदार असल्याचे मागेच दाखवून दिले आहे. महायुतीतील नेत्यालाच त्यांनी सुरुवातीपासून टार्गेट केल्याने कोथरूड मध्ये महायुतीत बिघाडी होणार का अशा चर्चा तेव्हापासून रंगू लागल्या होत्या.

विजय डाकले यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार व इतर वरिष्ठांना भेटून कोथरूड मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेसची चांगली ताकद असल्याने तो आपल्या पक्षासाठी सोडून घ्यावा व आपण हा या मतदारसंघात निवडणूक लढवण्यास तयारी करत असल्याची माहिती दिलेली होती. मात्र भाजपचा आमदार असताना हा मतदार संघ महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसला सुटणार नाही हे नक्की होते आणि आज या मतदार संघात भाजपचा उमेदवारही जाहीर करण्यात आलेला आहे.

**कोणत्या पक्षाचा झेंडा खांद्यावर?**

● भाजपचा उमेदवार जरी जाहीर झाला असला तरी विजय डाकले ज्या पद्धतीने निवडणुकीची तयारी करत आहेत त्यावरून तरी ते मागे हटतील असे आतातरी दिसत नाही. मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसला सुटला नसल्याने डाकले काय भूमिका घेणार, महायुतीचे बंडखोर म्हणून लढणार का इतर कोणत्या पक्षाचा झेंडा खांद्यावर घेणार हे पाहणे आता उत्सुकतेचे ठरणार आहे. या निवडणुकीत डाकले यांची भूमिका महत्वाची राहणार आहे.

**बजेट कोलमडले**

### मार्केटयार्डामध्ये बटाटा, मिरची, गवार, घेवड्याच्या भावात वाढ

**पुणे :** गुलटेकडी येथील मार्केटयार्डातील तरकारी बाजारात राज्यासह परराज्यांतून येणारी फळभाज्यांची आवक मागील आठवड्यांच्या तुलनेत वाढली आहे. मात्र मागणीच्या तुलनेत आवक कमी असल्याने बटाटा, गवार, हिरवी मिरची, शिमला मिरची, बीट आणि घेवड्याच्या भावात वाढ झाली असून



अन्य सर्वच फळभाज्यांचे भाव स्थिर आहेत. गुलटेकडी मार्केटयार्डमध्ये रविवारी (ता. २०) राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतून सुमारे ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. विविध भाजीपाल्यांच्या आवकेमध्ये परराज्यांतून कर्नाटक आणि गुजरात येथून हिरवी मिरची ७ ते ८ टेम्पो, कर्नाटक आणि गुजरात येथून कोबी ३ ते ४ टेम्पो, कर्नाटकातून पावटा २ टेम्पो, आंध्रप्रदेश, तमिळनाडू येथून शेवगा ३ ते ४ टेम्पो, इंदौर येथून ५ ते ६ टेम्पो गाजर, कर्नाटक आणि गुजरात येथून घेवडा ३ ते ४ टेम्पो, गुजरात येथून ३ टेम्पो भुईमुगाच्या शेंगा, मध्यप्रदेशातून लसूण सुमारे ७ ते ८ टेम्पो इतकी आवक झाली होती. अशी माहिती मार्केट यार्डमधील ज्येष्ठ आडतदार विलास भुजबळ यांनी दिली.

## चिंतन आणि वास्तव

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी यांनी सामाजिक भेदभावाच्या संदर्भात जे चिंतन केले आहे त्याचे वृत्त नुकतेच प्रसारित झाले आहे. भेदभाव असणारा समाज नष्ट होतो, त्यामुळे भेदभाव करू नका असा या चिंतनाचा थोडक्यात निष्कर्ष आहे. पण त्याचा तपशील नीट वाचल्यानंतर आणि अँगल लक्षात घेतल्यानंतर असे लक्षात येते की, त्यांना हिंदूधर्मातील जातिभेद नाहीसा व्हावा असे सांगायचे असावे. त्याचे कारण असे की त्यांनी जे संदर्भ दिले आहेत त्यात हरिद्वारचे मंदिर, बारा ज्योतिर्लिंगे आणि देशातील ५१ शक्तिपीठे यांचा दाखला देत ही सगळी स्थळे कोणत्या जातीची आहेत का, अशी विचारणा केली आहे. हिंदूधर्मात जातिभेद नसावा अशी सगळ्यांचीच धारणा आहे. पण त्यात अलीकडे जातनिहाय जनगणनेचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाचा मुद्दा बनवला गेला आहे. राजकारणातही तो एका हत्यारासारखा वापरला जात आहे. भारतीय जनता पक्षाने आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अखिल हिंदू समाज धर्माच्या झेंड्याखाली एकत्र यावा यासाठी मोठा प्रयत्न केला. त्यामध्ये त्यांचा राजकीय लाभ उठवण्याचाही हेतू लपलेला नाही. मुख्य म्हणजे धर्माच्या नावाने त्यांना मोठे राजकीय यशही मिळताना दिसत आहे. या यशाला सुरूंग लावण्यासाठी आणि हिंदूधर्म पुन्हा जातीपातीत विखुरला जावा यासाठीच काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी जातीनिहाय जनगणनेचा आग्रह धरला आहे, अशी भाजप आणि संघाच्या लोकांची धारणा झाली आहे. त्यामुळे एकूणच हा विषय सध्या हॉट टॉपिक बनला आहे. या पार्श्वभूमीवर भेदभाव नसणारा समाज देशात निर्माण करण्याची गरज आहे, असा युक्तिवाद भैय्याजी करत आहेत. वर नमूद केल्याप्रमाणे त्यांना केवळ हिंदूधर्मातील भेदभाव समाजात असता कामा नये असेच अभिप्रेत असावे, असे दिसते. पण मुख्य मुद्दा असा आहे की, या देशात धार्मिक आधारावर जो भेदभाव निर्माण केला जातो आहे त्यातून देशातील समाजमन मोठ्या प्रमाणात अस्वस्थ झालेले दिसत आहे, याची चिंता भैय्याजींना आहे काय, हेही त्यांना विचारावे लागेल. कारण त्यांनी केलेल्या चिंतनाचे जे वृत्त प्रसारित झाले आहे त्यात धार्मिक एकोपा असा स्पष्ट उल्लेख कुठेही दिसत नाही. मग हा सगळा विषय राजकीय पक्षांच्या अजेंडांच्या दिशेने जाताना दिसतो. भारतीय जनता पक्षाला हिंदूचा एकोपा साधून राजकीय हित साधायचे असेल तर, तो त्यांचा डाव हाणून पाडण्यासाठी मग जातनिहाय जनगणनेचा मुद्दा काँग्रेसला उचलून धरावा लागतो. म्हणजे दोन्ही बाजूकडील त्यांच्या युक्तिवादामागे कोणते ना कोणते राजकीय हित दडलेले आहे, हे सहज लक्षात येते. भैय्याजी जोशी यांना जर भेदभाव नसणारा समाज अपेक्षित नसेल, तर त्यात धार्मिक भेदभावालाही थारा असता कामा नये, असा मुद्दा अंतर्भूत करणे अपेक्षित होते, पण तो त्यांनी मांडलेला दिसत नाही. उलट आज भाजप आणि संघाचे लोक अत्यंत टोकाच्या पद्धतीने मुस्लीम समाजाविषयी गरळ ओकताना दिसत आहेत. त्यामुळे सुमारे १६ कोटींच्या संख्येत असलेला हा मुस्लीम समाज मनातून अशांत आणि असुरक्षित बनला आहे. त्यांना दिलासा वाटावा किंवा विश्वासाचे वातावरण त्यांच्यात निर्माण व्हावे असे कोणतेच प्रयत्न सध्याच्या राजवटीत होताना दिसत नाहीत. ही अस्थिर परिस्थिती दिवसेंदिवस आणखी बिकट कशी होईल असाच प्रयत्न निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरही होताना दिसतो. धार्मिक ध्रुवीकरणाचा हा फंडा हमखास राजकीय यश देणारा फंडा असल्याची धारणा भाजप आणि संघाच्या समर्थकांमध्ये झाली असल्याने निवडणुका आल्या की अशा समर्थकांना चांगलाच चेव चढतो. त्यातून अनेक भागांमध्ये तणावाची स्थिती किंवा दंगलीची स्थिती निर्माण झाल्याचे आपण अनेक वेळा पाहिले आहे. ही स्थिती टाळण्यासाठी संघ, भाजपचे लोक काय प्रयत्न करीत आहेत किंवा अल्पसंख्याकांना विश्वास वाटेल असे वातावरण निर्माण करण्यासाठी ते काय योगदान देत आहेत हेही पाहावे लागेल. नुसतेच भेदभाव असणारा समाज नष्ट होतो असे सांगून केवळ हिंदूधर्मातील जाती-जातींमध्ये एकोपा साधण्याच्या प्रयत्नाच्याही बाहेर जाऊन सर्वच समाजामध्ये आणि जातींमध्येही एकोपा साधण्याचा प्रयत्न फार गांभीर्याने हाती घेण्याची गरज आहे. भैय्याजी जोशी यांनी हे चिंतन करताना पुरुषसूक्तात हजार मस्तकी, हजार हात आणि हजार पायांचा उल्लेख असलेल्या व्यक्तीचे वर्णन केले आहे. पुरुषसूक्तातील ही व्यक्ती म्हणजे समाजपुरुष आहे, तो राष्ट्रपुरुष आहे, हा सर्व एकच भाग आहे, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांचे हे विचार अगदी रास्त असून त्यांनी आता जातीजातींमध्ये एकोपा साधण्याबरोबरच आपल्या विचारसरणीच्या लोकांमधून धार्मिक विद्वेष पसरणार नाही अशीही अपेक्षा व्यक्त केली पाहिजे. किंबहुना त्यासाठी पुढाकाराने त्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. अलीकडच्या काळात सामाजिक बहिष्कार घालण्याची भाषा अनेक वेळा ऐकू येते. विशेषतः हिंदू धार्मिक सणाच्या काळात कोणाकडून वस्तू खरेदी करा आणि कोणाकडून खरेदी करू नका याचे आवाहन करणार्‍या अनेक पोस्ट सोशल मीडियात पाहायला मिळतात. अशा पोस्ट मनाला वेदना देणार्‍या असतात. एका समाजाने दुसर्‍या समाजावर सामाजिक बहिष्कार टाकला तर त्याचे होणारे आर्थिक परिणाम त्या समाजाला किती विदारक स्थितीला नेऊन ठेवतील याची कल्पना करता येत नाही आणि त्यातून पुढे भविष्यात जे काही रणकंदन माजेल त्याचाही अंदाज लावता येत नाही. हा सगळा सामाजिक सलोखा बिघडवून सामाजिक स्थिती विध्वंसाच्या दिशेने नेण्याचा जो प्रयत्न सुरू आहे त्याला आता सत्ताधार्‍यांबरोबरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जबाबदार पदाधिकार्‍यांनीही पायबंध घातला पाहिजे. अर्थात या संघटनेच्या नेत्यांची दृश्य स्वरूपातील भूमिका समरसता किंवा एकोपा यावरच आधारित आहे हे खरे आहे; पण त्यांनी आता आपल्या अनुयायांनाही आवर घालण्याची नितांत आवश्यकता आहे. ■

**सर्वसामान्य भारतीयांसाठी यंदाचा दसरा-दिवाळी हा सणासुदीचा काळ काहीसा निराशाजनक राहण्याची शक्यता आहे. याचे कारण भारतीयांच्या लाडक्या सोन्याचे भाव ऐतिहासिक उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. २०१९ मध्ये २५ टक्क्यांची वाढ होऊनही ३९ हजारांवर पोहोचलेले सोने २०२४ मध्ये ७८ हजारांवर पोहोचले आहेत. सोन्यातील ही भाववाढ खरेदीदारांसाठी अडचणीची ठरणार असली तरी गुंतवणूकदारांना दिलासा देणारी आहे. सध्याची एकंदरीत जागतिक राजकीय, आर्थिक परिस्थिती पाहता येणाऱ्या काळातही सोने तेजीतच राहणार असे दिसत आहे. काय आहेत यामागची कारणे?**

# सोन्याला नवी झळाळी

सीए संतोष घारे, अर्थतज्ज्ञ

आखातीतील युद्धसंघर्षाचा भडका उडाल्यामुळे कमोडिटी या श्रेणीत येणाऱ्या बहुतेक घटकांच्या भावांनी उचल खाल्ली आहे. यामध्ये कच्चे तेल, नैसर्गिक वायू, सोने, तांबे, झिंक आदींचा समावेश आहे. अस्थिरता, अशांतता, अनिश्चितता या गोष्टींचा कमोडीटींवर होणारा परिणाम आणि प्रभाव नेहमीच दिसून आला आहे. एकीकडे या अस्थिरतेमुळे भांडवली बाजारात घसरण होत असते. कारण युद्धसंघर्षामुळे बहुतांश गुंतवणूकदार आपली जोखीम करण्यासाठी खरेदी केलेल्या समभागांची विक्री करुन नफावसुली करत असतात. ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीपासून भारतीय शेअर बाजारात झालेली पडझड ही गुंतवणुकदारातील घबराट दर्शवणारी आहे. शेअर बाजार आणि सोने यांचे गुणोत्तर बहुतांश वेळा विषम मानले जाते. म्हणजे बाजार तुफानी तेजीत असेल तर सोन्याचे भाव गडगडलेले असतात आणि सोन्याचे भाव वाढू लागले की बाजारात पडझड होते. ही स्थिती आजवरच्या इतिहासावरुन अंदाजलेली असते. दरवेळी तसे होईलच असे नाही.

सोने हा मौल्यवान धातू जगभरात संपत्ती आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. प्राचीन काळापासून सोन्याने जगाला भुरळ पाडलेली आहे. प्रामुख्याने भारतात तर सोन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विवाह सोहळा, भेटवस्तू, सण, उत्सव, गुंतवणूक या आघाडीवर सोन्याला नेहमीच मागणी राहिली आहे. भारतीय परंपरेतील सण आणि उत्सव तर सोन्याच्या खरेदीशिवाय पूर्णच होत नाहीत. सुरक्षित गुंतवणूक व मालमत्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोन्याच्या किंमती इतिहासातील सर्वाच्च पातळीवर पोहोचल्या आहेत. प्रामुख्याने कोरोना काळानंतर जगभरात सोन्याला मागणी वाढली आहे. भविष्यातही सोन्यातील तेजी कायम राहण्याचे संकेत आहेत.

सोने हा कालातीत साठा समजला जातो आणि आर्थिक अनिश्चिततेच्या काळात मानसिक आधार देण्याचे काम करतो. अर्थात सोन्याच्या वाढत्या किंमतीने सर्वच जण हैराण झाले आहेत. सोन्याला गुंतवणुकीच्या माध्यमातूनही अधिक महत्त्व दिले गेले आहे आणि भारतातील प्रत्येक कुटुंब आपल्या मालमत्तेत काही भाग दागिन्यांव्यतिरिक्त सोन्याचे नाणे, बिस्कीट किंवा कोणत्या ना कोणत्या रुपातून बाळगते. दागिन्यांव्यतिरिक्त सोन्याचा वापर इलेक्ट्रॉनिक्स, वैद्यकीय उपकरणातही होतो. सोन्याच्या किंमतीवर अनेक गोष्टींचा परिणाम होतो. १९७०-८० च्या दशकांत प्रती दहा ग्रॅम भाव ७०० रुपये होता. आजघडीला तो ७० हजारांवर पोहोचला आहे. ही भावपातळी यापूर्वी कधीही पाहवयास मिळाली नाही. भारत चीन युद्ध, १९७१ मधील आर्थिक संकट, २००८ ची मंदी यासारख्या काळात सोन्याची किंमत विक्रमीरित्या वाढली होती. पण २०२३ या एका वर्षात सोन्याच्या किमतीत १३ टक्क्यांनी वाढ झाली आणि त्याचा भाव विक्रमी ६४,४६० रुपये प्रती दहा ग्रॅमवर पोचला. निफ्टी आणि सेन्सेक्स या निर्देशांकांनी या काळात दमदार कामगिरी केलेली असतानाही सोन्याने संपूर्ण वर्षभरात गुंतवणूकदारांना आणि खरेदीदारांना चांगला परतावा दिला. निफ्टी ५० इंडेक्समध्ये गत दोन तीन वर्षांत १८ टक्के वाढ दिसली होती. मागच्या वर्षी सोने वाढण्याचे कारण म्हणजे अडचणीत आलेले अमेरिकेतील बँकिंग क्षेत्र. यामुळे निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे गुंतवणूकदार एक सुरक्षित पर्याय म्हणून सोन्याकडे वळाले. तसेच केंद्रीय बँकेकडून झालेली सुमारे ८०० मेट्रिक टन सोन्याची खरेदी, इस्राईल आणि हमास यांच्यातील संघर्ष, २०२४ मध्ये संभाव्य व्याजदरातील कपातीसह फेडरल रिझर्व्हचे नरमाईचे धोरण आणि चौथ्या तिमाहीत सणवारातील दमदार मागणी या कारणांमुळे देशात २०२३ वर्ष सोन्यासाठी चांगले राहिले.

२०२४ या वर्षात सोन्यावर प्रभाव टाकणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे फेडरल रिझर्व्हची व्याजदराबाबतची भूमिका. अमेरिकेच्या केंद्रीय मध्यवर्ती बँकेकडून व्याजदरात कपात होणार या शक्यतांमुळे गेल्या ७-८ महिन्यात डॉलरमध्ये घसरण झाली आणि सोन्याचे भाव वाढत गेले. डॉलर आणि सोन्याचे गुणोत्तरही विषमच असते असे अनेकदा दिसून आले आहे. डॉलरमध्ये घसरण झाली की सोन्याला झळाळी येते. चलन अवमुल्यनापासून बचाव करण्यासाठी गुंतवणूकदार सोन्याकडे वळतात. महागाईदराचा दबाव हा प्रमुख अर्थव्यवस्थेतील केंद्रीय बँकांना व्याजदर कमी करण्यासाठी प्रेरित करत होता. येत्या काळातही व्याजदरात कपातीचा सिलसिला सुरू राहणार असल्यामुळे पुन्हा एकदा सोन्याला दमदार मागणी राहू शकते. याशिवाय तंत्रज्ञान विकासात आणि हरित ऊर्जेतील क्रांतीमुळे सोन्याची मागणी वाढत आहे. यातील विशिष्ट गुणधर्मामुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणे, अक्षय्य उर्जा तंत्रज्ञानासाठी सोने धातू उपयुक्त ठरत असल्याने मागणी वाढते.

भारतात सोन्याच्या किंमतीत वाढ होण्यामागे जागतिक आणि देशांतर्गत स्थिती कारणीभूत आहे. जगभरात सोन्याच्या किंमती वाढत असताना भारतीय बाजार देखील त्यास अपवाद राहिला नाही. देशांतर्गतच्या किंमतीवर आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या घडामोडीचा परिणाम होतो. रशिया-युक्रेन युद्ध, हमास-इस्राईल युद्ध, जागतिक पातळीवरची मागणी अणि पुरवठा यासारख्या घटकांमुळे सोन्याचे भाव आवाक्याबाहेर गेलेले दिसतात. शिवाय भारतात उत्सव, सण, विवाह सोहळा या काळात सोन्याला मागणी वाढते. आगामी उत्सव आणि लग्नसराई यामुळे सोन्याच्या मागणीत वाढ होण्याची शक्यता असून त्यामुळे किंमतीवर दबाव वाढणार आहे.

जगभरातील सोन्याच्या प्रमुख उत्पादक देशांत चीन, दक्षिण आफ्रिका, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, रशिया अणि पेरू यांचा प्रमुख वाटा आहे. उत्पादन हा घटकही सोन्याच्या किमतीवर प्रभाव टाकतो. जगभरातील सोन्याच्या खाणी एकूण तीन हजार मेट्रिक टन वार्षिक उत्पादन करतात. एवढे उत्पादन २०२० अणि २०२१ या काळात राहिले आणि ते २०१८-१९ च्या ३३०० मेट्रिक टनच्या तुलनेत कमीच आहे. परंतु २०२२-२०२३ मध्ये सोन्यात उत्पादनवाढ नोंदली गेली. अर्थात एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे आणि ती म्हणजे सोन्याचे उत्खनन दिवसेंदिवस कठीण होत आहे. कारण बऱ्याच प्रमाणात सोने बाहेर काढले गेल्याने आता दर्जेदार साठा मिळवण्यासाठी खाण कामगारांना आणखी खोलवर जाणे गरजेचे ठरत आहे. यासाठी कामगारांना अतिरिक्त धोक्याचा सामना करावा लागतो आणि शिवाय पर्यावरणाची भीती असतेच. यामुळे सोने मिळवण्याचा उत्पादनखर्च वाढला आहे. याचाही भावावर परिणाम दिसत आहे.

सोन्याचा साठा हा अर्थव्यवस्थेवरचा विश्वास वाढवणारा असतो. त्यातून परकीय गुंतवणूक वाढते. म्हणूनच आरबीआयने इंग्लंडमधून सोने आणण्याचा निर्णय घेतला. आशिया खंडामध्ये आजघडीला सोन्याची सगळ्यात जास्त आयात करणारा देश आहे चीन. पण गेल्या दोन वर्षांमध्ये चीनकडून सोन्याची खरेदी तब्बल ३० टक्क्यांनी वाढलेली आहे. यामागे प्रामुख्याने अमेरिका आणि चीन यांच्यातील संघर्षाचे महत्त्वाचे कारण मानले जात असले तरी चीनच्या भरमसाठ खरेदीमुळे सोन्याच्या अर्थकारणाला झळाळी मिळाली आहे.

एकंदरीतच सध्याचा भू राजनैतिक तणाव, विकसीत देशातील सुप्त मंदी, अमेरिका-चीन यांच्यातील ताणलेले संबंध, विकसनशील देशांवरचे वाढते कर्ज आणि जगभरात विविध देशांतील सार्वत्रिक निवडणुका या घटकांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सोन्याच्या किंमतीवर परिणाम होत आहे. २०२४ च्या आर्थिक दृष्टीकोनातून विचार केल्यास आगामी काळातील सोन्याची संभाव्य किंमत ही खरेदीदारांना अडचणीत राहणारी ठरू शकते. जागतिक मंदी आणि चलनवाढ यात सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याला पसंती दिली जात असल्याने त्याची किंमत वाढू शकते. सोने ही नेहमीच स्थिर गुंतवणूक मानली जाते आणि आर्थिक संकटात स्वतःचे मूल्य कायम ठेवते. शेअर बाजार, बाँड हे अनिश्चिततेच्या काळात जोखमीचे राहू शकतात. मात्र सोने हे सर्वसाधारपणे स्वतःचे मूल्य अबाधित राखते. या वैशिष्ट्यामुळे गुंतवणूकदारांचा सोन्याकडे ओढा अधिक असतो. हे सुवर्णप्रेम जोपर्यंत कायम आहे तोवर सोन्याची झळाळी कायम राहणे अटळ आहे. ■

## गुड 'मॉर्निंग'

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

**सोमवार, दिनांक २१ ऑक्टोबर २०२४**
अश्विन कृ. ५, रोहिणी/मृग, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी, श्री बिरदेव यात्रा पट्टणकोडोली ता. हातकणंगले.
**नक्षत्र** : रोहिणी मृगशीर्ष, योग : वरियान, करण : कौलव
**सूर्योदय :** स.०६.१३ **सूर्यास्त :** सायं. ०५.४२ वा.
**राहू काळ :** सकाळी : ७:३० ते ९:००

### दिनविशेष

▶१७७२: राईम ऑफ एन्शंट मरीनर लिहिणाऱ्या सॅम्युएल कोलिरिज टेलर या इंग्रज कवीचा जन्म. ▶१७८९: नारायणराव पेशव्याचा खून केल्याबद्दल राघोबादादा पेशव्यांना देहांताची शिक्षा फर्माविणारे न्यायनिष्ठूर न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांचे निधन. ▶१८०५: ट्रॅफल्गारच्या लढाईत इंग्रजांचा विजय, पण या प्रसंगी लागलेल्या गोळीने लॉर्ड होरॅशिओ नेल्सन या सेनापतीचे निधन. ▶१८३३: ज्याच्या नावे नोबेल पारितोषिक दिली जातत, त्या स्फोटक द्रव्यांचा संशोधक अल्फ्रेड नोबेलचा जन्म. ▶१९१६: संगीतकार राम मराठे यांचा जन्म. ▶१९१६: संगीतकार व गायक राम फडके यांचा जन्म. ▶१९२०: कीर्तनकार, धर्मभास्कर गं. ना. कोपरकर यांचा जन्म. अष्टपैलू व्यक्तिमत्व असणाऱ्या कोपरकरबुवांना द्वारकापीठाच्या शंकराचार्याकडून 'धर्मभास्कर', तर करवीरपीठाच्या शंकराचार्याकडून 'धर्मऋषी' ही पदवी मिळाली. ▶१९३४: समाजवादी पक्षाची स्थापना. ▶१९९८: गाजलेले खलनायक अजित यांचे निधन.

### राशीभविष्य

▲ **मेष** : अचानक खर्च कराल. ▲ **वृषभ** : कामाचा कंटाळा राहील. ▲ **मिथुन** : आर्थिक लाभाच्या घटना घडतील. ▲ **कर्क** : चांगले अनुयायी भेटतील. ▲ **सिंह** : करमणुकीत वेळ घालवाल. ▲ **कन्या** : प्रपंचाकडे जबाबदारीने लक्ष द्या. ▲ **तुळ** : वरीष्ठांची मर्जी सांभाळा. ▲ **वृश्चिक** : चांगली बातमी कळेल. ▲ **धनु** : कामाचे योग्य नियोजन करा. ▲ **मकर** : आरोग्य सांभाळा. ▲ **कुंभ** : मनाविरुद्ध घटना घडतील. ▲ **मीन** : कष्टाच्या मानाने लाभ कमी होईल.

### चिंतन

सत्यनिष्ठ असावे. साधे रहावे. अंत:करण शुद्ध व सौजन्ययुक्त असावे. दु:खाच्या आणि भयाच्या काळी आनंदी व समाधानी असावे. मृत्यूला घाबरु नये. पंचमहाभूतांची सेवा करावी पण भूतसष्टीने पछाडले जाऊ नये. यापेक्षा वेगळा धर्मोपदेश व उदाहरण जगाच्या आरंभापासून आजपर्यंत झालेले नाही.
**-डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्**

### व्यक्तीविशेष

## आल्फ्रेड नोबेल

स्फोटक द्रव्याचा उत्पादक व प्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ आल्फ्रेड नोबेल यांचा जन्म २१ ऑक्टोबर १८३३ रोजी स्वीडनची राजधानी स्टॉकहोम येथे झाला. उच्च प्रतीचा आणि सर्वश्रेष्ठ पुरस्कार समजल्या जाणाऱ्या नोबेल पारितोषिकाचे जनक म्हणजे आल्फ्रेड नोबेल. आपल्या वडिलांच्या स्फोटक द्रव्याच्या कारखान्यात मदतनीस म्हणून त्यांनी कार्यारंभ केला. नायट्रोग्लिसरीन नावाच्या स्फोटक पदार्थाला त्याने १८६७ मध्ये घनरुप मिळवून दिले, हाच डायनामाईट. पुढे त्याने युरोपातील सर्व प्रमुख राष्ट्रात, अमेरिका व स्कॉटलंडमध्ये डायनामाईट निर्मितीचे कारखाने सुरु केले. मानवी जीवनाच्या उत्कर्षासाठी राष्ट्राराष्ट्रांनी एकमेकांशी न भांडता शांततेने राहाण्यासाठी जे कार्य करतील, अशा व्यक्तींना या रकमेतून नोबेल पुरस्कार देण्यात येतो. आयुष्यभर स्फोटक पदार्थ निर्माण करुन संपत्ती कमाविणाऱ्या या संशोधकाने शांततेसाठी कार्यरत राहणाऱ्यांना पुरस्कार ठेवले. हा शास्त्रज्ञ १० डिसेंबर १८९६ मध्ये हे जग सोडून गेला.

### बोधकथा

## कुत्रा पाय चाटत नाही!

शेवटचा उपाय म्हणून तो बिरबलाकडे गेला आणि बिरबलाला घडलेली घटना सांगितली. ते ऐकून बिरबलाने त्याच्या कानात एक युक्ती सांगितली. त्या युक्तीप्रमाणे मूर्तीकाराने दुसऱ्या दिवशी सकाळी खाटकाकडून मटणाचा एक तुकडा आणला आणि तो पुतळ्याच्या पायातील चढावांवर भरपूर घासला आणि नंतर बादशहाकडे गेला. त्याला म्हणाला, 'महाराज, काल रात्रभर मी मेहनत करुन पुतळ्यात काही सुधारणा केल्या आहेत. तेव्हा आपण आपल्या कुत्र्यासमवेत माझ्या चित्रशाळेत आलात तर कुत्रा नक्की फसेल. तुम्ही तशी खात्री करुन घ्यावी.' बादशहा त्याप्रमाणे कुत्र्याला घेऊन चित्रशाळेत गेला. तिकडे जाताच कुत्र्याला कच्च्या मांसाचा वास आला आणि तो धावत पुतळ्यापाशी गेला. पुतळ्याचे पाय चाटू लागला. ते बघून मूर्तीकाराने विचारले, 'हुजूर झाले ना तुमचे समाधान?' त्यावर बादशहा म्हणाला, 'कुत्रा पाय चाटू लागला त्याअर्थी पुतळा शंभर टक्के बरोबर झाला आहे.' खुश होऊन बादशहाने त्या मुर्तीकाराला ठरलेल्या मोबदल्यापेक्षा जास्त मानधन दिले. त्याचा फार मोठा सत्कार केला आणि त्याच्या कलेचे कौतुकही केले. हे सगळं होत असताना मुर्तीकाराने मनातल्या मनात बिरबलाच्या चातुर्यासमोर लोटांगण घातले. **(उत्तरार्ध)**

### जिज्ञासा

## ल्युकेमियावरील औषधाचा शोध

आपले संपूर्ण जीवन विज्ञानासाठी, नव्या शोधांसाठी खर्ची करायचे असे ठरवूनच जरटूड एलियन यांनी संशोधनात स्वत:ला झोकून दिले. त्यांचा जन्म २३ जानेवारी १९१८ मध्ये न्यूयॉर्क येथे झाला. त्या ज्यू परिवारातील होत्या. अतिशय हुशार आणि चिकित्सक असल्यामुळे त्या नेहमी पहिल्या येत असतं. रसायन शास्त्रात बी.एसस्सी केल्यानंतर आर्थिक परिस्थितीमुळे संशोधन करता येत नव्हते म्हणून त्यांनी प्रयोग शाळेत साहाय्यक शिक्षकाची नोकरी करण्यास सुरुवात केली. न्यूयॉर्क विद्यापीठातून एम.एस्सी पूर्ण केले. त्यातही त्या प्रथम आल्या; पण तरीही स्त्री म्हणून बऱ्याच ठिकाणी डावलले जात होते. नोकरी मिळवितानाही त्यांना असाच अनुभव आला. १९४४ मध्ये त्यांनी बरोज वेलकम प्रयोगशाळेत साहाय्यकाची नोकरी मिळवली. पुढे त्यांनी हिचींग नावाच्या शास्त्रज्ञांसोबत संशोधन सुरु केले. १९४८ मध्ये एलियन यांनी मानवी रक्तातील पांढऱ्या पेशींची संख्या आणि वाढ थांबविणाऱ्या रसायनाचा शोध लावला. **(पूर्वार्ध)**

### नवं संशोधन

## जगातील वेगवान कार

बऱ्याच तरुणांना वाटत असते की आपल्या जुन्या कारला नवे रुप द्यावे, ही इच्छा ५० वर्षाच्या एंडी यांनी पूर्ण केले आहे. त्यांनी आपल्या जुन्या मॉन्स्टर कारला नवे रूप देऊन ही वेगवान कार बनवली आहे. ही गाडी त्यांनी १९८० मध्ये खरेदी केली होती. ही गाडी २५० मैल प्रतितास या वेगाने पळते आणि १ सेकंदात ६० मैल प्रतितास एवढा वेग पकडते. ही कार घेऊन २९ वर्षे झाली असली तरीही त्यामध्ये सातत्याने सुधारणा केली गेली आहे. त्यासाठी त्यांनी आतापर्यंत १ लाख पौंड खर्च केले आहेत. २९ वर्षापासून एंडी या कारवर वेगवेगळे प्रयोग करत आहेत. **(क्रमशः)**

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक : ४७४**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | | | |
| | | 3 | |
| | 4 | | |
| | | | 1 |

**क्रमांक : ४७३ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 2 |
| 4 | 2 | 3 | 1 |
| 2 | 4 | 1 | 3 |
| 3 | 1 | 2 | 4 |

### ओळख किल्ल्यांची

## अंजनेरी

नाशिकजवळील त्र्यंबकेश्वरजवळ एक नामांकित दुर्ग प्राचीन काळापासून उभा आहे, अंजनेरीगड सह्याद्रीतील भास्करगडापासून निघालेल्या उपरांगेत उभा असलेला अंजनेरीचा किल्ला प्राचीन आभीर राजांची राजधानी म्हणून इतिहासात ओळखला जातो. या किल्ल्याच्या डोंगरावरच अंजनीसुत हनुमानाचा जन्म झाला अशी वदंता आहे. त्यामुळे या किल्ल्यावर बालभीम भक्तांची गर्दी असते. अंजनेरी गडावर कातळ कोरीव पायऱ्या, जैनगुंफा, अंजनी मातेचे मंदिर, बाल हनुमानाचे मंदिर, प्रचंड मोठा तलाव, सीतागुंफा, सुंदर आश्रम आणि तटबंदीचे अवशेष दुर्गप्रेमींना पाहायला मिळतात. शिवकाळात ऑक्टोंबर १६७० मध्ये मोरोपंतानी शेजारच्या त्र्यंबकगडाबरोबरच अंजनेरी गडाचा ताबा घेतला.

### महिलायन

## ताण-तणाव मुक्त जगा

स्त्रियांचे बरेच आजार हे नको तितका ताण घेतल्यामुळे होत असतात. नोकरदार स्त्री असो किंवा गृहिणी, छोट्या छोट्या गोष्टींचे ताण घेण्याची बहुतेक स्त्रियांची सवय असते. या ताणांपासून मुक्ती कशी मिळवायची हे आपण जाणून घेऊ.



सर्वप्रथम स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सुपर वुमन बनण्याचा हट्ट सोडून द्यावा. आपल्या क्षमतेनुसार काम करावे. एखादे काम शक्य झाले नाही तर उगाच न्यूनगंड निर्माण करून घेऊ नये. यामुळे ताण वाढतो. एखाद्यागोष्टीबाबतचे यश किंवा अपयश याबद्दलच्या भावना फार तीव्र नसाव्यात. कुठलीही गोष्ट समभावनेने स्वीकारण्याचा प्रयत्न करावा. कोणालाही आडवंतिडवं बोलून शत्रू निर्माण करून घेऊ नये. यामुळे बराचसा वेळ शत्रूत्व मिटवण्यात किंवा भावनिक युद्धातच जाते आणि त्यातून ताण वाढतो. सतत काम करणे टाळावे. दिवसातून स्वतःसाठी काही वेळ विश्रांतीही गरजेची असते हे लक्षात घ्यावे. अचानकपणे एखादी घटना घडली तर तिच्याकडे शांत भावनेने बघावे. मन विचलित करून घेऊ नये. कुठलीही गोष्ट हवी असल्यास त्यासाठी काय साध्य करणे गरजेचे आहे हे ठरवावे आणि त्यानुसार ताण न घेता ते साध्य करण्याचा प्रयत्न करावा. प्रतिकूल परिस्थिती असली तरीही विचारांमध्ये सकारात्मकता ठेवावी. त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडतो. **(पूर्वार्ध)**

### बालांगण

## मराठी व्याकरण

नामांचे जे मूळ रूप असते ते त्याचे एकवचन असते. नामांची अनेकवचनाची रुपे बनवताना काही नामांना प्रत्यय लागतात, तर काहींची रुपे एकवचनासारखीच राहतात. कुत्रा-कुत्रे, ससा-सरे, मुलगा-मुलगे, आंबा-आंबे, घोडा-घोडे, राजा-राजे, फळा-फळे हे शब्द पाहिले की लक्षात येते की या पुल्लिंगी नामांचे अनेक वचन होताना ते एकारान्त होते. यावरून असे म्हणता येईल की, अकारान्त पुल्लिंगी नामचे अनेकवचन हे एकारान्त होते.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# बटू ग्रहावर बर्फाच्छादन

प्लूटोला एकेकाळी आपल्या ग्रहमालिकेत एक ग्रह म्हणून स्थान होते. मात्र, काही वर्षांपूर्वीच खगोलशास्त्रज्ञांनी त्याला 'खुजा, बटू ग्रह' (ड्वार्फ प्लॅनेट) ठरवून ग्रहमालिकेतून बाहेर काढले. अर्थात, तरीही त्याच्याविषयीचे कुतूहल शमलेले नाही. प्लूटोबाबत सातत्याने संशोधने होत असतात. प्लूटोच्या वातावरणाची पहिली रंगीत छायाचित्रे नासाच्या न्यू होरायझन्स यानाने पाठवलेली असून, त्यात बर्फाळ बटू ग्रहावर निळे आकाश दिसत आहे. प्लूटोच्या पृष्ठभागावर बर्फ दिसत आहे.


कोलोरॅडोतील साऊथवेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेचे प्रमुख संशोधक ॲलन स्टर्न यांनी सांगितले की, क्युपर पट्ट्यातील या बटू ग्रहावर एरवी कुणी निळ्या आकाशाची कल्पनाही केली नसेल. तेथील बर्फाळ धुक्याच्या कणांना राखाडी किंवा लाल रंग आहे; पण ज्या पद्धतीने ते निळा रंग पसरवतात, त्यामुळे न्यू होरायझन्स मोहिमेचे वैज्ञानिक चकित झाले आहेत. एसडब्ल्यूआरआय या संस्थेचे संशोधक कार्ली हॉवेट यांच्या मते त्या निळ्या रंगातून आपल्याला धुक्याच्या सदृशकणांची व्याप्ती व संरचना कळू शकते. आकाश हे काही लहान कणांनी नेहमी सूर्यकिरण विखुरले



गेल्याने निळे दिसते. पृथ्वीवर नायट्रोजनच्या लहान रेणूंनी सूर्यकिरण पसरले जाऊन आकाश निळे दिसते, तर प्लूटोवरही आकाश काजळीसारख्या थोलिन या कणांमुळे निळे दिसते. वैज्ञानिकांच्या मते प्लूटोच्या वातावरणातील अगदी वरच्या थरात थोलिनचे कण असतात तेथे अतिनील किरणांचे विघटन होते व त्यातून नायट्रोजन व मिथेनचे रेणू तयार होतात. ते एकमेकांशी अभिक्रिया करतात. त्यामुळे धन व ऋणभारित आयन तयार होतात. ते पुन्हा एकत्र आल्यानंतर स्थूलरेणू तयार होतात. अशी क्रिया शनीचा चंद्र असलेल्या टायटन या उपग्रहावर दिसून आली आहे. अधिक गुंतागुंतीचे रेणू एकत्र येऊन त्याचे छोटे कण बनतात. अस्थिर वायूंचे संघनन होते व ते त्या कणांच्या पृष्ठभागावर बसतात. त्यामुळे बर्फाचे कण असल्यासारखे धुके दिसते. त्यामुळे प्लूटोच्या लालसर रंगातही भर पडते. न्यू होरायझन्स यानाने केलेल्या संशोधनानुसार प्लूटोच्या अनेक भागांत बर्फ आहे. राल्फ स्पेक्ट्रल कंपोझिशन मॅपरने ते शोधले आहे. प्लूटोच्या विस्तारित भागात सरसकट बर्फ दिसत नाही. कारण, तिथे अतिशय तरल अशा बर्फाचे थर आहेत. तेथे काही ठिकाणी पाणी आहे व इतर ठिकाणी नाही, याचे कारण शोधावे लागेल, असे जॅसन कुक यांनी सांगितले. रंगीत छायाचित्रात जिथे लाल रंग दिसतो आहे तिथे पाण्याचे बर्फ दिसते. ते लालसर दिसते, हे बघून आश्चर्य वाटते, असे मेरीलँड विद्यापीठाच्या सिल्विया प्रोटोपापा यांनी सांगितले. पाण्याचे बर्फ व लाल रंगाचे थोलिन कण प्लुटोच्या पृष्ठभागावर आहेत. न्यू होरायझन्स अवकाशयान पृथ्वीपासून ५ अब्ज किलोमीटर दूर आहे, त्यातील सर्व प्रणाली व्यवस्थित काम करीत आहेत. ◆◆◆

# इजिप्तमधील पिरॅमिडवर नवा प्रकाश

हजारो वर्षांपूर्वीचे इजिप्त मधील पिरॅमिड जगातील आश्चर्यपैकी एक आहेत. मोठ्या आकाराच्या शिळा एकावर एक आखीव रेखीव पद्धतीने ठेवून निर्माण केलेली ही भव्य रचना आजही माणसाला चकित करते. या पिरॅमिडचे बांधकाम कसे झाले असावे, याबाबत सातत्याने नवनवे संशोधन होत असते. आता एका नव्या संशोधनानुसार हे पिरॅमिड बांधण्यासाठी हायड्रोलिक लिफ्टचा वापर झाला होता. पाण्याच्या साहाय्याने चालणाऱ्या यंत्राचा वापर करून अशा उत्तुंग रचना तयार करण्यात आल्या. बांधकामासाठी अतिशय वजनदार व मोठ्या आकाराच्या शिळा वापरल्या होत्या. हे वजन उचलण्यासाठी हायड्रोलिक लिफ्टच्या तंत्राचे साहाय्य घेण्यात आले होते.



नव्या संशोधनानुसार इजिप्तच्या सर्वात जुन्या म्हणजेच तब्बल ४,५०० वर्षांपूर्वीच्या पिरॅमिडची निर्मिती करण्यासाठी अत्यंत प्रगत तंत्रज्ञान वापरण्यात आले होते. हे यंत्र चालवण्यासाठी पाणी वापरले जात असे. पीएलओएस वन या ऑनलाईन जर्नलमध्ये याबाबतच्या संशोधनाची माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार सक्कारामधील जोसरच्या प्रसिद्ध स्टेप पिरॅमिडच्या निर्मितीसाठी वापरलेल्या तंत्राचा छडा लागला आहे. हे पिरॅमिड १३,१८९ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जागेत पसरलेले असून, त्याची उंची ६२.५ मीटर आहे. ४,५०० वर्षांपूर्वीचा हा पिरॅमिड त्या काळात एक खास रचना होती. त्याच्या बांधकामासाठी हायड्रोलिक लिफ्ट पद्धतीचा वापर झाला. यापूर्वी असे मानले जात होते की, असे भव्य पिरॅमिड बनवण्यासाठी वापरण्यात येणारे दगड परस्परांना जोडलेल्या रॅम्प आणि लिव्हरच्या साहाय्याने वर नेले जात असत. मात्र, आता फ्रान्सच्या सीईए पॅलियोटेक्निक इन्स्टिट्यूटचे झेवियर लँडरेऊ यांनी म्हटले आहे की, प्राचीन इजिप्शियन लोकांनी अशा वजनदार दगडांना हलवण्यासाठी पॉवर लिफ्ट बनवल्या होत्या, ज्यासाठी जवळच्या कालव्याचा वापर करण्यात आला. पाण्याला दोन शाफ्टांच्या माध्यमातून पिरॅमिडमध्ये निर्देशित करण्यात आले, ज्यामुळे मोठ्या शिळा नेणाऱ्या फ्लोटला वर आणि खाली करण्यासाठी मदत मिळाली. प्राचीन इजिप्शियन लोक आपल्या अशा हायड्रोलिक इंजिनिअरिंगसाठी प्रसिद्ध होते. ते शेतीच्या सिंचनासाठीही कालव्यांचा तसेच मोठ्या प्रमाणात शिळांच्या परिवहनासाठी नावांचा वापर करीत होते. स्टेप पिरॅमिडची निर्मिती इसवी सन पूर्व २६८० मध्ये तिसऱ्या राजवंशाच्या फेरो जोसरच्या अंत्यविधीसाठी करण्यात आली होती. ◆◆◆

# अंटार्क्टिकामध्ये वाढतेय हिरवळ

दक्षिण ध्रुवावरील अंटार्क्टिका खंडामध्ये बर्फाची जाड चादर आहे. मात्र, हा अतिथंड प्रदेश जागतिक तापमानवाढीमुळे ऊबदार बनत चालला आहे. एका नव्या संशोधनातून दिसून आले की, तेथील हरित क्षेत्रामध्ये गेल्या काही वर्षांच्या काळात वेगाने वाढ झाली आहे. या बर्फाळ प्रदेशातील ही वाढती हिरवळ संशोधकांना अचंबित करीत आहे.

नेचर जियोसायन्स या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, गेल्या चार दशकांमध्ये अंटार्क्टिका खंडावरील वनस्पती आवरणात नाट्यमय वृद्धी झाली आहे. यामुळे पर्यावरणतज्ज्ञांसमोर एक नवी समस्या निर्माण झाली. भविष्यात हा प्रकार पृथ्वीसाठी धोकादायक ठरू शकतो, असे म्हटले जात आहे. एक्सेटर आणि हर्टफोर्डशायर विद्यापीठाच्या संशोधकांनी या संशोधनासाठी ब्रिटिश अंटार्क्टिका सर्वेक्षणासोबत हवामान बदलाबद्दल हिरवळीच्या सीमेचे आकलन करण्यासाठी सॅटेलाईट डेटाचा वापर केला. त्यांना आढळले की, या क्षेत्रात वनस्पती आवरण १९८६ मध्ये एक चौरस किलोमीटरपेक्षाही कमी होते. ते वाढून २०२१ पर्यंत १२ चौरस किलोमीटर झाले. ही वाढ दहा पटीपेक्षाही अधिक आहे. अलीकडच्या काळात ही वाढ वेगाने होत आहे. २०१६ आणि २०२१ दरम्यान हिरवळीच्या वाढीचा दर ३० टक्क्यांहूनही अधिक आहे. एक्सेटर विद्यापीठाचे डॉ. थॉमस रोलँड यांनी सांगितले की, अंटार्क्टिकाचा बहुतांश भाग अद्यापही बर्फाळ आहे. मात्र, वनस्पतींचे आच्छादन असणारा भागही वाढत चालला आहे. ◆◆◆




# मधमाशीच्या मेंदूवर नवं संशोधन

बॉ एका छोट्याशा मधमाशीचा मेंदू किती छोटा असेल, याचा अंदाज सहज करता येईल. संशोधकांनी प्रथमच एका प्रौढ मधमाशीच्या (फ्रूट फ्लाय) एक मिलिमीटर मेंदूचा विस्तृत नकाशा तयार केला असून, त्यात थोडेथोडके नव्हे, तर चक्क १.३९ लाखाहून अधिक न्यूरॉन्स आढळून आले आहेत. मेंदूतील तांत्रिक पेशींना न्यूरॉन्स असे संबोधले जाते. संशोधकांनी यावेळी असा दावा केला आहे की, मनुष्यासह अन्य सर्व प्राण्यांच्या मेंदूची अधिक माहिती घेण्यासाठी हा शोध अनन्यसाधारण महत्त्वाचा असणार आहे.



अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठातील संशोधकांनी यावर सखोल संशोधन केले. ड्रोसोफिला मेलानोगास्टर असे शास्त्रीय नाव असलेल्या मधमाश्या न्यूरोसायन्ससाठी महत्त्वपूर्ण मॉडेल सिस्टीम आहेत. त्यांचा मेंदू मनुष्याच्या मेंदूप्रमाणे अनेक समस्यांचे निराकरण करू शकतो, असा होरा आहे. या संशोधकांमध्ये समाविष्ट असलेल्या न्यूरोसायंटिस्ट माला मूर्ती म्हणतात, आम्ही ज्या प्रश्नाचे उत्तर शोधत होतो, त्यामध्ये मेंदूतील सर्व घटकांचे एकमेकांशी असणारे कनेक्शन, न्यूरॉन्स कशा पद्धतीने संचलित असतात, यावर मुख्य भर होता. आम्ही जो नकाशा तयार केला, त्यात वायर डायग्राम आहे. त्याला कनेक्टोम असे म्हटले जाते. या संशोधनात मधमाश्यांच्या जटिल व्यवहाराला मेंदूची अंतर्गत संरचना कशी कार्यरत राहते, हे समजून घेण्यावर भर दिला गेला. मधमाश्यांवर यापूर्वी देखील बरेच संशोधन केले गेले आहे. एका संशोधनात असे आढळून आले की, मधमाश्या वेगाने मार्गोत्क्रमण करत असताना एकाच जागी अचानक थांबू शकतात आणि त्यानंतर पुन्हा त्याच वेगाने पुन्हा पुढे जाऊ शकतात. आणखी एका संशोधनात मधमाश्यांचे पराग शोधण्याची कला आणि टापटीप याच्याशी संबंधित सर्किटसचे विश्लेषण करण्यात आले. ◆◆◆



# इशारा सौरवादळाचा

भूकंप, सुनामी, पूर, वादळ अशी नैसर्गिक संकटे पृथ्वीवर येत असतात. पण, अंतराळातूनही पृथ्वीवर अनेक संकटे आहेत, ज्याची माहिती आपल्याला नाही. त्यापैकीच एक म्हणजे सौरवादळ. पृथ्वीवर तशी अनेक वादळे, चक्रीवादळे पाहिली आहेत. पण, शास्त्रज्ञांनी अलीकडेच सौर वादळाचा इशारा दिला आहे. सूर्यावर आलेले हे वादळ पृथ्वीला धडकण्याची शक्यता शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे. या महिन्याच्या सुरुवातीलाच सूर्यावर दोन मोठे स्फोट झाले आहेत. सूर्याच्या पृष्ठभागावरून दोन मोठ्या सौर ज्वाला बाहेर पडल्या. त्यांना कोरोनल मास इजेक्शन म्हणतात, जे थेट पृथ्वीच्या दिशेने गेले आहेत. शास्त्रज्ञांनी त्यांना एक्स-७ आणि एक्स-९ अशी नावे दिली आहेत. सूर्यावर आलेल्या वादळावर भारतीय शास्त्रज्ञही लक्ष ठेवून एक्स-९ फ्लेअर हा गेल्या सात वर्षांतील सूर्यापासून निघणारा सर्वात शक्तिशाली फ्लेअर आहे. सूर्याचा एक्स-९ पृथ्वीवर सौर कणांचा वर्षाव करेल. द स्पेस वेदर वेबसाईट आणि अनेक तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, या आठवड्याच्या शेवटी एक मोठे वादळ मॅग्नेटोस्फियरला धडकण्याची शक्यता आहे. सौर वादळ म्हणजे सूर्याद्वारे सूर्यमालेत प्रक्षेपित केलेले कण, ऊर्जा, चुंबकीय क्षेत्र आणि पदार्थ यांचा अचानक झालेला स्फोट. या वादळाला भूचुंबकीय वादळ किंवा वादळ असे म्हणतात. भारत लडाखमधून सूर्यावर लक्ष ठेवतो. सूर्यावर आलेल्या वादळावर भारतीय शास्त्रज्ञही लक्ष ठेवून आहेत. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या तज्ज्ञांनी सांगितले की, त्यांनी भारतीय उपग्रह ऑपरेटरना सर्व खबरदारी घेण्यास सांगितले आहे. वादळ निळ्या ग्रहाकडे सरकत असल्याने पुढील काही दिवस पृथ्वीसाठी महत्त्वपूर्ण आहेत.

**इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांना बसणार या वादळाचा सर्वाधिक फटका**

भूचुंबकीय वादळे पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रात मोठा अडथळा निर्माण करू शकतात. यामुळे उत्तर गोलार्धात रेडिओ ब्लॅकआऊट, पॉवर आऊटेज आणि अरोरा इफेक्ट होऊ शकतात. दक्षिण अटलांटिक आणि आफ्रिकेच्या काही भागांमध्ये तात्पुरतेसंप्रेषण ठप्प होऊ शकते. पृथ्वीभोवती फिरणाऱ्या या उपग्रहांमध्ये किरकोळ व्यत्यय येऊ शकतो आणि कमी-फ्रिक्वेंसी रेडिओ आणि नेव्हिगेशन सिस्टममध्ये समस्या निर्माण होऊ शकतात. मोबाईल, कॉम्प्युटर आणि कम्युनिकेशन सिस्टीम यांसारख्या इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांना वादळाचा सर्वाधिक फटका बसू शकतो. या वादळामुळे पृथ्वीवरील कोणालाही थेट इजा होणार नाही. कारण, पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र आणि वातावरण या सर्वात धोकादायक वादळांपासून आपले संरक्षण करते. ●●●

# पृथ्वीवर अवतरणार चांद्रभूमी

युरोपियन संशोधक पृथ्वीवर जणू काही चंद्रच आणण्याची तयारी करीत आहेत. युरोपियन स्पेस एजन्सी आणि जर्मन एअरोस्पेस सेंटरने जर्मनीच्या लूना ॲनालॉग फॅसिलिटीची स्थापना केली आहे. चंद्रावरील स्थितीची नक्कल करण्यासाठी बनवण्यात आलेली ही फॅसिलिटी भविष्यातील चांद्रमोहिमांसाठी अंतराळवीरांची मदत करण्यासाठी आहे. लूना ॲनालॉग फॅसिलिटीमध्ये ९०० टन ज्वालामुखीय शिळा आहेत, ज्या जर्मनीच्या आयफेल आणि इटलीच्या माऊंट एटनासारख्या भागातून आणलेल्या आहेत. या शिळांचा चुरा, तुकडे चंद्राच्या पृष्ठभागाची नक्कल करतात. ही फॅसिलिटी ७०० चौरस मीटर जागेत फैलावलेली आहे. अंतराळवीरांना चंद्रासारख्या स्थितीत काम करण्याचे ट्रेनिंग याठिकाणी देण्यात येईल. यामध्ये धुळीच्या वातावरणाचा सामना करणे आणि चंद्रावरील विवरांना समावेश आहे. चंद्रावरील कमी गुरुत्वाकर्षण स्थितीचीही नक्कल करण्यासाठी विशिष्ट ट्रॉलींचा वापर केला जाईल. एसाचे अंतराळवीर अलेक्झांडर गेर्स्ट यांनी या फॅसिलिटीची माहिती दिली आहे. याठिकाणी चंद्रावरील स्थितीची बहुतांशी नक्कल केली जाईल. त्यामध्ये चंद्राच्या पृष्ठभाग, धूळ, खडक आणि प्रकाशाचा समावेश आहे. याठिकाणी अशा स्पेससूटमध्ये अंतराळवीर वावरतील जे माणसाच्या चालण्या-फिरण्याच्या आणि पाहण्याच्या क्षमता मर्यादित करतात.



लूना फॅसिलिटीचे इंजिनिअर आणि मून स्ट्रॅटेजी लीड जुएर्गन श्लुत्ज यांनी सांगितले की, आमच्याकडे धुळीचे वातावरण आणि पृष्ठभागावरील गतिशीलता पुन्हा बनवण्यासाठी सुमारे ९०० टन सामग्री आहे. प्रोजेक्ट सध्या प्रोटोटाईपच्या टप्प्यात आहे. ◆◆◆

# उल्कापातांमुळे हरपले डायनासोर

एकेकाळी या पृथ्वीतलावर वेगवेगळ्या प्रजातीच्या, आकाराच्या शाकाहारी व मांसाहारी डायनासोरचेच साम्राज्य होते. पाण्यात राहणारे व आकाशात उडू शकणारे डायनासोरही त्या काळात होते. सुमारे ६६ दशलक्ष वर्षांपूर्वी सहा मैल लांबीचा एक लघुग्रह पृथ्वीवर आदळला आणि त्यातच डायनासोरांसह सुमारे ७५ टक्के प्रजाती नष्ट झाल्या, असे प्रचलित सिद्धांत सांगतो. परंतु, नवीन संशोधन एका वेगळ्याच घटनेवर प्रकाश टाकत आहे.

डायनासोर नष्ट होण्यासाठी ही एकच घटना कारणीभूत झाली नव्हती. अलीकडेच गिनीच्या किनाऱ्यावर पाण्याखाली सापडलेल्या एका खड्ड्यावरील संशोधनातून शास्त्रज्ञ एका निष्कर्षापर्यंत येऊन पोहोचले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, त्याकाळी पृथ्वीवर अनेक उल्का कोसळल्या होत्या. 'नेचर' या संशोधनपत्रिकेत प्रकाशित शोधनिबंधात त्यांनी म्हटले आहे की, आणखी एक मोठी उल्का पृथ्वीवर आदळली असावी, त्यामुळे डायनासोर नामशेष होण्यास हातभार लागला असेल. स्कॉटलंडमधील हेरियट-वॉट विद्यापीठाने नादर नावाच्या दुसऱ्या खड्ड्याच्या त्रिमितीय प्रतिमा प्रसिद्ध केल्या आहेत. हा खड्डा एका उल्कापातामुळे तयार झाला आहे. या स्फोटाने साडेपाच मैलापेक्षा मोठा खड्डा तयार केला आहे. संशोधकांचा असा अंदाज आहे की, ही उल्का सुमारे १/४ मैल लांबीची होती आणि पृथ्वीवर आदळताना तिचा वेग ताशी ४५ हजार किमीपेक्षा जास्त होता. ही उल्का डायनासोरच्या सामूहिक नाशासाठी जबाबदार असलेल्या लघुग्रहापेक्षा आकाराने लहान असली, तरीही यामुळे एकत्रितपणे अधिक मोठा परिणाम निर्माण झाल्याचे दिसतो. डॉ. उइस्डियन निकोलसन, हेरीयट-वॉट विद्यापीठातील मरीन जिओलॉजिस्ट आहेत. त्यांनी २०२२ साली नादर खड्ड्याची प्रथम ओळख पटवली. परंतु, या घटनेमुळे नेमके काय परिणाम झाले याची कल्पना नव्हती. याबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की, ''नवीन संशोधन हे या विनाशकारी घटनेचे नेमके चित्र उभे करते.''



डॉ. निकोलसन यांच्या नेतृत्वाखालील शास्त्रज्ञांच्या टीमला खात्री आहे की, समुद्रतळावर झालेल्या उल्कापातामुळे ९ किलोमीटरचा खोलगट भाग तयार झाला आहे. परंतु, या घटनेचा नेमका काळ कोणता म्हणजे मेक्सिकोमधील १६० कि.मी. आकाराचा चिक्सुलुब खड्डा निर्माण करणाऱ्या लघुग्रहाच्या धडकेपूर्वी



किंवा नंतर ही घटना घडली, याबाबत त्यांना अद्याप ठोस माहिती मिळालेली नाही. या प्रभावाविषयी अधिक जाणून घेण्यासाठी, शास्त्रज्ञांनी थीडी भूकंप इमेजिंगचा अवलंब करून या विवराचा आणि समुद्राच्या तळाच्या ३०० मीटर खाली आढळणाऱ्या इतर विविध भूभौतिकीय प्रभावांचा नकाशा तयार केला. ''जगभरात सुमारे २० समुद्री खड्डे निश्चित केले गेले आहेत आणि त्यापैकी कोणत्याही खड्ड्याचे इतक्या तपशिलात चित्रण झालेले नाही. हे चित्रण अतिशय उत्कृष्ट आहे,'' असे निकोलसन यांनी सांगितले. खड्ड्यांचा तळ हा छिन्नविच्छिन्न किंवा घासला गेलेला आहे. विशेषतः, हा खड्डा हजारो वर्षे जुना असल्यामुळे तळाचा शोध लावणे कठीण जाते. संशोधनानुसार, या उल्केच्या धडकेमुळे जोरदार भूकंप झाले. त्यामुळे महासागराच्या तळाखाली मऊ आणि ओलसर भूमी तयार झाली. या धडकेमुळे भूस्खलन झाले आणि ८०० मीटरपेक्षा उंच प्रचंड लाट तयार झाली, जी अटलांटिक महासागरभर पसरली असावी, असे अभ्यासक सांगतात. ◆◆◆

## शहरावर तीन हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

# गर्दीच्या ठिकाणांवर राहणार २४ तास वॉच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराच्या सुरक्षेसह विविध उपाययोजना करण्यासाठी स्मार्ट सिटी प्रकल्पातून निगडीत आयसीसीसी अर्थात इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरची उभारणी करण्यात आली. शहरातील सुमारे ३ हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची या केंद्राशी जोडणी करण्यात आली आहे. या सेंटरच्या माध्यमातून शहरातील रस्ते, महत्त्वाचे चौक, विविध महत्त्वाच्या तसेच गर्दीच्या ठिकाणांवर २४ बाय ७ लक्ष ठेवण्यात येत आहे.

पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ३० लाख लोकसंख्येच्या शहरावर २४ तास वॉच ठेवण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी इंटिग्रेटेड सिटी कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटर तयार केले आहे. पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि.च्या वतीने इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर (आयसीसीसी) उभारण्यात आले आहे. यामध्ये शहरातील सुमारे





३ हजार सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची या केंद्राशी जोडणी केली आहे. या सेंटरच्या माध्यमातून शहरातील रस्ते, महत्त्वाचे चौक, विविध महत्त्वाच्या तसेच गर्दीच्या ठिकाणांवर २४ बाय ७ लक्ष ठेवण्यात येत आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने कोठे काही अनुचित प्रकार घडत असल्यास, वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर तत्काळ कार्यवाही करणे आता शक्य होणार आहे. याशिवाय शहरातील कचरा उचलणाऱ्या सर्व वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवलेली असून या वाहनांचे संनियंत्रणही या कमांड सेंटरच्या माध्यमातून केले जाणार आहे.

शहरात तीन हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. भूमिगत ऑप्टिकल फायबर केबल नेटवर्किंगचे कामही पूर्ण झाले आहे. सीसीटीव्ही कॅमेरा केबल नेटवर्किंगशी जोडण्यात आले आहे. शहरातील ६०० किलोमीटर अंतराचे केबल नेटवर्किंग व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे उभारण्यात आले आहे. ही यंत्रणा निगडी येथील टिळक चौकातील संत तुकाराम व्यापारी संकुलातील स्मार्ट सिटीच्या कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटरशी जोडण्यात आली आहे. देशात प्रत्येक मेट्रोपोलिटन सिटीसाठी कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटर बंधनकारक आहे. त्यानुसार स्मार्ट सिटीअंतर्गत तब्बल ४४१ कोटी २३ लाख खर्च करून हे सेंटर उभारण्यात आले आहे.

पहिल्या टप्प्यात 'अ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीवर २४ तास नियत्रंण व देखरेख ठेवण्यास सेंटरच्या माध्यमातून सुरुवात झाली. त्याची सुरुवात तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी ऑगस्ट २०२२ ला केली. उर्वरित सात क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत सेंटरद्वारे २४ तास वॉच ठेवला जात आहे. शहरात कोणतीही अनुचित घटना घडू नये. शहराच्या सुरक्षेसाठी हे सेंटर २४ तास कार्यान्वित राहणार आहे. हे सेंटर १०० टक्के कार्यान्वित झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयास वर्ग करण्यात येईल.

### शहरासाठी सेंटर महत्त्वाचा दुवा

स्मार्ट सिटीच्या पॅन सिटी अंतर्गत कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटर उभारण्यात आले. ते काम टेक महिंद्रा कंपनीकडून केले आहे. त्यासाठी ४११ कोटी २३ लाखांचा खर्च झाला आहे, तर ५० किऑस्क, ५५ व्हीएमडी, २७० वाय-फाय पोल, ६९० स्मार्ट पोल, व इतर कामे लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीकडून केली आहेत. त्यासाठी २२५ कोटी खर्च झाला. असे एकूण तब्बल ६६६ कोटींपेक्षा अधिक खर्च करण्यात आला.

### या सुविधेद्वारे राहणार नियंत्रण

निगडी येथे इंटिग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटरमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा, स्मार्ट पर्यावरण व्यवस्थापन, स्मार्ट वाहतूक व्यवस्थापन, स्मार्ट वॉटर आदींचे व्यवस्थापन, समन्वय, सहयोग व निरीक्षण आदी नियंत्रण करणे शक्य होणार आहे. त्यासाठी स्मार्ट ट्रॅफिक अंतर्गत १२१० कॅमेऱ्यांद्वारे रस्त्यावरील ट्राफिक सिग्नलचे होणारे उल्लंघन, झेब्रा क्रॉसिंग किंवा स्टॉप लाईन डिटेक्शन, गतीचे उल्लंघन, चुकीच्या दिशेने वाहनांची होणारी वाहतूक, ड्रायव्हिंग करताना मोबाईल फोनचा वापर यावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने त्याचा वापर करता येणार आहे. तसेच शहरातील पाण्याचे, घनकचरा व्यवस्थापनाचे, वाहतूक कोंडीचे निरीक्षण व नियंत्रण या मार्फत करण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे ४४१ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

### यासाठी होणार उपयोग

पिंपरी-चिंचवड शहराची कायदा व सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी, वाहतूक, रहदारी, दंगल, जमाव नियंत्रित करण्यासाठी सेंटरचा मोठा उपयोग होणार आहे. पर्यावरण, घनकचरा व्यवस्थापन, वाहनतळ, पाणीपुरवठा, पीएमपी बस वाहतूक, महापालिकेचे कामकाज आदी कामे सेंटरमधून केली जाणार आहेत. शहराला वेगवान इंटरनेट सुविधा, वाय-फाय, किऑस्कची सुविधा या माध्यमातून मिळणार आहे. व्हीएमडीवर दररोज हवामान, प्रदूषणाची पातळी, पालिका व पोलिसांकडून दिले जाणारे संदेश नागरिकांना दिसणार आहेत. तसेच, महापालिकेच्या विविध विभागाची तसेच, संपूर्ण शहराची सर्व माहिती या सेंटरमध्ये संग्रहित केली जाणार आहे.

Selected



## आयटीआय प्रवेशाला पुन्हा मुदतवाढ, वेळापत्रक जाहीर

**पिंपरी :** औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) प्रवेश प्रक्रियेला ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातर्फे आयटीआय अभ्यासक्रमासाठी शनिवारी (ता. १९) प्रवेशाचे पुरवणी वेळापत्रक जाहीर केले. वेळापत्रकाप्रमाणे २३ ऑक्टोबरपर्यंत विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरुस्ती करणे व प्रवेशअर्ज शुल्क भरणे, अर्ज निश्चितीची प्रक्रिया करता येणार आहे. केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय अंतर्गत प्रशिक्षण महासंचालनालयाने (डीजीटी) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील (आयटीआय) प्रवेश प्रक्रियेला ३० ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात येत असल्याचे जाहीर केले. शनिवारी समुपदेशन फेरीचे वेळापत्रक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने जाहीर केले. सकाळी आठ वाजता फेरीला सुरवात होईल. दुपारी १२ पर्यंत प्रवेशोत्सुक व नोंदणीकृत उमेदवारांनी आयआयटी संस्थामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे.

## चिंचवड स्टेशनला चंद्रावर आधारित गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन

**पिंपरी :** चिंचवड स्टेशन येथील एम्पायर इस्टेट ज्येष्ठ नागरिक संघाच्या विरंगुळा केंद्रात 'चंद्र' यावर मराठी व हिंदी गीतांचा कार्यक्रम झाला. तसेच ऑक्टोबर महिन्यातील सभासदांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. जयकुमार नारकर, सतीश पैठणकर, यतीन पारेख, रमेश बाहेती, सुरेश व्यास, विनोद म्हाळसेकर, वंदना काळे, विजय भोंडोकर उपस्थित होते. शरद आढाव, गोपाळ कुलकर्णी, अशोक उंडे, डॉ.जगन्नाथ पाटील, रामचरण राय, नटराजन श्रीनिवासन, छाया भामरे, रघुनाथ लोखंडे, राजेंद्र चोथे, उमा पाटील, अर्चना नलावडे, लाजवंती तावरानी, प्रेरणा कुलकर्णी, विनोद अग्रवाल, वासंती घोलप, संगीता व्होरा, उषा गोकर्ण, डॉ. अस्मिता मोरे, माधुरी पिंपुटकर यांनी अतिशय सुंदरपणे गाणी सादर केली. सुयश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. सचिव ॲड. दिलीप पाटील यांनी आभार मानले.

## गुणवत्ता यादीत येऊनही विद्यार्थिनीच्या प्रवेशास नकार

**पिंपरी :** कागदपत्रांत तफावत असल्याचे कारण देत पिंपळे गुरव येथील विद्यार्थिनी रिया निकाळजे हिचा ताथवडेमधील बालाजी विधी महाविद्यालयात मिळालेला प्रवेश रद्द करण्यात आला. मागास प्रवर्गातील रियाचा गुणवत्ता यादीत क्रमांक आला आहे. मात्र, महाविद्यालय प्रशासनाने वैयक्तिक कारणावरून ७० पर्सेंटाइल असणाऱ्या रिया सोडून ३८ असे पर्सेंटाइल असणाऱ्या एका विद्यार्थ्याला प्रवेश दिल्याचे समोर येत आहे. त्या विरोधात पालकांनी सीईटी सेल आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे लेखी दाद मागितली आहे. तरीही सेलच्या निर्णयाआधीच रियाचा प्रवेश रद्द का केला? तसे करणाऱ्यांवर कारवाई होणार का? असे प्रश्न पालक विचारत आहे.

वास्तविक पाहता, सीईटी सेलच्या नियमानुसार विधी पदवी अभ्यासक्रमात गुणवत्ता यादीप्रमाणेच प्रवेश झाले पाहिजे. परंतु, रिया निकाळजे हिला ७० पर्सेंटाइल मिळाले आहेत. गुण असतानाही नामांकित महाविद्यालयांनी संस्थात्मक स्तरावरील प्रवेश प्रक्रियेत व कॅप राऊंडनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवर राबविलेल्या प्रवेश प्रक्रियेत गोंधळ घातल्याचा आरोप गेल्या काही दिवसांपासून पालकांकडून केला जात आहे. रियाला खाते वही (लेजर), गॅप सर्टिफिकेट नसल्याचे कारणे देत विधी महाविद्यालयात मिळालेला प्रवेश नाकारला आहे. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना नियमानुसार प्रवेश देण्यात यावेत, अशी मागणी पालक करत आहे.

## चिखलीतील कंपनीच्या मशिनमध्ये अडकून कामगाराचा मृत्यू

**पिंपरी :** मशिनमध्ये अडकून एका कामगाराचा मृत्यू झाला. ही घटना चिखलीच्या कुदळवाडीतील नफी स्टील यार्ड या कंपनीत घडली.

मोहनलाल जोखनप्रसाद गौतम (रा. उत्तर प्रदेश) असे मृत्युमुखी पडलेल्या कामगाराचे नाव आहे. याप्रकरणी कंपनीचे मालक फैयाज उमर शेख (वय ५२), फारुख उमर शेख (वय ५८, रा. जांभूळकर चौक, वानवडी, पुणे) यांना चिखली पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींनी त्यांच्या कंपनीतील मशिनवर काम करण्यासाठी प्रशिक्षित कामगार ठेवणे आवश्यक होते. प्रशिक्षण नसलेल्याने मशिन चालविल्यास त्यात अडकून एखाद्याचा मृत्यू होऊ शकतो, हे माहीत असतानाही आरोपींनी प्रशिक्षण नसलेल्या मोहनलाल गौतम यांना मशिनवर काम करण्यास भाग पाडले. दरम्यान, मशिनवर काम करताना मोहनलाल मशिनमध्ये अडकले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. चिखली पोलीस अधिक तपास करीत आहेत

राष्ट्रसंचार अंतरीक्ष विज्ञान रा

## मावळ विधानसभेत ३ लाख ८० हजार मतदार

**पिंपरी : –** महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीची कार्यक्रमपत्रिका जाहीर झाली आहे. निवडणूक आयोगाने राज्य विधानसभा निवडणूकीची घोषणा केल्यानंतर वडगाव मावळ येथे प्रांताधिकारी सुरेंद्र नवले, तहसीलदार विक्रम देशमुख यांनी पत्रकार परिषद घेत मावळ विधानसभा मतदारसंघाबाबत महत्वाची माहिती दिली.

मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ३ लाख ८० हजार २९७ मतदारसंख्या असून, ४०२ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या आदर्श आचारसंहितेचे पालन करावे, असे आवाहन प्रांताधिकारी सुरेंद्र नवले यांनी केले आहे.

मावळ विधानसभेसाठी वडगाव येथील तहसील कार्यालयात दि. २२ ते २९ ऑक्टोबर पर्यंत नामनिर्देशन अर्ज स्वीकारण्यात येतील. दि. ३० ऑक्टोबरला अर्जांची छाननी होइल, तर ४ नोव्हेंबरला दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज माघारी घेण्याची मुदत असून त्यानंतर चिन्ह वाटप करण्यात येणार आहे. तसेच २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर तळेगाव येथील नूतन इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सर्व मतपेट्या सुरक्षित ठेवल्या जातील आणि २३ नोव्हेंबर रोजी इथेच मतमोजणीची प्रक्रियाही पार पडणार आहे.

### मावळ विधानसभा मतदारसंघ आकडेवारी

- मतदारसंघामध्ये १ लाख ९४ हजार ८३३ पुरुष मतदार
- मतदारसंघामध्ये १ लाख ८५ हजार ४५९ महिला मतदार
- मतदारसंघामध्ये इतर (तृतीयपंथीय) १३ मतदार
- मावळ विधानसभेत एकूण ३ लाख ८० हजार २९७ मतदार
- मतदारसंघात एकूण ४०२ मतदान केंद्र



## पुस्तक आपले मित्र...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी** वाचन प्रेरणा दिनानिमित्त खिंवसरा पाटील विद्यामंदिरात विद्यार्थ्यांसाठी विविध नाट्यवाचन, कथाकथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी परिसरातून काढलेली ग्रंथदिंडी.

## वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रमांचे आयोजन

# खिंवसरा पाटील विद्यामंदिरात नाट्यवाचन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाकड :** पुस्तकांचा मनोरा, पुस्तकातून वाचन प्रेरणा दिन शब्दाची प्रतिकृती, पुस्तक जत्रा व साहित्याच्या विविध प्रकारांचे वाचन याद्वारे गणेश नगर, थेरगाव येथील खिंवसरा पाटील विद्यामंदिरात वाचन प्रेरणा दिन साजरा करून डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यार्थिनींनी मराठी भाषेचे सौंदर्य व्यक्त करणारे गीत सादर केले.

कवयित्री अनघा कुलकर्णी यांनी सुंदर बाल कवितांचे सादरीकरण केले. क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीच्या सहकार्यवाह डॉ. नीता मोहिते यांनी वाचनाचा वेग कसा वाढवावा? याचे गमक सांगितले. मीना जाधव यांनी अब्दुल कलाम लिखित अग्निपंख पुस्तकाचे परीक्षण सादर केले. अनेक विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता, नाट्यवाचन, कथाकथन सादर केले. यावेळी चैत्राली कुलकर्णी, नितीन बारणे आदी उपस्थित होते.

परिसरातून काढलेली ग्रंथदिंडी, पुस्तक मनोरा व पुस्तकांच्या माध्यमातून साकारलेली शाब्दिक प्रतिकृती या गोष्टी विद्यार्थ्यांसाठी, पालकांसाठी आकर्षण ठरले. साक्षी कुरळे, वीणा तांबे, कृतिका काळे, संतोषी चौधरी, श्रद्धा हुंडेकर, स्वाती नांगरे, पूजा चांदेकर, संदीप बरकडे, शुभांगी धिवार, प्रमोदिनी बकरे यांनी संयोजन केले. स्मिता जोशी यांनी प्रास्ताविक केले. सीमा आखाडे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक नटराज जगताप यांनी आभार मानले.

## नियोजित कामे पूर्ण करायची तयारी सुरू

# दिवाळीच्या तोंडावर लघुउद्योग अडचणीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** दिवाळीच्या तोंडावर शहरातील लघु उद्योगांवर वीज पुरवठा खंडित केला जाण्याची टांगती तलवार आहे. सध्या दिवाळीपूर्वी नियोजित कामे पूर्ण करायची तयारी सुरू आहे. मात्र, वीज पुरवठा खंडित केल्याने अनेक उद्योजकांची काम थांबली आहेत. यापूर्वी उद्योजकांना देण्यात येणारी विज बिल भरण्याची हप्त्याची सुविधा पुन्हा सुरू करावी अशी मागणी उद्योजकांनी केली आहे. उद्योजकांच्या अडचणी लक्षात घेऊन एखादा महिना चुकल्यास त्याबाबत सहकार्य करावे अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

पिंपरी-चिंचवड शहर औद्योगिक नगरी म्हणून ओळखले जाते. अनेक छोट्या-मोठ्या कंपन्यांच्या माध्यमातून तरुण वर्गाला मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे. मात्र शासनाकडून कोणतीही मदत मिळत नसल्याने आधीच विविध समस्येच्या गर्तेत सापडलेले उद्योजक कसेबसे तग धरून आहेत. आता महावितरणने



उद्योजकांना लक्ष्य केल्याचे दिसते.

आर्थिक अडचणीचा सामना करतानादेखील लघुद्योगांकडून वीजबील भरण्याची खबरदारी घेतली जात आहे. मात्र कामगारांना दिवाळीचा बोनस व अन्य कारणांमुळे वीजबील वेळेत न भरणाऱ्या लघुउद्योगाचा वीजपुरवठा खंडीत केला जात आहे. त्याऐवजी या लघुउद्योगांना वीजबील सुलभ हप्त्यांमध्ये भरण्याची सवलत पुन्हा सुरू करावी, अशी मागणी फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी केली आहे.

परिसरात हजारो इंडस्ट्रीज आहेत. सध्या थकीत वीज बिलामुळे अनेक उद्योग बंद अवस्थेत आहेत. पूर्वी उद्योगांना वीज बिलामध्ये सुलभ हप्त्यांची सवलत होती. सध्या शासनाने ती सवलत बंद केलेली आहे. त्यामुळे अनेक लघु उद्योगावर मोठा गंभीर परिणाम होऊन उद्योग बंद अवस्थेमध्ये गेले आहेत. दिवाळीतही कामगारांना बोनस आणि विविध प्रकारचे खर्च कंपनीवर येत असतात. या काळात वीज बंद झाल्यास उद्योगांचे मोठे नुकसान होते. मोठ्या कंपन्यांकडून दोन ते तीन महिन्याच्या कालावधीत बिलाचे पेमेंट मिळत असते. त्यामुळे लघु उद्योगांना आर्थिक बोजा सहन करावा लागतो. परिणामी खेळते भांडवल मिळण्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अनेकदा इच्छा नसूनही खासगी सावकाराकडून कर्ज उचलावे लागते.

वीज बिलामध्ये सुलभ हप्ते योजना मिळाल्यास लघु उद्योगांना वीज बिल वेळेमध्ये भरता येतील व उद्योग सुरळीत चालू राहतील.

## आठवडाभरात सायबर पोलीस ठाण्यात एकच गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** किती रकमेच्या फसवणुकीपर्यंतचे गुन्हे सायबर पोलीस ठाण्यात दाखल करायचे, याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. त्यामुळे गेल्या आठवडाभरात केवळ एकच गुन्हा सायबर पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. लवकरच पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे याबाबत निर्णय घेण्याची शक्यता आहे. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात दसऱ्याच्या मुहुर्तावर सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित झाल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे पोलिसांनी दिली.

एवढेच नव्हे तर नव्याने कार्यान्वित झालेल्या पोलीस ठाण्यात एक गुन्हा देखील दाखल झाल्याचे सांगण्यात आले. मात्र त्यानंतर गेल्या आठवडाभरात एकही गुन्हा सायबर पोलीस ठाण्यात दाखल झाला नाही. त्याऐवजी स्थानिक पोलीस ठाण्यात सायबर क्राइमची नोंद होत असल्याचे दिसून आले.

सायबर पोलीस ठाण्यात एक पोलीस निरीक्षक, तीन सहायक निरीक्षक, पाच उपनिरीक्षक आणि ४५ कर्मचारी आहेत.

## महापालिकेकडून काहीच कारवाई नाही

# बीआरटी मार्गावर साचले कचऱ्याचे ढीग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** हिंजवडी आयटी पार्क, महामार्ग आणि पुणे शहराला जोडणारा मुख्य रस्ता म्हणून औंध ते किवळे या बीआरटी मार्गाकडे पाहिले जाते. तसेच, शहरातील सुरू असलेल्या काही मार्गापैकी हा एक मार्ग विनाअडथळा सुरू आहे. मात्र वाकड फाट्याजवळील बीआरटी मार्गालगत कचऱ्याचे ढीग साचले आहेत. त्यामुळे, सर्वत्र दुर्गंधी पसरली असून त्याचा त्रास परिसरातील नागरिकांना होत आहे. याबाबत महापालिकेने



कोणतीही कारवाई केली नसल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

सफाई कर्मचाऱ्यांकडून या ठिकाणी आजूबाजूचा कचरा गोळा करून ठेवला जातो. नंतर, तो घंटागाडीमार्फत इतरत्र हलवला जातो. मात्र, अनेकदा घंटागाडी येत नसल्याने या ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे..ओला, सुका कचरा साचल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे.

तसेच डासांचे प्रमाणदेखील वाढल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याचा सर्वाधिक फटका येथील व्यापाऱ्यांना बसत असल्याने त्यांनी पालिकेच्या कारभाराविषयी प्रचंड संताप व्यक्त केला आहे. पालिकेच्या थेरगाव क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे तसेच, बीआरटी परिसर नेहमीच स्वच्छ राहील यासाठी ठोस पावले टाकावी अशी मागणी नागरिक करत आहेत.

डांगे चौकातील वाकड फाट्याजवळील बीआरटी मार्ग सध्या नागरिकांसाठी डोकेदुखी बनला आहे. तसेच, अनेकजण दुचाकीवर येऊन कचरा फेकून निघून जाताना दिसून येतात.

- कचरा वेळोवेळी उचलला जात नाही. त्यामुळे परिसरात कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत आहे. यामुळे कुत्र्यांचाही त्रास वाढला आहे. एकीकडे स्वच्छ परिसराच्या गप्पा मारत असताना दुसरीकडे रस्त्यावरती दुर्गंधीचे राज्य अशी परिस्थिती आहे.

#रा

## कर्मचाऱ्यांना विधानसभेच्या कामकाजांचे वाटप

# प्रशासनाकडून निवडणुकीच्या तयारीला जोरदार सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा करताच पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तिन्ही विधानसभा मतदारसंघात प्रशासनाकडून कामकाजाला सुरुवात केली आहे. सध्या विविध आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना विधानसभेच्या कामकाजांचे वाटप करण्याचे काम सुरू आहे.

शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील १६ लाख ३४ हजार ७६८ मतदारांसाठी १४४२ मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. तसेच तिन्ही मतदारसंघातील मतदान यंत्रे ठेवण्यासाठी जागा निश्चित केल्या आहेत. मतदान यंत्रे आली की त्यांची तपासणी करण्यात येणार आहे. शहरातील तिन्ही विधानसभा निवडणुकीची मतदार यादी अंतिम झाली आहे. मतदानाची केंद्रेही निश्चित आहेत. मतदान यंत्रांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. मतदानाच्या दृष्टीने आवश्यक तयारी झाली आहे. पालिकेचे इतर विभागातील ५० टक्के कर्मचारी निवडणुकीच्या कामांसाठी वर्ग करण्यात येणार आहे.

### फिरती तसेच स्थिर सर्वेक्षण पथके

- भोसरी विधानसभेतील आदर्श आचारसंहिता, फिरती सर्वेक्षण पथके (एफएसटी) आणि



स्थिर सर्वेक्षण पथके (एसएसटी), निवडणुकीतील पैशाचा वापर, अमली पदार्थ, मद्य, मौल्यवान धातू यांची जप्ती यासाठीची यंत्रणा, निवडणूक प्रचारासाठी करण्यात येणाऱ्या जाहिरातींचे प्रमाणीकरण, निवडणुकीसाठी केलेल्या व्हीएचए, सी- व्हिजिल, केवायसी, सुविधा पोर्टल आदी संगणकीय व्यवस्था, उपयोजके (ॲप्लिकेशन्स) यांची तयारी पूर्ण झाली आहे. तसेच मतदारसंघात एक महिला, दिव्यांग, युवा संचालित, संकल्पना आधारित विशेष मतदान केंद्रे, असणार आहेत

### मतदान यंत्रांची तपासणी

- शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघासाठी मतदान यंत्रे मागवण्यात आली असून विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर यंत्रांची तपासणी पूर्ण करण्यात येणार आहे. यामध्ये मतदान यंत्रणाची प्रथमस्तरीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर मतदान यंत्रणावर मतदानाचे प्रात्यक्षिक घेण्यात येणार आहे.

### मतदारसंघनिहाय आकडेवारी

| मतदारसंघ | एकूण लोकसंख्या | मतदान केंद्रे |
|---|---|---|
| चिंचवड | ६ लाख ५० हजार ७०९ | ५६१ |
| पिंपरी | ३ लाख ८७ हजार ७ | ३९८ |
| भोसरी | ५ लाख १७ हजार ५२ | ४८३ |

# भाजपा आमदार महेश लांडगेंचा विजयाचा निर्धार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** "जन्मदाती आईनंतर जास्त प्रेम देते, आपुलकीने जपते, जगायला शिकवते ती मावशी म्हणूनच भोसरी माझी आई; तर चऱ्होली माझी मावशी आहे. माझ्या राजकीय वाटचालीमध्ये चऱ्होलीकरांनी कायम साथ दिली. माझे जीवाभावाचे सहकारी यांच्या सोबतीने चऱ्होलीतील ग्रामदैवत श्री. वाघेश्वर महाराज यांचा आशिर्वाद घेतला आणि निवडणूक प्रचाराला सुरुवात करण्यात आली. "जब साथ हो मेरे दोस्त... तो संघर्षपथपर विजय निश्चित हैं..! " याची अनुभूती येते आहे. अत्यंत सकारात्मक- मंगलमय वातावरणात निवडणुकीचा प्रचार सुरू आहे", अशा भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.

भोसरी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने आमदार लांडगे यांनी चऱ्होली गावचे ग्रामदैवत श्री. वाघेश्वर महाराज मंदिरात दर्शन घेवून प्रचाराला सुरूवात केली. यावेळी माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी महापौर नितीन काळजे म्हणाले की, आम्ही महेश लांडगेंसोबत २०१४ साली गेलो. त्यावेळी कोणतीही अपेक्षा न ठेवता गेलो होतो. महानगरपालिकेत पहिल्यांदा भाजपाची सत्ता आली. २०१७ मध्ये मला महापौरपदाची संधी मिळाली. मी नितिमत्ता जपणारा माणूस आहे. चऱ्होलीला, मला एव्हढे मोठे पद महेश लांडगे यांच्यामुळेच मिळाले.

महापालिकेत चऱ्होली गावचा समावेश झाला. १७ वर्षे साधा डीपी रस्ता करता आला नाही. पूर्वीची परिस्थिती काय होती, हे चऱ्होलीकरांना माहिती आहे.

## » Selected



## एसटी कर्मचाऱ्यांना ताणतणाव व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**पिंपरी :** एसटी महामंडळात काम करणाऱ्या राज्यभरातील प्रत्येक घटकाला प्रशिक्षण देण्याचे काम भोसरी येथील महामंडळाच्या मध्यवर्ती प्रशिक्षण केंद्रातून चालते. सेवापुर्व व उजळणी अशा दोन प्रकारच्या निवासी प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्याचे ताण-तणाव व्यवस्थापन होत असून त्यांच्या कार्यक्षमतेत सुधारणा होत असल्याचे येथील प्रशिक्षक सांगत आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मार्फत राज्यासह परराज्यातही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था केली जाते. भोसरी येथील नाशिक महामार्गालत असलेल्या एसटी महामंडळाच्या या मध्यवर्ती प्रशिक्षण केंद्राची १९७२ साली स्थापना झाली. राज्याच्या गाव खड्यात पोहचणाऱ्या या लालपरीसाठी काम करणाऱ्या मॅकॉनिक, चालक, वाहक, यांत्रिक, पर्यवेक्षक व अधिकारी या क्षेणीमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला या केंद्रात प्रशिक्षण दिले जाते. एसटी महामंडळात सुमारे एक लाख कर्मचाऱ्यांपैकी दरवर्षी ४५०० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी वर्षभर आधीच कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणाचे नियोजन केलेले असते.

## पीएमआरडीएच्या कायम कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाठोपाठ पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) अंतर्गत कर्मचाऱ्यांचीही दिवाळी गोड होणार आहे. मात्र, वरिष्ठ अधिकारी वगळता केवळ गट 'क' आणि 'ड' या दोन गटाला त्याचा लाभ मिळणार आहे. त्या अनुषंगाने प्रशासकीय स्तरावर निर्णय झाला असून संबंधित कर्मचाऱ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न यातून होणार आहे.

पीएमआरडीएच्या कायम आस्थापनेवरील सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षात कार्यरत असणाऱ्या गट 'क' आणि 'ड' वर्गातील कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या सणानिमित्त सानुग्रह अनुदान देण्याच्या अनुषंगाने २४ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या प्राधिकरण सभेत मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त प्रतिकर्मचारी २८ हजार ८७५ रुपये सानुग्रह अनुदान म्हणून अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्या मान्यतेने प्रशासन विभागाचे सह-आयुक्त सुनील पांढरे यांनी यासंबंधी १४ ऑक्टोबर २०२४ रोजी आदेश काढत लेखा वित्त विभागाला कळवले आहेत.

# मेट्रोच्या कामासाठी पीएमपीएल बसथांबे तात्पुरते हटविले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी ते निगडीपर्यंत सुरू असलेल्या मेट्रोच्या कामात अडथळा ठरणाऱ्या पीएमपीएमएल बसचे थांबे तात्पुरते हटविण्यात आले आहेत. काम पूर्ण झाल्यानंतर पुन्हा हे थांबे लावण्यात येतील, असे पीएमपीएमएल प्रशासनाने सांगितले आहे.



आकुर्डी, मोरवाडीसह चिंचवड स्टेशन येथील जुने बसथांबे हटविण्यात आले आहेत. पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपीएमएल) पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात ऐंशीहून अधिक नवीन स्टेनलेस स्टीलचे बस शेड बसविले आहेत, तर पिंपरी-चिंचवड शहरात पंधरा बस शेड आहेत.

यातील नऊ बस शेड हे निगडी दापोडी बीआरटी मार्गाला समांतर मार्गावर बसविले आहेत. मात्र, त्यानंतर बस थांबा उभारण्याचे काम थांबले होते. जागेचे सर्वेक्षण त्याचप्रमाणे मेट्रोच्या कामामुळे थांबे उभारण्यात येत नव्हते. तर आता उभारलेले नवीन थांबे देखील काढण्यात आले आहेत.

पाच महिन्यांपूर्वी आकुर्डीत लाखो रुपये खर्चून उभारलेले बस शेड काढले आहेत. हिंजवडी येथील शिवाजी चौक, बाणेर रस्ता येथील बस थांबा काढून टाकण्यात येणार आहे.

याबाबत मेट्रोकडून पत्र व्यवहार करण्यात आला आहे. मेट्रोकडून पीएमपी प्रशासनाकडे तसेच, वाहतूक नियोजन विभागाकडे बस थांबे हटविण्याबाबत पत्र प्राप्त होते. ते बस थांबे तात्पुरते दुसरीकडे स्थलांतर केले जातात अथवा काढून ठेवण्यात येतात. काम झाल्यानंतर पुन्हा बसविण्यात येतील, अशी माहिती पीएमपीएमएलचे कार्यकारी अभियंता डी. एम. तुळपुळे यांनी दिली.



## आकुर्डीत सृजन प्रतिष्ठानतर्फे समाजदूत पुरस्काराचे वितरण

**आकुर्डी :** सृजन प्रतिष्ठानच्यावतीने, आकुर्डी येथे उल्लेखनीय कार्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुरेश बेरी, ज्येष्ठ कवयित्री शोभा जोशी, ज्येष्ठ रंगकर्मी रमेश वाकनीस आणि नेत्रतज्ज्ञ डॉ.सुशील मुथियान यांना समाज दूत पुरस्काराने गौरविण्यात आले. आकुर्डीमधील बीना इंग्लिश मीडियम स्कूलच्या सभागृहात वरील कार्यक्रम झाला. समाज दूत पुरस्कार सोहळ्याचे हे पाचवे वर्ष होते. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. तुकाराम पाटील, राजेंद्र घावटे, आत्माराम हारे, ज्येष्ठ पत्रकार विवेक इनामदार, फुलवती जगताप, राधा वाघमारे, अरुणा वाकनीस, पिहू जोगळेकर, राजू जाधव, रजनी अहेरराव आदी उपस्थित होते. समाज ऋण फेडण्यासाठी प्रत्यक्ष चळवळीत काम करत राहिल्याचे मत डॉ.बेरी यांनी व्यक्त केले. इनामदार यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष विवेक कुलकर्णी यांनी वडिलांच्या प्रती ऋण व्यक्त करत त्यांच्याबद्दलच्या आठवणी सांगितल्या. संस्थेचे सदस्य सुरेश कंक यांनी प्रास्ताविक केले. सविता इंगळे यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ साहित्यिक राज आहेरराव यांनी आभार मानले. राज अहेरराव, राजू जाधव यांचे सहकार्य लाभले. निगडीतील कवी, गजलकार आणि मुक्त पत्रकार विवेक कुलकर्णी यांनी संयोजन केले.

## कोट्यवधी रुपयांचा फायदा दाखवून ३३ लाखांची फसवणूक

**पिंपरी :** गुंतवणुकीत कोट्यवधी रुपयांचा फायदा झाल्याचे आमिष दाखवून एकाची ३३ लाख रुपयांची फसवणूक केली. हा प्रकार दिघी येथे घडला. याप्रकरणी दिघी येथील ३३ वर्षीय व्यक्तीने दिघी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, त्यानुसार अज्ञात आरोपींवर गुन्हा दाखल झाला आहे. आरोपींनी फिर्यादी यांच्याकडून शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीसाठी ऑनलाइन स्वरूपात पैसे स्वीकारले. फिर्यादी यांनी केलेल्या गुंतवणुकीतून त्यांना त्यांच्या गुंतवणुकीतून दिवसागणिक करोडो रुपयांत आभासी स्वरूपात वाढत असल्याचे एका मोबाईल ॲप्लिकेशन प्रोफाइलमध्ये दाखवले. फिर्यादी यांच्या मोबाईल नंबरवरील व्हॉट्सॲपवर तसेच टेक्स्ट मेसेज पाठवून सतत पैसे गुंतवणुकीसाठी प्रोत्साहित केले. त्यांच्याकडून टप्प्याटप्प्याने ३३ लाख ३० हजार स्वीकारले. त्याबदल्यात फिर्यादी यांना कोट्यवधी रुपयांचा फायदा झाल्याचे आमिष दाखवून त्यांची आर्थिक फसवणूक केली.

पान १ वरून

## विद्यमान 'आमदारांवर'च महायुतीचा विश्वास!

पत्नी सुलभा गायकवाड यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. कामाठीमधून भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. कर्जत जामखेड मतदारसंघातून आमदार राम शिंदे रिंगणात आहेत. शिंदे यांची लढत शरद पवार यांचे नातू आमदार रोहित पवार यांच्याशी होणार आहे.

पुण्यातील विधानसभेच्या जागेसाठी संभाव्य नवीन उमेदवारांच्या अटकळांना पूर्णविराम देत भाजपने रविवारी विद्यमान आमदार चंद्रकांत पाटील, सिद्धार्थ शिरोळे आणि माधुरी मिसाळ यांना अनुक्रमे कोथरूड, शिवाजीनगर आणि पर्वती मतदारसंघातून उमेदवारी दिली. भाजपच्या पहिल्या यादीत सुनील कांबळे आणि भीमराव तापकीर यांचा समावेश नसल्यामुळे येथे कोणाला संधी मिळणार, याची उत्सुकता कायम आहे.

पर्वती आणि कोथरूडमध्येही इच्छुकांमध्ये अस्वस्थता पाहायला मिळत आहे. तीन वेळा आमदार राहिलेल्या मिसाळ यांना श्रीनाथ भिमाले यांचे आव्हान असून, भिमाले यांना महामंडळ मिळेल, असे मानले जाते. मात्र, ते उमेदवारीवर ठाम होते. कोथरूडमध्ये अमोल बालवडकर हे इच्छुक होते. गेल्या आठवड्यात, चंद्रशेखर बावनकुळे यांनी बालवडकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांना सबुरीने घेण्याचा सल्ला दिला होता. शिवाजीनगरमध्ये भाजप नव्या उमेदवाराला संधी देईल, असे मानले जात होते. मात्र, भाजपने सलग दुसऱ्यांदा शिरोळे यांच्या चेहऱ्यावर विश्वास ठेवला आहे.

## महायुतीचा तिढा दोन दिवसांत...

वाटपाबाबत महायुतीत कुठलाही वाद नाही. जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आहे. शुक्रवारी ही महायुतीची सकारात्मक चर्चा झाली आहे. ज्या अडचणीच्या जागा होत्या त्यात अर्ध्यापेक्षा जास्त जागांवर तोडगा निघाला आहे. उरलेल्या जागा दोन दिवसांत फायनल होतील. ज्या जागांवर शिक्कामोर्तब झाले त्या त्या जागा त्या पक्षाने आपल्या सोयीप्रमाणे जाहीर करण्यात येणार आहेत. महायुतीत जागा वाटपात वर योग्य प्रकारे चर्चा सुरू आहे. जागावाटप फॉर्म भरण्याच्या आत होईल. महायुतीच्या जागा वाटपाबाबत पत्रकार परिषद घेऊन माहिती देऊ, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

## मविआची सत्ता आली, तर ते...

जाईल. बंडखोरी नाही. त्यामुळे कोणाचीही समजूत काढण्याची आवश्यकता नाही. उमेदवारी निश्चित करण्याचा अधिकार पक्षाच्या संसदीय समितीला आहे.

एखाद्या मतदारसंघातून दोन उमेदवार इच्छुक असतील आणि दोघांनी उमेदवारी मागितली, तर त्याला बंडखोरी म्हणता येणार नाही. पक्षाने अधिकृत उमेदवारी दिल्यानंतरही कोणी विधानसभा निवडणूक लढवत असेल, तरच तो बंडखोर ठरतो. एकापेक्षा जास्त इच्छुक असणे, ही बंडखोरी नाही. त्यामुळे कोणाचीही समजूत काढण्याची आवश्यकता नाही, असेही त्यांनी सांगितले.

## भाजपच्या यादीत १३ महिला उमेदवार

- उमेदवारी देण्यात आली आहे. या यादीमध्ये भारतीय जनता पक्षाने १३ महिलांना उमेदवारी दिली आहे. विशेष म्हणजे भाजपाचे खासदार अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांनाही भाजपाने उमेदवारी दिली आहे.
- विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने आज ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. या यादीमध्ये १३ महिलांना उमेदवारी देण्यात आली आहे. यामध्ये श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघामधून प्रतिभा पाचपुते, पुण्यातील पर्वती मतदारसंघामधून माधुरी मिसाळ, जिंतूर मतदारसंघामधून मेघना बोर्डीकर, भोकर मतदारसंघामधून श्रीजया अशोक चव्हाण, फुलंब्रीमधून अनराधाताई अतुल चव्हाण, गोरेगावमधून विद्या ठाकूर, बेलापूर मतदारसंघातून मंदा म्हात्रे, चिखलीमधून श्वेता महाले, दहिसरमधून मनीषा चौधरी, केजमधून नमिता मुंदडा, शेवगावमधून मोनिका राजळे, नाशिक पश्चिममधून सीमा हिरे, कल्याण पूर्व मतदारसंघातून सुलभा गायकवाड यांना उमेदवारी दिली आहे.

## मुंबईतील तीन विद्यमानांना...

- (वर्सोवा) आणि पराग शहा (घाटकोपर पूर्व) या तीन विद्यमान आमदारांना उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नाही. यामुळे या तिन्ही आमदारांना पुन्हा संधी मिळण्याबाबत साशंकता व्यक्त केली जाते. मनीषा चौधरी (दहिसर), मिहिर कोटेचा (मुलुंड), अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), योगेश सागर (चारकोप), विद्या ठाकूर (गोरेगाव), अमित साटम (अंधेरी पश्चिम), पराग आळवणी (विलेपार्ले), राम कदम (घाटकोपर पश्चिम), आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), तामिळ सेल्वन (सायन कोळीवाडा), कालिदास कोळंबकर (वडाळा) या ११ विद्यमान आमदारांना पक्षाने पुन्हा उमेदवारी दिली आहे. याशिवाय मालाड पश्चिम मतदारसंघातून मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांचे बंधू विनोद शेलार यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

## हिंजवडीच्या आयटी ...

ट्रेनच्या बाजूने किंवा डोक्यावर इलेक्ट्रिकच्या खांबांचे किंवा तारांचे जंजाळ दिसून येणार नाही.

शिवाजीनगरच्या मध्यवर्ती केंद्राशी जोडणाऱ्या पुणे मेट्रोलाइन ३ प्रकल्पाचे बांधकाम वेगाने पुढे सरकत आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील पुणे मेट्रोलाइन ३ चे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (पीएमआरडीए) सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर टाटा समूहाने हाती घेतले असून, त्याच्या कार्यान्वनासाठी पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड या स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. त्यामार्फत काम सुरू आहे.

## बिश्नोई टोळीच्या नावाने खंडणी

लॉरेन्स बिश्नोई टोळीला दहा कोटी रुपयांची खंडणी न दिल्यास बाबा सिद्धीकीसारखी अवस्था करू. खंडणीची रक्कम कधी आणि कशी द्यायची, याबाबत दुसरा ई-मेल पाठविण्यात येईल, अशी धमकी मेलद्वारे देण्यात आली आहे. याबाबत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांनी याला दुजोरा दिला.

दरम्यान, सध्या सायबर गुन्हेगारांकडून आर्थिक फसवणूक आणि खंडणी उकळण्यासाठी ई- मेलद्वारे धमकावण्याचे प्रकार सुरू आहेत. हा ई-मेल सायबर गुन्हेगारांकडून आला की, बिश्नोई टोळीकडून याचा पोलिस तपास करीत आहेत, अशी माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.

## झिशान सिद्दिकीचा मारेकऱ्यांना इशारा

त्यांची चौकशी देखील चालू आहे. या चौकशीतून वेगवेगळ्या प्रकारची धक्कादायक माहिती समोर येत आहे. अशातच वडिलांच्या हत्येनंतर त्यांचे पुत्र व वांद्रे पश्चिम मतदारसंघाचे आमदार झिशान सिद्दिकी यांनी समाजमाध्यमांवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टद्वारे त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत, तसेच वडिलांच्या मारेकऱ्यांना इशारा देखील दिला आहे.

झिशान सिद्दिकी यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, त्यांनी माझ्या वडिलांना मारलं, पण ते विसरतायत की ते सिंह होते आणि त्या सिंहाचा अंश माझ्यातही आहे. त्यांच्या लढा माझ्याही रक्तात वाहतोय. ते नेहमी न्यायासाठी उभे राहिले. परिवर्तनासाठी लढले. या लढाईच्या काळात त्यांनी मोठ्या धैर्याने वादळांचा सामना केला. ज्यांनी माझ्या वडिलांना मारलं त्यांनी असं समजू नये की ते जिंकलेत, त्यांना मला सांगायचं आहे की त्या सिंहाचं रक्त माझ्या धमण्यांमधून वाहतंय. मी अजूनही इथेच आहे, निर्भय व ठामपणे उभा आहे. त्यांनी एकाला मारलं, पण त्यांच्या जागी आता मी उभा आहे. ही लढाई आत्ता संपणार नाही. माझे वडील जिथं होते, तिथंच आज मी उभा आहे, ठाम, निश्चल आणि पूर्ण तयारीनिशी..., माझ्या वांद्रे पूर्व मतदारसंघातील लोकांना मला सांगायचं आहे की मी सदैव त्यांच्याबरोबर आहे.

## भीषण....

जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी १२ जणांना मृत घोषित केले, तर प्राथमिक उपचारानंतर गंभीर जखमींना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातात आसमा (वय१३), गफो (७), साकीर (५), दानिश (९) असीम(५),आशियाना (१०), सुखी (८) सानीज (९) जरीना (३०), जुली ३० अशी मृतांची नावे आहेत.

## ७ लाख ४७ हजार रुपयांचा दंड वसूल

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्या स्कूलबसवर कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या २८० बसची तपासणी केली. त्यापैकी १७१ बसचालकांनी मोटार वाहन कायद्यातील नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे. या बसचालकांवर 'आरटीओ'कडून कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून १७ लाख ४७ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात २९५७ स्कूल बसची नोंदणी आहे. बसव्यतिरिक्त रिक्षांमधूनही शालेय विद्यार्थांची वाहतूक केली जाते. पुण्यात शालेय मुलांची वाहतूक करणाऱ्या बस चालकाकडून दोन चिमुकल्या मुलींवर अत्याचार करण्यात आल्याच्या घटनेनंतर प्रादेशिक परिवहन विभागामार्फत शहरातील विविध ठिकाणी विशेष तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेमध्ये एकूण २८० विद्यार्थी प्रवासी बसची तपासणी केली.

यात बसचालकांकडून विनापरवाना अथवा परवान्याच्या अटींचा भंग करणे, योग्यता प्रमाणपत्र नसणे, वाहनामध्ये बेकायदेशीर फेरबदल करणे, क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहतूक करणे, कर न भरणे अशा विविध नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७१ वाहनांवर आरटीओच्या सात वायुवेग पथकांमार्फत कारवाई करण्यात आली.

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव म्हणाले, की आरटीओकडून शहरातील विविध भागांत विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. १७१ बस चालकांनी नियमांचे उल्लंघन केले आहे. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

#रा

## सामूहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम उत्साहात पार

# महागणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**रांजणगाव गणपती :** संकष्टी चतुर्थी निमित्त रांजणगाव येथील महागणपती मंदिरात पहाटे ५ वाजता श्रींचा अभिषेक करून मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. संकष्टी चतुर्थी निमित्ताने श्री क्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्ट च्या वतीने आयोजित सामूहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम अतिशय उत्सवात पार पडले.

» धार्मिक

संकष्टी चतुर्थी निमित्त भाविकांसाठी उत्तम प्रकारे जलद दर्शन व्यवस्था, खिचडी प्रसाद, पिण्याचे पाणी इत्यादी सुविधा देवस्थान ट्रस्ट तर्फे देण्यात आल्या, अशी माहिती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती दत्तात्रय पाचुंदकर पाटील यांनी सांगितले. दुपारी १२ वाजता देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव यांच्या हस्ते महापूजा व महानैवेद्य करण्यात आला. तसेच प्रगतशील शेतकरी नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर पाटील यांच्या वतीने मंदिर गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली. श्री महागणपती भजनी मंडळ, रांजणगाव गणपती यांचा भजनाचा कार्यक्रम झाला. देवस्थानचे विश्वस्त मंडळ मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव, अध्यक्षा स्वाती पाचुंदकर पाटील, उपाध्यक्ष संदिप दौंडकर, सचिव डॉ. तुषार पाचुंदकर, खजिनदार विजय देव तसेच चेअरमन दत्तात्रय पाचुंदकर पाटील व देवस्थान कर्मचारी, तसेच इतर मान्यवर या वेळी उपस्थित होते. रांजणगाव एमआयडीसी पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## युवा वर्गाला मतदान मार्गदर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खडकवासला :** राज्यात २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या मीडिया सेलच्या अधिकारी व वारजे तलाठी डॉ प्रगती वि मोरे यांनी शिवणे येथील, शास्त्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटच्या विंगेस अविएशन ऍण्ड हॉस्पिटॅलिटी या शैक्षणिक संस्थेत युवा वर्गाला 'मतदानाचे महत्त्व व सध्याच्या निवडणूक प्रक्रियेत तंत्रज्ञान व मीडियाचा प्रभावी वापर ' या विषयाबाबत माहिती दिली. यावेळी संस्थेचे विद्यार्थी उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी यशवंत माने व हवेली तहसीलदार किरण सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

» Selected



## भाजपा युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी राजेंद्र तांबे

**शिक्रापूर :** पिंपळे जगताप (ता. शिरुर) येथील राजेंद्र दादाभाऊ तांबे यांची नुकतीच भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संदीप सातव यांनी राजेंद्र तांबे यांना नियुक्ती पत्र दिले आहे. पिंपळे जगताप येथील राजेंद्र दादाभाऊ तांबे यांनी भारतीय जनता पार्टी पक्षात सक्रीय राहून नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यासह विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना मिळवून दिला असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची नुकतीच भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संदीप सातव यांनी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व पुणे जिल्हा बँकेचे संचालक प्रदीप कंद, जिल्हा सरचिटणीस भगवान शेळके, संदीप भोंडवे यांच्या हस्ते राजेंद्र तांबे यांना नियुक्तीपत्र दिले आहे, याप्रसंगी भाजपा युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष अशोक शेळके, महेश जगताप, विश्वास जगताप, लक्ष्मण तांबे, रवी जगताप, अक्षय सोंडेकर, स्वराज जगताप, योगेश तांबे, विशाल परांडे यांसह आदी उपस्थित होते,

# सणसर रस्त्याचे डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे; जबाबदार कोण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



सणसर फुटरस्ता ते ३६ फाटापर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे

**भवानीनगर :** सणसर फूट रस्ता ते ३६ फाटा पर्यंतच्या रस्त्याचे सहा महिन्यापूर्वी डांबरीकरणाचे काम झाले होते. या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम झाल्यामुळे सहा महिन्यातच रस्त्यावर खड्डे पडले असून, या निकृष्ट दर्जाच्या कामाला जबाबदार कोण, असा सवाल वाहन चालक उपस्थित करीत आहेत.


सणसर फुट रस्ता ते ३६ फाटा या सुमारे एक ते दीड किलोमीटरच्या रस्त्याचे डांबरीकरण मागील सहा महिन्यापूर्वी झाले होते वास्तविक पाहता पाच वर्षांमध्ये या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी दोन वेळा निधी आलेला असून दोन्ही वेळा डांबरीकरणाचे निकृष्ट दर्जाचे काम झालेले आहे या रस्त्याच्या सहा महिन्यापूर्वी झालेल्या डांबरीकरणाच्या कामासाठी सुमारे दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता या निधीतून या रस्त्याचे सहा महिन्यापूर्वी डांबरीकरण झालेले असताना सहा महिन्यातच रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत या रस्त्यावर सणसर सपकळवाडी तावशी या हेड खाली सुमारे दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता मे मोरया कंट्रक्शन कंपनी शिरसणे तालुका बारामती या संस्थेने या रस्त्याचे काम ३१ टक्के बिलो ने घेऊन केलेले आहे या ठेकेदाराने रस्त्याचे डांबरीकरण करताना अतिशय कमी प्रमाणात डांबराचे प्रमाण वापरल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडले असून रस्त्याला तडे गेले आहेत या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी पाच वर्षात दोन वेळा निधी मिळूनही रस्त्याचे काम दर्जेदार होऊ शकलेले नाही रस्त्याचे डांबरीकरण करताना शासनाच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे नियंत्रण असते परंतु ठेकेदार व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या संगणमतानेच निकृष्ट दर्जाचे काम झाले असून संबंधित अधिकाऱ्यांवर देखील योग्य ती कारवाई करण्यात यावी इंदापूर तालुक्याच्या पश्चिम भागात अनेक संस्था कामे मिळवण्यासाठी बिलो ने टेंडर भरतात व नंतर परवडत नाही म्हणून निकृष्ट दर्जाचे तसेच इस्टिमेट प्रमाणे कामे करत नाहीत अशा संस्थांकडून दर्जेदार कामे करून घेण्यासाठी शासनाने अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे

### संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी

● या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामासाठी सर्वसामान्य जनतेने भरलेल्या कराच्या पैशातून शासनाने निधी उपलब्ध केलेला आहे हा पैसा सर्वसामान्य जनतेचा आहे ठेकेदार व अधिकारी यांनी संगनमताने निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे या दोघांकडून हा दोन कोटी रुपयांचा निधी वसूल करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी सपकळवाडीचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष विनोद सपकळ यांनी केली आहे.

## येळकोट येळकोट...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**जेजुरी:** पहाटेच्या प्रहरी महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी गडावरून सूर्य किरणे व ढगांचे विलोभनीय छायाचित्र महेश शिंदे यांनी टिपले.



## पोलीस पाटलांनी आचारसंहितेचे पालन करावे

**शिक्रापूर :** राज्यभरात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता जाहीर करण्यात आली असून सर्व पोलीस पाटील यांनी आचार संहितेचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी केले आहे. शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे पोलीस पाटील यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. उपस्थित पोलीस पाटील यांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड बोलत होते. पोलीस पाटील पांडुरंग नरके, प्रकश करपे, स्वप्नील झगडे, जयसिंग भंडारे, जालिंदर पवार, पांडुरंग दरेकर, आत्माराम डफळ, कृष्णा गाजरे, राजेश गायकवाड, बाबाजान शेख, शरद लोखंडे यांसह आदी या वेळी उपस्थित होते, पोलीस पाटील यांनी गावातील सर्व हालचालींवर लक्ष ठेवावे, गावामध्ये शांतता राहील याची दक्षता घ्यावी तसेच कायदा व सुव्यवस्था राखत कोणी आक्षेपार्ह पोस्ट सोशल मिडीयावर टाकत असल्याची त्याबाबतची माहिती द्यावी आणि निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि निपक्षपातीपणे पार पडेल यासाठी मदत करावी असे आवाहन देखील दिपरतन गायकवाड यांनी केले.

# पोकलेन चालकच निघाला डिझेल चोर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर शहरात सुरू असलेल्या एका बांधकाम साईटवर उभ्या असेलल्या पोकलेनचे डिझेल वारंवार चोरीला जाण्याची घटना घडत असताना, पोकलेन चालकच डिझेलचोर असल्याचे उघड झाले आहे. संजय चिंतामण साव या पोकलेन चालकावर शिरुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिरुर शहरातील हॉटेल गंगा ग्रंडच्या पाठीमागे एक बांधकाम साईट सुरु असून, येथील एका पोकलेनचे यापूर्वी डिझेल चोरीला जाण्याच्या घटना घडल्या होता, नुकतेच येथील पोकलेन मालक सागर कर्डिले रात्रीच्या सुमारास तेथे आले असता त्यांना एक इसम डिझेल चोरी करताना दिसल्याने त्यांनी त्याला पकडले असता, तो स्वतः पोकलेन चालक संजय साव असल्याचे समोर आले. सदर चालकाला नागरिकांच्या मदतीने पोलीस स्टेशन येथे घेऊन जात असताना, तो अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. याबाबत सागर अशोक कर्डिले (३२, रा. कुरुंद ता. पारनेर जि. अहमदनगर) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी संजय चिंतामण साव (रा. बरही, ता. राणीचूओ जि. हजारीबाग, झारखंड) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## दारु अड्ड्यावर एलसीबीचा छापा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** हिवरे कुंभार (ता. शिरुर) येथील हॉटेल निसर्ग येथे एक इसम नागरिकांना बेकायदेशीपणे देशी विदेशी दारुच्या बाटल्यांची विक्री करत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला मिळाली. त्यानंतर पोलीस हवालदार जनार्दन शेळके, राजू मोमीन, तुषार पंदारे आदींनी हॉटेल निसर्ग येथे जाऊन छापा टाकला असता, त्यांना एक इसम दारुच्या बाटल्यांची विक्री करताना मिळून आला. पोलिसांनी तेथील दारुसाठा जप्त करत त्यांची विक्री करणाऱ्या इसमाला ताब्यात घेतले. पोलिसांनी योगेश शामराव चौधरी (वय ३० वर्षे, रा. पाबळ ता. शिरुर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



## रोहिणी गायकवाड सन्मानित

**बारामती :** पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघातर्फे गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण कार्यक्रम नुकताच भोसरी येथे संपन्न झाला. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कै गजाननराव भिवराव देशपांडे विद्यालय बारामती प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी मुख्याध्यापिका रोहिणी गायकवाड यांना पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघातर्फे जिल्हा गुणवंत मुख्याध्यापिका पुरस्कार संजय आवटे व माजी शिक्षक आमदार भगवान आप्पा साळुंखे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

आमदार महेशदादा लांडगे, भाऊसाहेब कारेकर शिक्षणाधिकारी पुणे, तानाजी माने अध्यक्ष मुख्याध्यापक महामंडळ मुंबई, नंदकुमार सागर अध्यक्ष व प्रसाद गायकवाड सचिव पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ यांच्या उपस्थितीत गुणवंत शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. या निमित्त महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे नियामक मंडळ सदस्य व शाला समिती अध्यक्ष अजय पुरोहित, महामात्र डॉ.गोविंद कुलकर्णी व मएसोचे सर्व पदाधिकारी, सल्लागार समिती सदस्य,बारामती तालुका मुख्याध्यापक संघ अध्यक्ष व सर्व पदाधिकारी, मएसो परिवारातील सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही त्यांचे अभिनंदन केले.

## श्री काळभैरवनाथ नाथसाहेब पानाची उटी



### दोन हजार विड्याच्या पानांनी देवांना सजवले

**सासवड :** सासवड येथील ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ मंदिरात देवांना विडयाच्या पानांची उटी - दस-याचे सिमोलंघन झाल्यावर देवांचा दाह कमी करणेसाठी येणाऱ्या पहिल्या शनिवारी विडयांच्या पानांची उटी केली जाते, यामुळे देवांचा दाह कमी होतो व शितलता होते. ही परंपरा अत्यंत पुरातन काळापासून चालत आलेली आहे

उटीसाठी विडयांची पाने देण्याचा मान सासवड येथील बादशाही ओटा येथील सरदार पवार घराण्यातील श्रीधर चंद्रकांत पवार व तांबोळी परीवारातील हसनभाई तांबोळी यांना आहे. देवांना पानाची उटी लावण्याचे कार्य- मोहन काका भैरवकर, रामभाऊ भैरवकर, राजाभाऊ भैरवकर, बाळकृष्ण भैरवकर गणेश ताटे गुरव बंधू सासवडकर यांनी विधीवत धार्मिक पध्दतीने केली.

## लग्नाच्या आमिषाने युवतीवर अत्याचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कारेगाव (ता. शिरुर) येथील एका युवतीची परप्रांतीय युवकाने, लग्नाचे आमिष दाखवत तसेच तिचे अश्लील फोटो काढून ते नातेवाईकांना पाठवण्याची धमकी देऊन अत्याचार केल्याची घटना घडली आहे.

रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे निलू जेना या परप्रांतीय युवकावर या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वाहनाच्या धडकेत हरणाचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** रांजणगाव गणपती (ता. शिरुर) येथील पुणे नगर महामार्गावर अचानकपणे आलेल्या हरणाचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना घडली. शिरुर वनविभागाच्या वतीने मृत हरणाचा पंचनामा करत दहन करण्यात आले आहे.

रांजणगाव गणपती येथील पुणे नगर महामार्गावर दुपारच्या सुमारास अचानक एक हरीण आले. दरम्यान वाहने व मनुष्यवस्ती पाहून हरीण बिथरले आणि रस्त्यावर आल्याने भरधाव वेगानील अज्ञात वाहनाची धडक त्याला बसून ते जखमी झाले. याबाबतची माहिती प्रमोद लांडे यांनी वनविभागाला दिल्याने नियतक्षेत्र अधिकारी वंदना चव्हाण, रेस्क्यू टीमचे जयेश टेमकर, शेरखान शेख, शुभम वाघ, राजेश मुंडकर यांनी घटनास्थळी धाव घेत, हरणाचा पंचनामा करुन पशुवैद्यकीय अधिकारी गोरख सातकर यांच्या माध्यमातून मृत हरणाचे शवविच्छेदन करत त्याचे वनविभागाच्या हद्दीत दहन केले, मात्र सदर हरीण कोठून तरी चुकून मनुष्यवस्तीत येवून रस्त्यावर आल्याने अपघातात मृत झाल्याचा अंदाज वनविभागाने वर्तविला आहे.

# भारतीय लोकशाही सशक्तीकरणासाठी जनजागृती व्हावी या उद्देशाने प्रभात फेरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वाल्हे :** मतदारांमध्ये मतदानाबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने दौंडज (ता.पुरंदर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी गावांतर्गत मतदान जनजागृती फेरी काढली. भारतीय लोकशाही शक्तीशाली करण्यासाठी मतदारांना मतदानाचा हक्क आणि आपले कर्तव्य बजावायला हवे, असा संदेश या फेरीच्या माध्यमातून दिला.

या जनजागृती फेरीचा प्रारंभ मुख्याध्यापिका मनिषा फरांदे यांनी केला. यानंतर गावांतर्गत प्रभागातून ही फेरी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी, "मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो" सोडा सर्व काम, चला करूया मतदान,

मतदान हा आहे आपला अधिकार, नका करू त्याचा तिरस्कार". अशा विविध घोषणा विद्यार्थ्यांनी मतदान जागृतीबाबत दिल्या. तसेच मतदान जागृतीबाबतचे फलकही घेतले होते. दरम्यान, मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी आपले आई-वडील, कुटुंबातील इतर सदस्य, नोकरी व शिक्षणानिमित्त बाहेरगावी असणारे नातेवाईक यांना संकल्प पत्रे लिहिली. सर्व विद्यार्थी मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभागी झाले होते. मुख्याध्यापिका मनीषा फरांदे, नयन शिर्के, विद्या जाधव, सविता लंबाते आदींसह पालक उपस्थित होते.

## यादीत नाव आहे की नाही पाहण्यासाठी लिंक पाठवून फसवणूक

# पीएम किसानच्या फेक मेसेजने दोन कोटींचा गंडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** मागील अनेक दिवसांपासून pmkisan.apk नावाची फाईल वेगवेगळ्या व्हाट्सअप ग्रुपवर पाठवली जात आहे. प्रामुख्याने ज्या व्हाट्सॲप ग्रुपवर शेतकरी आहेत अशा ग्रुपवर ही फाईल पाठवली जाते आणि 'या यादीमध्ये तुमचे नाव आहे की नाही हे चेक करा' असे सांगितले जाते. अनेक शेतकरी ही फाईल डाऊनलोड करून फसल्याच्या घटना घडल्या आहेत. त्याबरोबरच ऑनलाईन चोरट्यांनी चोरी करण्यासाठीच्या नवनव्या युक्त्या शोधून काढल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी अशा अज्ञात लिंक, मेसेज यांपासून दूर राहणे गरजेचे आहे.

पीएम किसानच्या यादीचे फेक मेसेज सध्या सोशल मीडियावर फिरत असून यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याच्या धक्कादायक घटना समोर आली आहे. पीएम किसान डॉट एपीके ही फेक फाईल डाऊनलोड करताच अमरावती येथील ३६ वर्षीय युवकाच्या, खात्यातून २ कोटी ४८ लाख १५६ रूपये डेबीट झाले आहेत. २२ ते १८ सप्टेंबर दरम्यान ही घटना घडली असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक माहितीनुसार, आविनाश रोतळे असे या व्यक्तीचे नाव असून त्यांना व्हॉट्सअपवर pmkisan.apk नावाची फाईल प्राप्त झाली. ती फाईल महत्त्वाची वाटल्याने त्यांनी ती फाईल ओपन करून मोबाईलमध्ये इन्स्टॉल केली. काही वेळातच चोरट्यांनी त्यांच्या मोबाईलवर ताबा मिळवून त्यांच्या खात्यातील २ कोटी ४८ लाख १५६ रूपये परस्पर दुसऱ्या खात्यात वळवले. पण त्यांना ही गोष्ट उशिरा लक्षात आली आणि त्यांनी १६ ऑक्टोबर रोजी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

#रा

### महायुती आणि मविआतील तिढा कायम

# जुन्नरमधील राजकीय वातावरण तापले

■ सुरेश वाणी

**नारायणगाव :** विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्याने जुन्नर तालुक्यामध्ये राजकीय वातावरण तापू लागले आहे. महाविकास आघाडी व महायुती यांच्यात उमेदवारी नक्की कोणाला? याबाबतचा अद्यापही संभ्रम कायम आहे. तथापि आमदार अतुल बेनके यांनी प्रचार सुरू केलेला आहे. त्यातच भाजप नेत्या आशाताई बुचके यांनी आज ओझर या ठिकाणी निर्धार मेळावा घेऊन महायुतीची उमेदवारी मलाच मिळणार असून मी २४ तारखेला फॉर्म भरणार असल्याची घोषणा देखील केली आहे. तसेच महाविकास आघाडीत देखील उमेदवारी कोणाला मिळणार? या बाबतही एकमत होत नसल्याने त्याच्यातील तिढा अद्यात सुटलेला दिसत नाही.त्यामुळे जुन्नर तालुक्यात महायुती व महाविकास आघाडी या दोन्हीकडूनही उमेदवारीबाबत रस्सीखेच सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे.

महाविकास आघाडी कडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाकडून शरद लेंडे व विघ्नहर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर हे दोघे प्रबळ दावेदार आहेत. उमेदवार आयात करून तुतारी चिन्हावर उमेदवार देऊ नये. निष्ठावंत कार्यकर्त्यालाच तुतारी चिन्हावर उमेदवारी द्यावी अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार या पक्षाच्या कार्यकर्त्यांची आहे. विघ्नहर चे अध्यक्ष व काँग्रेसचे युवा नेते सत्यशील शेरकर यांना पवार साहेबांनी पक्षात घेऊन उमेदवारी द्यावी अशी आग्रही मागणी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष अशोक घोलप व त्यांच्या सहकाऱ्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन केली आहे.

दरम्यान शरदचंद्र पवार यांनी जुन्नर विधानसभेचे उमेदवारी निष्ठावंत कार्यकर्त्याला द्यावी, अशी एकमुखी मागणी कार्यकर्त्यांची असून या सगळ्यांनी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शरद लेंडे यांचे एकमेव नाव सुचवले असल्याचे समजते. पवार सुद्धा लेंडे यांच्या नावाला 'सहमत' असल्याचे बोलले जात आहे.दोन दिवसांपूर्वी लेंडे यांच्या सहकाऱ्यांना मुंबईवरून लेंडे यांची उमेदवारी फायनल होऊ शकते अशा आशयाचे फोन आल्यामुळे निष्ठावंत कार्यकर्त्यांना तरतरी आली आहे. तथापि आपल्याला पवार साहेब पक्षात घेऊन तुतारी चिन्हावर उमेदवारी देणार या बाबतची खात्री विघ्नहरचे अध्यक्ष सत्यशील शेरकर यांना असल्याने त्यांनी देखील प्रचाराला सुरुवात केली आहे. परंतु लेंडे यांचे नाव पुढे येत असल्यामुळे शेरकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुंबई गाठली आहे. व आपली उमेदवारी निश्चित होण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.



विघ्नहर कारखान्याची ताकद मोठी असून युवक संघटन सत्यशील शेरकर यांचे अधिक असल्याने सत्यशील शेरकर यांचा सहज विजय होऊ शकतो, अशा प्रकारचा दावा सत्यशील शेरकर समर्थक करत आहेत. तथापि शरद पवार यांनी निष्ठावंत कार्यकर्त्याला उमेदवारी न दिल्यास अनेक कार्यकर्ते पुन्हा आमदार अतुल बेनके यांच्या संपर्कात जाऊ शकतात अशा प्रकारची चर्चा सुद्धा होऊ लागली आहे. यामध्ये खासदार अमोल कोल्हे यांची भूमिका महत्त्वाच्या ठरणार आहे.

दरम्यान महाविकास आघाडीची उमेदवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाला मिळावी असा देखील आग्रह जोरदारपणे सुरू असून शिवसैनिकांनी मातोश्री गाठली आहे. शिवसेनेला जुन्नरचे वातावरण पोषक असून दोन वेळा जुन्नरचा आमदार शिवसेनेचा झालेला आहे. त्यामुळे जुन्नरची उमेदवारी आपल्यालाच मिळावी असा उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या कार्यकर्त्यांचा आग्रह आहे.

एकंदरीत महाविकास आघाडीमध्ये उमेदवारी मिळण्यावरून घमासान सुरू झाले असल्याचे दिसून येत असून महायुतीमध्ये सुद्धा भाजपा नेते आशाताई बुचके यांनी ओझर या ठिकाणी निर्धार मेळावा घेऊन आपणही विधानसभेची निवडणूक लढवणार आहोत असे हजारो महिला कार्यकर्त्यांच्या मेळाव्यामध्ये घोषित केले असून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी जुन्नर ची जागा आपल्यालाच मिळणार असे आशाताई बुचके यांनी या मेळाव्यात सांगितल्याने महायुतीची उमेदवारी आमदार अतुल बेनके की आशाताई बुचके यांना याबाबत देखील उलट सुलट चर्चा होऊ लागली आहे.

## धरणे आंदोलनला वाढता पाठिंबा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**केडगाव :** दापोडी (ता. दौंड) येथे सोमनाथ बन्सी सकट आपल्या कुटुंबासह दापोडी ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत आंदोलनला बसले आहे, दामिनी सोमनाथ सकट या महिलेस कामावरून कमी केल्याने सह कुटुंब बेमुदत धरणे आंदोलनास बसले आहे, आमच्यावर अन्याय केला असून माझ्या पत्नीला कामावर रुजू करुन घ्यावे व राहिलेला पगार त्वरित द्यावा आशी मागणी असल्याचे सोमनाथ सकट यांनी सांगितले.

याबाबत माजी सरपंच भाऊसाहेब भांडवलकर व माजी सरपंच नंदाताई भांडवलकर यांनी सांगितले की, पूर्वीपासून या कुटुंबाकडे गावातील सफाई करण्याचे काम आहे. त्यांना पुन्हा कामावर रुजू करुन घ्यावे. त्यांच्यावर हा अन्याय झाला आहे. पगार देताना वेळ लागू शकतो. मात्र, त्यांना कामावर रुजू करुन घ्यावे, असे माझे मत आहे. याबाबत सरपंच आबासाहेब गुळमे यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

## » Selected

## खा. सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता संवाद मेळावा

**इंदापूर** : खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि. २२) वाघ पॅलेस येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी अनेकांचे पक्षप्रवेश होणार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड. तेजसिंह पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड. इनायतअली काझी, शहर युवक अध्यक्ष श्रीकांत मखरे, पुणे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र पाटील हेही उपस्थित होते. ॲड. तेजसिंह पाटील म्हणाले की, सकाळी दहा वाजता सुरु होणाऱ्या या संवाद मेळाव्यात खा.सुळे कार्यकर्त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत. यावेळी अनेक मान्यवर पक्षामध्ये प्रवेश करणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

## लाडक्या बहिणींचे बजेट कोलमडले

**पुणे :** दिवाळी हा सण अगदी काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. या पार्श्वभूमीवर जीवनावश्यक साहित्यांचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे महिन्यांचे बजेट कोलमडून लाडक्या बहिणींची फोडणी महाग झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. महाराष्ट्र सरकारने लाडकी बहीण योजना सुरू करत सर्वसामान्य महिलांना महिन्याला दीड हजार रुपयांची मदत सुरू केली आहे. या योजनेचे सर्वत्र जोरदार स्वागत करण्यात आले. मात्र, दुसरीकडे महागाईतही वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या खिशाला कात्री लागली जात आहे. लाडकी बहीण योजना सुरू होण्यापूर्वी खाद्यतेलाचा १४ किलोचा एक डबा १६०० रुपयाला मिळत होता, तो आता २२०० रुपयाला मिळत आहे. हरबरा डाळ पूर्वी ७० रुपये किलो होती, ती आता १०० रुपयांना मिळत आहे. खोबरेही १२० रुपयांवरून २३० रुपये किलो इतके महाग झाले आहे. रवा ३५ रुपयांवरून ४० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. बेसनाचे दर ८० रुपयांवरून ११० रुपयांपर्यंत वाढले आहेत.

# श्री विघ्नहराच्या चरणी लाखो भाविक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** अष्टविनायकापैकी मुख्य स्थान असलेल्या श्री क्षेत्र ओझर येथे पहाटे ५ वाजता श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब कवडे, उपाध्यक्ष तुषार कवडे, सचिव सुनिल घेगडे, खजिनदार दत्तात्रय कवडे, विश्वस्त विक्रम कवडे ,संतोष कवडे, विनायक मांडे यांच्या हस्ते श्रींना महाअभिषेक पूजा करून दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. मंदिरामध्ये चतुर्थीनिमित्त महाआरती करण्यात आली.

महाआरतीचा मान गणेशभक्त अशोकराव गुंजाळ, तेजेस जंगले, दत्तात्रय गावडे, अमोल क्षीरसागर, महेश परदेशी यांना मिळाला. पहाटे पाच ते रात्री आकरापर्यंत रांगेत सुमारे पन्नास हजार भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. सकाळी





७.०० वा. व दुपारी १२.०० वा. मध्यान्ह आरती करण्यात आली. सकाळी ८.०० वा. नियमित पोथी वाचन करण्यात आले.

सकाळी १०.३० वा. 'श्री'स नैवद्य दाखवून भाविकांना खिचडी वाटप श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले. आज संकष्टी चतुर्थी निमित्ताने विघ्नहर मंदिरात फुलांची आरास, विघ्नहराला रेशमी जरीचा पोशाख करण्यात आला होता. तसेच सोन्याचे अलंकार श्री विघ्नहराला परिधान करण्यात आले.

येणाऱ्या भाविकांसाठी मंदिरात दर्शनरांग, पिण्याचे पाणी, अभिषेक व्यवस्था, देणगी कक्ष ,अभिषेक करण्यासाठी शामी वृक्षाखाली व्यवस्था, दर्शन झाल्यानंतर विसाव्यासाठी विघ्नहर उद्यान, कमीत कमी वेळेतील दर्शनासाठी मुखदर्शन व्यवस्था अशा व्यवस्था करण्यात आल्या. सायंकाळी ७.०० वा. नियमित हरिपाठ करण्यात आले. व चंद्रोदयापर्यंत कीर्तनकार ह.भ.प. उज्वाला ताई वाळके घारगाव यांचे हरिकीर्तन झाले. त्यांना साथसंगत राम प्रसादिक भजनी मंडळ शिरोली यांनी दिली. आजचे अन्नदाते भास्कर/ विलास देवराम मांडे, ओझर यांनी चतुर्थीचे वारकरी अन्नदान केले. रात्रौ १०.३० वाजता शेजआरती करून ११.०० वाजता मंदिर बंद करण्यात आले.




# ग्रामदेवता कुलस्वामिनी श्री यमाई देवीच्या कृपेने भारताचा सरन्यायाधीश

## सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांचे प्रतिपादन

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** ग्रामदेवता कुलस्वामिनी श्री यमाई देवीच्या कृपेने मी भारताचा सरन्यायाधीश झालो. काही महत्त्वाचे निर्णय घेत असताना काही सुचत नव्हते. जेव्हा अयोध्येचे काम माझ्याकडे आले तेव्हा आम्ही ३ महिने त्याच्यावर विचार करत होतो. शेकडो वर्ष ज्या विषयावर मार्ग निघाला नाही. यावर मार्ग कसा शोधायचा यावर मी विचार करायचो. मी दररोज देवपूजा करताना यावर मार्ग कसा काढायचा याविषयी प्रार्थना करायचो. देवावर आपली श्रध्दा असेल, आस्था असेल तर कठीण प्रसंगी देव नेहमी आपल्याला मार्ग शोधून देतात, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी केले.

सरन्यायाधीश डॉ. चंद्रचूड यांनी त्यांच्या मूळगावी कनेरसर (ता. खेड) येथे रविवारी (दि. २०) सपत्नीक भेट दिली. वडिलोपार्जित चंद्रचूड वाड्यात नातेवाईकांशी संवाद साधल्यानंतर ग्रामदैवत कुलस्वामिनी यमाई देवीचे दर्शन घेतले. ग्रामस्थांच्या वतीने बाबाजी दौंडकर व लक्ष्मण ताम्हाणे यांनी उभयंतांचा मानपत्र देऊन सन्मान केला. राजगुरुनगर बार असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष ॲड. रोहिदास टाकळकर यांनी त्यांचा सत्कार केला. कल्पना दास-चंद्रचूड यांचा शासनाच्या वतीने तहसीलदार ज्योती देवरे यांनी सन्मान केला.

याप्रसंगी राजगुरुनगर येथील जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एस. सय्यद, कुलस्वामिनी यमाई देवी ट्रस्टचे अध्यक्ष तथा प्रथम वर्ग न्यायाधीश एस. बी. पवार, उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, सरपंच सुनीता केदारी, संयोजक अशोक टाव्हरे, सुखदेव सोनवणे, दिलीप माशेरे, रमेश दौंडकर, संतोष ताम्हाणे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ व वकील बहुसंख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना सरन्यायाधीश डॉ. चंद्रचूड म्हणाले की, मी दहा वर्षांनी गावी आलो आहे. त्यामुळे "आजी सोनियाचा दिनु । वर्षे अमृताचा घनु" याचा मी अनुभव घेत आहे. मी दरवेळी गावात किती प्रगती झाली आहे हे जाणून घेत आहे. आपल्याला पूरक आणि पोषक बदल स्वीकारत विकसित होण्याचा प्रयत्न करतो. असे करताना, आपल्या मातीचा वारसा पुढे चालवत एक एक पिढी बदल स्वीकारत पुढे स्थलांतर करते. हे चिरंतन सत्य आहे. आयुष्यात एक एक पाऊल पुढे टाकत असताना खोलवर रुजलेली आपली नाळ आपली मूळ, आपण विसरत नाहीत. आपल्या मूळ गावी आज भेट देताना मला माझ्या पूर्वजांचा, माझ्या या गावाचा, या मातीचा या लोकांचा अभिमान वाटतो. कामाच्या व्यस्ततेमुळे मला येथे दर महिन्याला येता येत नाही. पण मला येथील गावकरी व्हाट्सअप मेसेज द्वारे, पत्रव्यवहार करून संपर्क करत असतात. त्यांच्या अडचणी समस्या सांगत असतात. आपले पूर्वज या मातीतून घडले. त्यांचे ऋण आपण मानतो. त्यांची आठवण मनात साठवतो. कधी तरी काळाच्या ओघात प्रत्येक वेळी ते पुन्हा पाहण्याची तेथे भेट देण्याची सतत संधी मिळेलच असे नाही. प्रास्ताविक जवाहर दौंडकर यांनी केले. सूत्रसंचालन अध्यापिका फड यांनी केले. आभार अनंत चंद्रचूड यांनी मानले.

# एटीएम लुटले; पोलिसांचा सिनेस्टाईल पाठलाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण:** गॅस कटरने एटीएम तोडून मोठी रक्कम चोरट्यांनी लंपास केली. सदरची घटना शुक्रवारी (दि.१८ ऑक्टोबर ) मध्यरात्री १ वाजता चाकण एमआयडीसी भागात बिरदवडी फाटा ( ता. खेड ) येथे घडली. या घटनेत चोरी करताना गॅस कटरमुळे एटीएम मशीन जळाले. एटीएम सेंटर मधून जाळ व धूर येत असल्याने परिसरातील नागरिकांच्या लक्षात हा प्रकार आल्यानंतर तत्काळ महाळुंगे पोलिसांना या बाबत माहिती देण्यात आली. महाळुंगे पोलिसांच्या पथकाने अक्षरशः सिनेस्टाईल ८ ते १० किलोमीटर चोरट्यांच्या स्कॉर्पिओ मोटारीचा पाठलाग करून चोरट्यांना गाठले. मात्र चोरट्यांनी चोरीची ११ लाख ५२ हजारांची रोकड आणि स्कॉर्पिओ मोटार गाडी जागेवर






सोडून अंधाराचा फायदा घेत पोबारा केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

चाकण आंबेठाण रस्त्यावर बिरदवडी फाटा येथे हिताची सर्विसेस मार्फत एटीएम सेंटर सुरू करण्यात आले आहे. या एटीएम सेंटरमध्ये शुक्रवारी रात्री बाराच्या सुमारास चार पाच जणांच्या टोळीने गॅस कटरने एटीएम मशीनचा दरवाजा कट केला. एटीएम मशीनचा दरवाजा गॅस कटरच्या सहाय्याने कट करुन एटीएम मधील ११ लाख ५२ हजारांची रोकड काढून घेतली. या आगीत एटीएम मशीन पेटले. त्यानंतर परीसरातील एका नागरिकाने महाळुंगे एमआयडीसी पोलिसांना माहिती दिली.

गस्तीवर असलेले पोलीस शिपाई अमोल माटे व त्यांचे सहकारी सदर ठिकाणी पोहचले. हिताची कंपनीचे एटीएम चोरट्यांनी फोडल्याचे लक्षात आहे. त्यानंतर पोलीस हवालदार प्रकाश चापळे, पोलीस नाईक काळे , पोलीस शिपाई अमोल माटे , शिवाजी लोखंडे, गणेश गायकवाड, अशोक गभाले आदींनी येथून बाहेर पडण्याच्या मार्गावर ठिकठिकाणी नाकाबंदी केली. अमोल माटे व त्यांच्या सहकाऱ्यांना वाकी बाजूकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला वीटभट्टीच्या बाजूला एक काळी स्कार्पिओ थांबल्याचे दिसले. पोलिसांनी सदर गाडी अडवण्याचा प्रयत्न केला, मात्र भरधाव वेगात चोरट्यांनी पोलीस वाहनाला धडक देऊन मोटार चाकण कडे पलायन केले. पाठलाग करणाऱ्या पोलिसांनी चाकण आंबेठाण रस्त्यावर २ ठिकाणी कंटेनर आडवे लावून रस्ते बंद केले. रस्ता बंद केल्याने चोरटे पुन्हा माघारी फिरले. पोलीस मागावर असल्याने व रस्ते बंद असल्याने चोरट्यांनी झीत्राईमळा भागात सदर स्कॉर्पिओ गाडी एका गल्ली मध्ये नेली. पोलीस हवालदार बिराजदार व अमोल माटे यांनी याच गल्लीत पोलीस वाहन आणून उभे केले. त्यानंतर चोरट्यांनी गाडी सोडून पोबारा केला. सदर स्कॉर्पिओ मध्ये ५ ते ६ चोरटे असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी चोरट्यांना शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र ते अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. ११ लाख ५२ हजारांची रोकड चाकण पोलिसांच्या हवाली करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु होती.

### चाकण बाजारभाव: एकूण उलाढाल ५ कोटी १० लाख रुपये

# टोमॅटो, बटाटा व कारल्याची मोठी आवक; कांद्याची आवक व भाव स्थिर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये टोमॅटो, बटाटा व कारल्याची विक्रमी आवक झाली. गाजर, चवळी, वाटाणा, हिरवी मिरची, कोबी व टोमॅटोच्या भावात घसरण झाली. जनावरांच्या बाजारात बैल व जर्सी गाय यांच्या संख्येत वाढ झाली. एकूण उलाढाल ५ कोटी, १० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १,००० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहिली. कांद्याचा कमाल भावही ४,५०० रुपयांवरच स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक २,२५० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक २५० क्विंटलने वाढली. बटाट्याचा कमाल भाव ३,३०० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक २५ क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ५ क्विंटलने घटून लसणाचा कमाल भाव २८,००० रुपयांवरच स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३९५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयांपासून ते ७ हजार

छाया : रत्नेश शेवकरी





रुपयांपर्यंत भाव मिळाला. ओल्या भुईमुग शेंगांची ६५ क्विंटल आवक झाली. या शेंगांना ५,५०० रुपये कमाल भाव मिळाला.

**शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे –**

- कांदा - एकूण आवक - १,००० क्विंटल. भाव क्रमांक - १. ४,५०० रुपये, भाव क्रमांक २. ३,८०० रुपये, भाव क्रमांक ३. २,००० रुपये.
- बटाटा - एकूण आवक - २,२५० क्विंटल. भाव क्रमांक १. ३,३०० रुपये, भाव क्रमांक २. २,७०० रुपये, भाव क्रमांक ३. २,००० रुपये.

**फळभाज्या -** फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

- टोमॅटो - २७२ क्विंटल ( ३,००० ते ५,००० रू. ), कोबी - २४० क्विंटल ( २,००० ते २,५०० रू.), फ्लॉवर - २१५ क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), वांगी - ८५ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), भेंडी - ७८ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दोडका - ६२ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), कारली - ७६ क्विंटल ( २,५०० ते ३,५०० रु.), दुधीभोपळा - ५९ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), काकडी - ८४ क्विंटल ( १,००० ते २,००० रु.), फरशी - ३२ क्विंटल ( ५,००० ते ७,००० रु.), वालवड - ५६ क्विंटल ( ५,००० ते ८,००० रुपये), ढोबळी मिरची - १५२ क्विंटल ( ३,००० ते ५,००० रु.), चवळी - ३० क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु.), शेवगा - १८ क्विंटल ( ७,००० ते ९,००० रु.), गाजर - ११५ क्विंटल ( २,५०० ते ३,५०० रु.), गवार - ६८ क्विंटल ( ५,००० ते ७,००० ),.

**पालेभाज्या :** चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व भाज्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे -

- मेथी - एकूण १० हजार २०० जुड्या ( १,००० ते २,००० रुपये ), कोथिंबीर - एकूण २७ हजार ५०० जुड्या ( ५०० ते १,००० रुपये,), शेपू - एकूण ४ हजार २०० जुड्या ( ६०० ते ९०० रुपये ), पालक - एकूण ३,४५० जुड्या ( ६०० ते १,००० रुपये),.

**जनावरे :** चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ४५ जर्शी गाईपैकी ३५ गाईची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), ११० बैलांपैकी ९० बैलांची विक्री झाली.( १०,००० ते ४०,००० रु.), १३० म्हशीपैकी ११० म्हशींची विक्री झाली. ( २०,००० ते ८०,००० रु.), ८ हजार २०० शेळ्या - मेंढ्यापैकी ११,१३० शेळ्यांची विक्री झाली. ( २,००० ते १५,००० रु.) #रा

## आघाडीतील जागावाटप आज जाहीर होण्याची शक्यता

# काँग्रेस-शिवसेनेतील वादावर चर्चेतून पडदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**मुंबई :** महाविकास आघाडीच्या गोटातून महत्वाची बातमी समोर आली आहे. आज (२१ ऑक्टोबर) महाविकास आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद होणार आहे. या पत्रकार परिषदेत जागावाटप जाहीर होणार आहे. कोणता पक्ष किती जागांवर लढणार याचा निर्णय उद्याच्या पत्रकार परिषदेत जाहीर केला जाणार आहे. आमचं सगळं ठरलं आहे. त्यामुळं आज जागावाटप जाहीर करणार असल्याची माहिती शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी दिली.

दरम्यान, काल राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, जंयत पाटील, संजय राऊत आणि अनिल देसाई यांची बैठक झाली. या बैठकीनंतर अनिल देसाई यांनी याबाबतची माहिती दिली आहे. महाविकास आघाडीत जागावाटपाच्या मुद्यावरुन ठिणगी पडल्याची माहिती मिळाली होती. काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटात काही ठिकाणच्या जागांवर तिढा असल्याची माहिती मिळाली आहे. याच पार्श्वभूमीवर काल युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली होती. यावेळी माजी मंत्री अनिल परब देखील उपस्थित होते. मुंबईतील वाय बी सेंटरमध्ये त्यांनी भेट घेतली आहे. या भेटीनंतर शरद पवारांनी काँग्रेसच्या दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांशी फोनवरुन चर्चा केल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. विदर्भातील एकूण १२ जागांवर शिवसेनेच्या ठाकरे गटाने दावा सांगितला आहे. या १२जागांवर महाविकास आघाडीचा आमदार नाही. मविआचा आमदार नसलेल्याच १२ जागा आम्ही मागितल्या आहेत, असे ठाकरेंच्या शिवसेनेचे मत आहे. तर काँग्रेस हा पक्ष शिवसेनेला १२ जागा देण्याच्या मन:स्थितीत नाही. यावरुन मविआत ठिणगी पडल्याची चर्चा सुरु आहे.

महाविकास आघाडीत कुठलाही वाद नाही. १५ तास बसू पण तोडगा काढू असे मत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केलं आहे. काल सकाळी उद्धव ठाकरेंसोबत बैठक झाली आता पवार साहेब यांना भेटायला आलो असल्याचे राऊत म्हणाले. महाविकास आघाडीत सर्व काही सुरळीत सुरू आहे. कोणत्याही प्रकारचा वाद नसल्याचती माहिती शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी दिली आहे.

### मुख्यमंत्रिपदाचा चेहरा निवडणुकीनंतर

● महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण, असा प्रश्न पत्रकारांनी केला असता चेन्नीथला म्हणाले, महाविकास आघाडीच मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आहे. त्यामुळे निवडणुकीनंतरच आम्ही पुन्हा एकत्र बसून कोण मुख्यमंत्री बनणार, याचा निर्णय घेऊ. सध्या महाविकास आघाडीला बहुमत मिळावे हेच आमचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी सर्व पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मैदानात उतरले आहेत, असे चेन्नीथला यांनी स्पष्ट केले.

## महायुती आणि महाविकास आघाडीला धडा शिकवण्याचा इशारा

# जरांगे उतरणार निवडणुकीच्या रिंगणात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**जालना :** प्रत्येक मतदारसंघात मराठ्याचे एक लाख मतदान आहे. माझा विश्वासघात होऊ देऊ नका. मला एकटे पाडू नका, असे आवाहन करत मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतांना जरांगे यांनी महायुती आणि महाविकास आघाडीचा पानउतारा केला. उमेदवार दिले नाही दिले, तरी राजकीय पक्ष आनंदी होतील, असे ते म्हणाले.

मराठा समाजाला ओबीसी प्रर्वगातून आरक्षण द्यावे, सगेसोयऱ्यांच्या मुद्याचा शासनाच्या आदेशात उल्लेख करावा, अशी मागणी जरांगे केली. राज्यात आचारसंहिता लागण्याआधी सरकारने हा निर्णय घ्यावा, अशी मागणी जरांगे यांनी केली होती. निवडणुका जाहीर होत राज्यात आचारसंहिता लागू झाली. मनोज जरांगे पाटलांनी मराठा कार्यकर्त्यांशी संवाद साधताना सूरूवातीला माझी निवडणूक लढवण्याची इच्छा नाही, अशी भूमिका मांडली होती. मात्र नंतर जरांगेंनी तीन मुद्यात आपला विधानसभेचा प्लान सांगून टाकला. पहिला मुद्दा म्हणजे, जिथे निवडून येतील तिकडे उमेदवार उभं करणार, अशी घोषणा जरांगेंनी केली आहे. ज्या ठिकाणी एसटी आणि एससीच्या ज्या जागा राखीव आहेत, त्या ठिकाणी उमेदवार न देण्याचे जरागेंनी म्हटलं आहे. त्या कोणत्याही पक्षाचा उमेदवार असो, मग तिकडे महायुतीचा किंवा महाविकास आघाडीचा असो...जो आपल्या विचाराचा आहे त्याला लाखभरं मतदान फुकट देऊन निवडून आणायचं. आणि जिकडे आपण उमेदवार उभा करणार नाही, तिकडे आपण जो आपल्याला त्या ५०० रूपयाच्या बॉंडवर लिहून देईल, तुमच्या मागण्याशी मी सहमत आहे. त्यालाच निवडून द्यायचं नाही तर त्यांना पाडून टाकायचं, अशी भूमिका जरांगेंनी जाहीर केली आहे.

जरांगे पुढे म्हणाले, कुठे समीकरण जुळत ते मी बघत आहे. जर समीकरण नाही जुळले तर अडचण होईल. पण फॉर्म भरून ठेवा, मी २९ तारखेला म्हटलं मी फॉर्म काढ तर काढायचा. जवळपास ३६ मतदार संघ आहे, तिथे फक्त मराठ्यांच्या मतांवर निवडून येऊ शकतात. मी 3/4 दिवसात कुठे उमेदवार उभे करायचे या बाबत सांगतो असं जरांगे म्हणालेत.

# उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या मशाल चिन्हात बदल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** तीन वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडून शिवसेना पक्ष काढून घेतल्यानंतर निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह शिंदे यांना दिले होते. या वेळी आयोगाने ठाकरे यांना मशाल हे चिन्ह दिले होते. या चिन्हामध्ये ठाकरे यांनी काही बदल करण्याची मागणी केली होती. त्यात निवडणूक आयोगाने मान्यता दिली असून विधानसभा निवडणुकीपूर्वी हे नवे सुधारित चिन्ह देण्यात आले आहे.

ठाकरे गटाला मशालच चिन्ह कायम ठेवण्यात आले असून आईस्क्रीमच्या कोनासारखे वाटणारे चिन्ह आता बॅटरीसारखे दिसणार आहे. मशाल हातात धरण्याचा जो आकार होता, तो आईस्क्रीमच्या कोनासारखा वाटत होता. तो बदलून आता वरती पेटत्या ज्वाळा आणि खाली बॅटरीसारखा आकार देण्यात आला आहे. तसेच आतील भगवा रंग काढण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीवेळी ठाकरे यांच्या पक्षाच्या या चिन्हावरून विरोधकांनी खिल्ली उडविली होती. मशाल हे चिन्ह आईस्क्रीमच्या कोनासारखे दिसते असे विरोधकांनी म्हटले होते. यामुळे हा बदल करण्यात आला आहे.

नव्या सुधारित चिन्हामध्ये टॉर्च स्पष्टपणे दिसत आहे. यामुळे विधानसभा निवडणुकीत ईव्हीएमवरही टॉर्च सारखेच दिसणारे नवे निवडणूक चिन्ह दिसणार आहे.

# बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात भंगार विक्रेत्याला अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर रोजी रात्री हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर या प्रकरणात दररोज नवनवे खुलासे समोर येत आहेत. या घटनेत लॉरेन्स बिश्नोई टोळीचा सहभाग असल्याचीही माहिती समोर आली होती. या प्रकरणाचा तपास मुंबई पोलिसांची गुन्हे शाखा करत असून आतापर्यंत १० आरोपींना अटक करण्यात आली आहे.

. या आरोपीने १२ ऑक्टोबर रोजी बाबा सिद्दीकी यांची हत्या करणाऱ्या आरोपींना शस्त्र पुरवल्याचा आरोप आहे. भगवंत सिंग (३२) असं अटक करण्यात आलेल्या आरोपीच नाव असून तो नवी मुंबईत राहत होता.

## » Selected

### उपोषणकर्त्यांची तब्येत खालावली, रुग्णालयात उपचार सुरु

**हिंगोली :** हिंगोली जिल्ह्यात वीज पुरवठ्याच्या प्रश्नासोबतच रोहित्र वाटपातील गैरव्यवहाराची चौकशी करावी या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या डॉ. रमेश शिंदे यांची महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा सुरू असतानाच बेशुद्ध पडले. त्यांच्यावर हिंगोलीत खासगी रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे.

### माळी समाजाला पुरेसे प्रतिनिधी देण्याची मागणी

**नागपूर :** माळी समाजाची लोकसंख्या महाराष्ट्रात सुमारे दीड कोटी आहे. इतर प्रांतात ८ ते १० कोटी व पूर्ण भारतात एकूण माळी समाजाची संख्या १० ते १५ कोटी असावी. आज महाराष्ट्रात माळी समाजाची संख्या तीन नंबरवर आहे. एकेकाळी १९-२० आमदार निवडून यायचे. आता ५ ते ७ च्या वर आपले विधानसभा सदस्य नसतात. हे लक्षात घेता माळी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय माळी महासंघाचे विश्वस्त गोविंद वैराळे यांनी केली आहे. राज्यात किमान २० ते २५ आणि विदर्भात ४ ते ५ जागी माळी समाजाला प्रतिनिधित्व देण्याची मागणी वैराळे यांनी केली आहे.

### ज्योती मेटे यांना बीडमधून उमेदवारी

**मुंबई :** विधानसभा निवडणकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत.



सर्व राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात नेत्यांची इनकमिंग मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे दिसत आहे. शिवसंग्रामच्या नेत्या ज्योती मेटे यांनी आज राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला आहे. खा. सुप्रिया सुळे आणि शरद पवार यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. त्यांना पक्षाकडून बीडमधून उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा आहे.

### आमदार संतोष बांगर यांच्या विरोधात गुन्हा दाखल

**हिंगोली :** हिंगोलीचे शिवसेना ठाकरे गटाचे आमदार संतोष बांगर



यांच्याविरोधात आदर्श आचारसंहितेचा भंग केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल आहे. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना बाहेरगावी असणाऱ्या मतदारांना येण्या-जाण्यासाठी फोन पे द्वारे पैसे पाठवा, असे वक्तव्य त्यांनी केले होते. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आमदार संतोष बांगर यांना २४ तासाच्या आत खुलासा करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आज खुलासा सादर केल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आमदार संतोष बांगर यांच्या विरोधात आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी कळमनुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# समाजवादी गणराज्य पक्ष काँग्रेसमध्ये विलीन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. माजी आमदार आणि समाजवादी गणराज्य पक्षाचे संस्थापक अध्यक्ष कपिल पाटील यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. दिल्लीत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या उपस्थितीत कपिल पाटील यांनी प्रवेश केला आहे. यावेळी महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्निथला, प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड, सुनील केदार, सतेज पाटील उपस्थित होते. दरम्यान, काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर आता कपिल पाटील यांना गोरेगाव विधानसभा मिळण्याची शक्यता आहे.

शिक्षक आमदार कपिल पाटील यांनी जनता दलाला रामराम केल्यानंतर आणि समाजवादी गणराज्य पक्ष या नव्या पक्षाची स्थापना केली होती. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत त्यांनी नवीन पक्षाची स्थापना केली होती. मात्र, आता त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. महाविकास आघाडीमध्ये गोरेगाव किंवा वर्सोवा ही जागा काँग्रेसला सुटणार आहे. त्या जागेवर कपिल पाटील विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत.

आज आम्ही काँग्रेस पक्षात समाजवादी गणराज्य पक्ष विलीन केला असल्याचे कपिल पाटील म्हणाले. आज खर्गेंच्या निवासस्थानी माझ्या गळ्यात शाल घातली आहे. फॅसिझम विरुद्ध लढायचे आहे. फॅसिझम विरोधात राहुल गांधी लढत आहेत. आम्ही बिनशर्त काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. फॅसिझम विरोधात लढायचं हीच अट आहे. देशात संविधान वाचवण्यासाठी राहुल गांधींनी प्रदीर्घ लढा दिला असल्याचे कपिल पाटील म्हणाले.

# 'लाडकी बहिणीचा सहावा हप्ता डिसेंबरमध्ये' - आदिती तटकरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** लाडक्या बहिणीचा सहावा हप्ता डिसेंबरमध्ये देण्यात



येणार असल्याचा खुलासा महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी आज एक्सवर ट्विट करून केला आहे. विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर निवडणूक आयोगाकडून मतदारांवर थेट प्रभाव टाकणा-या आर्थिक योजना बंद करण्याच्या सूचना निवडणूक आयोगाकडून देण्यात आल्या आहेत. त्यानंतर महायुतीची महत्वाकांक्षी योजना असलेली लाडकी बहीण योजनेला सुद्धा तात्पुरता ब्रेक लागला आहे.

त्यामुळे लाडकी बहीण योजना बंद झाल्याची चर्चा रंगली. मात्र, आता महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी ट्विट खुलासा केला आहे. त्यांनी लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असल्याचे म्हटले आहे. अदिती तटकरे यांनी ट्विट करून म्हटले आहे की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरूच राहणार !! मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी जुलै २०२४ पासून सुरू झाली आहे.

या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील पात्र भगिनींना दरमहा १,५०० रुपये थेट त्यांच्या आधार लिंक केलेल्या बँक खात्यात जमा केले आहेत. शासनाने जुलै, ऑगस्ट, आणि सप्टेंबर २०२४ या महिन्यांसाठीचा लाभ आधीच पात्र भगिनींच्या खात्यात जमा केला आहे. तसेच ४ ते ६ ऑक्टोबर २०२४ दरम्यान ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांचा लाभ राज्यातील २ कोटी ३४ लाख पात्र भगिनींना देण्यात आला आहे. सर्व पात्र भगिनींना डिसेंबर महिन्याचा लाभ डिसेंबर महिन्यात देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## पक्ष प्रवेश...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



» **मुंबई :** माजी आमदार परशुराम उपरकर यांनी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्री येथे शिवसेनेत प्रवेश केला.

## न्यायपालिका क्षेत्रात AIची एंट्री

# ‘लेक्सलेगिस’ सोडविणार कायद्याचा गुंता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विविध खटल्याबाबत उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निकाल, प्रकरणाच्या अनुषंगाने झालेले संशोधन, तसेच विविध कायदेशीर बाबी शोधून काढणे ही मोठी अवघड बाब असते. त्यासाठी वकिलांना मोठा वेळ खर्च करावा लागतो. मात्र, आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या (एआय) सहाय्याने वकिलांचे हेच काम आता सोपे झाले आहे.

‘एआय’च्या क्षमता संशोधनाच्या पलीकडे विस्तारत आहे. कायदेशीर दस्तावेज स्कॅन करून त्याचे विश्लेषण करू शकते. तसेच उपलब्ध माहिती तपासून त्यातील विसंगतीदेखील नमूद करू शकते. ही बाब लक्षात घेत ‘लेक्सलेगिस’ने ‘लेक्सलेगिस.एआय’ हे एआय टूल तयार केले आहे. हे प्लॅटफॉर्म कायदेशीर व्यावसायिकांना समस्यांचे विशिष्ट समाधान आणि अचूक संदर्भ उपलब्ध करून देण्यात मदत करते. ज्यामुळे भारतातील न्यायालयांसाठी व्यापक खटल्यांची कागदपत्रे संकलित करण्यात प्रत्यक्ष मानवी हस्तक्षेप कमी होईल. या प्लॅटफॉर्मचा वापर कायदा क्षेत्रातील फर्म, सरकारी विभाग, कॉर्पोरेट कायदेशीर कंपन्या, एसएमई आणि स्वतंत्रपणे प्रॅक्टीस करत असलेल्या वकील आणि सनदी लेखापालांना करता येणार आहे. साकार एस. यादव यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या स्टार्टअपमध्ये विश्रुत श्रीवास्तव, प्रवीण सूद यांचादेखील मोलाचा वाटा आहे. ‘लेक्सलेगिस’ सुरू करण्यापूर्वी यादव यांनी राष्ट्रीय न्यायिक संदर्भ प्रणाली (एनजेआरएस)च्या सेंट्रल डेटा प्रोसेसिंग सेंटरचे (सीडीपीसी) नेतृत्व केले आहे.

देशातील न्यायालयांमध्ये प्रलंबित खटल्यांची संख्या लाखोंच्या घरात आहे. त्यामुळे पारंपरिक कायदेशीर संशोधन पद्धती अपुरी ठरत आहे. एआयचा वापर करत संशोधनाला लागणारा वेळ बराच कमी होतो. एआय-

### ‘लेक्सलेगिस.एआय’चे वैशिष्ट्ये


- कायदेशीर संशोधनात तांत्रिक अद्ययावतता
- वेळखाऊ कायदेशीर संशोधन काही सेकंदांत होणार
- सुमारे १० लाखांहून अधिक कागदपत्रांसह कायदेशीर डेटाद्वारे एलएलएमला समर्पित
- Askचा वापर करत कायदेशीर संशोधनाची त्वरित उत्तरे मिळणार

## हातातोंडाशी आलेली पिके भुईसपाट

# राज्यात परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**नागपूर :** परतीचा पाऊस राज्याच्या विविध भागांत पडत आहे. जोरदार बरसत असलेल्या या पावसामुळे शेतक-यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी हातातोंडाशी आलेली पिके भुईसपाट झाल्याचे पहायला मिळत आहे. राज्यात पुढील महिन्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून आचारसंहिता लागू झाली आहे. राज्यात आचारसंहिता लागू झाल्याने आता शेतक-यांना मदत मिळणार की नाही असा प्रश्न अनेकांच्या मनात उपस्थित होत आहे.

राज्याच्या विविध भागात मागील काही दिवसांमध्ये परतीच्या पावसामुळे झालेल्या शेतीच्या तसेच इतर नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, त्याचबरोबर नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाधिका-यांना दिले आहेत.

राज्यातील अमरावती, पुणे, नाशिक, कोल्हापूर, मराठवाडा आदी विविध भागातील विविध जिल्हे किंवा तालुक्यांमध्ये मागील काही दिवसांत मुसळधार पाऊस झाला. काही ठिकाणी वादळी वा-यासह पाऊस झाला. यामुळे अनेक ठिकाणी शेतपिकांचे नुकसान झाले आहे.

ब-याच ठिकाणी शेतात काढून ठेवलेल्या विविध प्रकारच्या पिकांचे नुकसान झाले आहे. काढलेली पिके भिजली आहेत. विशेषत: भात, सोयाबीन, तूर, कपाशी, ऊस आदी विविध प्रकारच्या पिकांसह फळबागांचेही नुकसान झाले आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरात दाना चक्रीवादळाची निर्मिती झाली आहे. या चक्रीवादळामुळे पुढील तीन ते चार दिवस महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांत पाऊस बरसणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महाराष्ट्रातील काही भागांत गारपीट होण्याची शक्यता सुद्धा वर्तवण्यात आली आहे. #रा

## तपास यंत्रणांना दहशतवाद्यांचे षडयंत्र असल्याचा संशय

# दिल्लीतील रोहिणी भागात भीषण स्फोट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्लीतील रोहिणी जिल्ह्यातील प्रशांत विहार परिसरात स्फोटाच्या आवाजाने परिसरातील लोक घाबरले आहेत. या घटनेनंतर दिल्ली पोलिसांनी घटनास्थळी कडक बंदोबस्त तैनात केला आहे. तसेच जिल्हा पोलिसांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले आहे. दरम्यान, 'एनएसजी'ची टीमही घटनास्थळी पोहोचली आहे. फॉरेन्सिक टीमने घटनास्थळाची पाहणी करून नमुने घेतले आहेत.

दिल्ली बॉम्बस्फोटाच्या तपासात 'एनएसजी'चा सहभाग होण्यापूर्वी रोहिणीच्या प्रशांत विहार परिसरात असलेल्या 'सीआरपीएफ' शाळेबाहेर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. घटनास्थळी पोहोचल्यानंतर 'एनएसजी'ने घटनास्थळ आपल्या ताब्यात घेतले आहे. फॉरेन्सिक म्हणजेच 'एफएसएल' टीम घटनास्थळी पोहोचली आणि नमुने घेतले. श्वानपथक पथकानेही घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला. याशिवाय काही वायरसारख्या वस्तूही जप्त करण्यात आल्या आहेत.



दिल्लीतील रोहिणी भागात स्फोट झाल्याने रस्ता काही काळ बंद करण्यात आला होता.

### दहशतवाद्यांचे कारस्थान

● या प्रकरणात दिवाळीपूर्वी दहशतवादी कारस्थान असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. दिल्लीतील बाजारपेठांमध्ये सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

दिल्ली प्रशांत विहारमधील 'सीआरपीएफ' शाळेबाहेर झालेल्या स्फोटाचा प्रत्यक्षदर्शी शशांक म्हणाला, "स्फोट झाला तेव्हा आम्हाला असे वाटले, की सिलिंडरचा स्फोट झाला आहे किंवा इमारत कोसळली आहे. एक मोठा ढग होता. येथे सुमारे १० मिनिटे धुराचे लोट होते. स्फोटामुळे दुकानांच्या काचा फुटल्या आणि होर्डिंग्स उन्मळून पडले. क्राइम ब्रँच, पोलिस ठाणे आणि जिल्हा न्यायालय जवळ असल्याने दिल्ली पोलिस पाच मिनिटांत येथे पोहोचले. कोणालाही दुखापत झाली नाही हे चांगले आहे."

दिल्लीतील रोहिणी जिल्ह्यातील प्रशांत विहार भागातील 'सीआरपीएफ' शाळेबाहेर रविवारी सकाळी सात वाजता स्फोट झाल्याची घटना उघडकीस आली. स्फोटापूर्वी दिल्ली पोलिस आणि दिल्ली अग्निशमन सेवा विभागाला याबाबत माहिती मिळाली होती. पोलिसांना घटनास्थळावरून काहीही मिळालेले नाही. स्फोटाच्या आवाजामुळे आजूबाजूच्या वाहनांच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या. दरम्यान, फॉरेन्सिक टीमने घटनास्थळावरून नमुने घेतले आहेत.

## » Selected

### तरुणाने पेटवले पूर्वाश्रमीच्या प्रेयसीला

**हैदराबाद :** आंध्र प्रदेशातील कडप्पा जिल्ह्यात एका तरुणाने आपल्या पूर्वाश्रमीच्या प्रेयसीला पेटवून दिले. पीडित मुलगी ११वीत शिकणारी विद्यार्थिनी असून ती ८० टक्के भाजली आहे. तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विघ्नेश असे आरोपीचे नाव असून, तो पीडितेला लहानपणापासून ओळखत असल्याचे पोलिसांनी सांगितले. शनिवारी दोघे भेटले आणि त्यांच्यात वाद झाला. यानंतर विघ्नेशने मुलीला पेटवून दिले.

### आयफोन १६ प्रोमध्ये समस्या

**नवी दिल्ली :** आयफोन १६ प्रो च्या वापरकर्त्यांनी बगमुळे फोनमध्ये समस्या आल्याची तक्रार केली आहे. वापरकर्त्यांच्या



मते, त्यांचे डिव्हाइस गोठत आहे आणि अचानक रीस्टार्ट होत आहे. अनेक आयफोन १६ प्रो वापरकर्त्यांनी Apple Support Community, Reddit आणि MacRumors वर ही समस्या नोंदवली आहे. सप्टेंबरमध्ये लाँच झाल्यापासून आयफोन १६ मॉडेलमधील समस्या नोंदवण्यात आल्या आहेत आणि अजूनही चालू आहेत. 'ॲपल'ने नुकतेच एक आयओएस अपडेटदेखील जारी केले; परंतु आयफोन प्रो १६ प्रो कधीही रीस्टार्ट न होण्याच्या समस्येचे निराकरण होऊ शकले नाही.

### अश्लील कृत्य करणाऱ्या दीडशे जणांना अटक

**हैदराबाद :** येथील एका पॉश भागात असलेल्या पबमध्ये तेव्हा खळबळ उडाली. पोलिसांच्या पथकाने छापा टाकून एकामागून




एक लोकांना अटक करण्यास सुरुवात केली. पोलिसांनी घटनास्थळावरून ४२ महिलांसह १०० हून अधिक जणांना अटक केली. हे सर्व पबमध्ये अश्लील कृत्य करीत होते, असा आरोप आहे. पब मालकालाही अटक करण्यात आली आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांच्या पथकाने शहरातील पॉश बंजारा हिल्स भागात असलेल्या 'टीओएस' पबवर छापा टाकला आणि अश्लील नृत्य सादरीकरणात सहभागी असलेल्या काही लोकांना अटक केली.

## "अधिक मुले जन्माला घाला" चंद्राबाबू नायडूंचा सल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंध्र प्रदेश :** आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी एका कार्यक्रमात बोलताना राज्यातील वृद्धांची वाढती लोकसंख्या लक्षात घेता जोडप्यांना अधिक मुले जन्माला घालण्याचा सल्ला दिला आहे. तसेच चंद्राबाबू नायडू यांनी यावेळी वृद्धांच्या वाढत्या संख्येवर चिंता व्यक्त करत वृद्धांची संख्या वाढण्याचा धोकाही नमूद केला. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी विशेषतः दक्षिणेकडील राज्यामधील कुटुंबांना अधिक मुले जन्माला घालण्याचे आवाहन केले आहे.

मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी म्हटलं की, "लोकसंख्या घटणे आणि तरुणांचे स्थलांतर राज्यासाठी धोकादायक ठरू



शकते. लोकसंख्या व्यवस्थापन अंतर्गत कायदा आणण्याचाही विचार सुरु असून यामध्ये मोठ्या कुटुंबांना प्रोत्साहन देण्याचा विचार आहे. अधिक मुले असलेल्या कुटुंबांना आम्ही प्रोत्साहन देण्याचा विचार करत आहोत. जोडप्यांना अधिक मुले जन्माला घालण्यासाठी प्रोत्साहित करत आहोत. दोनपेक्षा जास्त अपत्ये असलेल्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यास प्रतिबंध करणारा पूर्वीचा कायदा आम्ही रद्द केला आहे.

## शिव मंदिरातील मूर्तींची तोडफोड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भागलपूर :** बिहारमधील भागलपूर जिल्ह्यातील सनहौला पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सनहौला मार्केटमधील मंदिरात आज पहाटे समाजकंटकांनी मूर्तींची तोडफोड केली. या घटनेनंतर एकच गोंधळ उडाला. संतप्त लोकांनी मुख्य रस्ता अडवून बाजारपेठ बंद पाडली.

अधिकृत सूत्रांनी सांगितले, की सनहौला पोलिस ठाण्याच्या आवारात असलेल्या शिव मंदिरातील अनेक मूर्तींची विटंबना केल्याप्रकरणी पोलिस एका व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याची चौकशी करत आहेत. तो वेडा असल्याचे सांगितले जाते. अन्य आरोपींना पकडण्यासाठी पोलिस कारवाई करत आहेत. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने मुख्य रस्त्यावर आले आणि ठिकठिकाणी टायर जाळून निषेध व्यक्त केला. येथे व्यावसायिकांनी सनहौला बाजार बंद ठेवला आहे. संतप्त नागरिक पोलिस ठाण्यासमोर निदर्शने करत आहेत.

या घटनेमुळे निर्माण झालेला तणाव लक्षात घेता मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कहालगावचे उपविभागीय अधिकारी व पोलिस उपअधीक्षक घटनास्थळी पोहोचले असून ते लोकांची समजूत काढीत होते. दरम्यान, या प्रकरणातील दोषींना सोडले जाणार नाही, असे भागलपूरचे जिल्हा दंडाधिकारी डॉ. नवलकिशोर चौधरी यांनी सांगितले. एका व्यक्तीला अटक करण्यात आली असून तो वेडा असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.



पाटणा : भागलपूरमधील मंदिरात मूर्तींची तोडफोड झाल्यानंतर नागरिकांनी रस्त्यावर उतरून संताप व्यक्त केला.

## विमान कंपन्यांना आठवड्यात बॉंबस्फोटाच्या सत्तर धमक्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय विमान कंपन्यांना सध्या बॉम्बने उडवूच्या धमक्या येत आहेत. या आठवड्यात अशा सुमारे ७० धमकीच्या पोस्ट करण्यात आल्या. त्यापैकी ७० टक्के एकाच 'एक्स' खात्यातून आल्या. हे 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म एक्सवर एक निनावी आणि असत्यापित खाते आहे. त्याद्वारे गेल्या २ दिवसात इंडियन एअरलाइन्सच्या ४६ देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय फ्लाइटला धमकीच्या पोस्ट पाठवण्यात आल्या होत्या.

@adamlanza1111



नावाच्या 'एक्स हँडल'ने शुक्रवारी रात्री १२ आणि शनिवारी ३४ धमकीच्या पोस्ट केल्या. भारताव्यतिरिक्त, या वापरकर्त्याने अमेरिकन एअरलाइन्स, जेट ब्लू आणि एअर न्यूझीलंड सारख्या आंतरराष्ट्रीय वाहकांनादेखील धमक्या दिल्या आहेत. हे संशयास्पद एक्स खाते शनिवारी दुपारपर्यंत सक्रिय होते. यानंतर, एलोन मस्क यांच्या मालकीच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे ते निलंबित करण्यात आले. एअर इंडिया, विस्तारा, इंडिगो, आकासा एअर, अलायन्स एअर, स्पाईसजेट आणि स्टार एअरला या खात्यातून धोका होता. स्टार एअरला त्यांच्या ४ फ्लाइट्ससाठी धमक्या मिळाल्या आणि उर्वरित प्रत्येकी ५ फ्लाइटसाठी असे संदेश पाठवण्यात आले.

संशयास्पद 'एक्स' खात्यावरून केलेल्या धमकीच्या पोस्टमध्ये असेच संदेश होते. त्यात लिहिले होते, 'तुमच्या ५ विमानांमध्ये बॉम्ब आहेत. कोणीही वाचणार नाही. घाई करा आणि विमान बाहेर काढा. जेव्हा या पोस्ट केल्या गेल्या, तेव्हा काही उड्डाणे हवेत होती किंवा काहींनी आधीच त्यांचा प्रवास पूर्ण केला होता. सध्या या संशयास्पद 'एक्स' खात्याची चौकशी केली जात आहे आणि त्याच्या वापरकर्त्याचा शोध घेतला जात आहे.

दरम्यान, 'ब्युरो ऑफ सिव्हिल एव्हिएशन सिक्युरिटी' (बीसीएएस) च्या अधिकाऱ्यांनी शनिवारी विमान कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. सूत्रांनी ही माहिती दिली. एक दिवस आधी ३० हून अधिक विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या होत्या.

## भाविकांची उसळली गर्दी

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**तिरुअनंतपूरम :** शबरीमला मंदिरात पाच दिवसांचा पूजा महोत्सव सुरू झाला आहे. त्यामुळे भाविकांच्या गर्दीचा सागर उसळला आहे.

## आदिवासी महिलेच्या मदतीमुळे पंतप्रधान मोदी भावुक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भुवनेश्वर :** देशाच्या विविध भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील लोकांचे अतोनात प्रेम दिसून येत आहे. अलीकडेच ओडिशातील सुंदरगढमध्ये एक खास घटना घडली. त्यामुळे पंतप्रधान मोदी भावुक झाले. ही घटना पाहून मोदी यांनी ट्वीट करून आपल्या भावना व्यक्त केल्या. ही घटना लोक त्याच्या कामांची आणि प्रयत्नांची प्रशंसा करतात याचे प्रतीक आहे. मोदी यांच्या या भावनिक प्रतिसादातून त्यांची लोकांप्रती असलेली आपुलकी आणि कृतज्ञताही दिसून येते.

भाजप खासदार बैजयंत जय पांडा यांनी घटना शेअर केली आणि एका आदिवासी



महिलेने पंतप्रधान मोदी यांच्या कामांबद्दल आनंद आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी १०० रुपये देण्याची तयारी कशी दर्शवली याचे वर्णन केले. ही महिला इतकी भावुक झाली होती, की तिने ही भेटवस्तू देताना कोणताही संकोच दाखवला नाही. ओडिशाच्या सुंदरगड जिल्ह्यात भाजप सदस्यत्व नोंदणी मोहिमेच्या पार्श्वभूमीवर, या आदिवासी महिलेने मोदी यांचे आभार मानण्यासाठी शंभर रुपये घेण्याचा आग्रह धरला. पांडा म्हणाले, की जेव्हा मी महिलेला सांगितले, की हे आवश्यक नाही, तरीही ती तिच्या म्हणण्यावर ठाम राहिली. शेवटी मी तिच्या इच्छेला मान देऊन १०० रुपये स्वीकारले.

पांडा यांचे ट्वीट आणि महिलेच्या भावना पाहून पंतप्रधान मोदीही भावुक झाले. त्यांनी ट्वीटमध्ये लिहिले, की मी या आपुलकीने खूप भारावून गेलो आहे.

## फुटबॉल सामन्यानंतर गोळीबार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मिसिसिपी :** अमेरिकेतील मिसिसिपी राज्यात खळबळजनक घटना घडली आहे. मध्य मिसिसिपीमध्ये दोन बंदूकधारी इसमांनी जमावावर गोळीबार केला आहे. या गोळीबारात तीन जणांचा मृत्यू झाला असून आठ जण जखमी झाले आहेत. पोलिसांनी या घटनेची माहिती देताना सांगितलं की फुटबॉलच्या सामन्यानंतर ही गोळीबाराची घटना घडली आहे. सामना संपल्यानंतर बरेच जण मैदानावर जल्लोष करत होते. त्याचवेळी त्यांच्यावर हा हल्ला झाला. मिसिसिपीमधील ले क्सगटपासून तीन किमी दूर होम्स काउंटी कन्सोलिडेटेड स्कूलमध्ये ही गोळीबाराची घटना घडली आहे.

होम्स काउंटीचे शेरिफ विली मार्च या घटनेची माहिती देताना म्हणाले, कार्यक्रमादरम्यान काही लोकांमध्ये मोठं भांडण झालं होतं. त्या भांडणातूनच ही गोळीबाराची घटना घडली आहे. २०० ते ३०० जण मैदानात जल्लोष करत होते. त्याचवेळी गोळीबाराचा आवाज आल्यानंतर सर्वजण सैरावैरा धावू लागले.

## जगभरात भारतात पेट्रोल महाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**काठमांडू :** कच्च्या तेलाच्या घसरणीमुळे जगभरात पेट्रोल स्वस्त झाले आहे. नेपाळमध्येही भारताच्या तुलनेत पेट्रोलचे सरासरी दर स्वस्त आहेत. भारताच्या तुलनेत श्रीलंका वगळता शेजारील देशांमध्ये भूतान, बांगला देश, चीन, पाकिस्तान आणि म्यानमारमध्ये प्रति लिटर ३७ रुपयांनी पेट्रोल स्वस्त आहे. कारण, ब्रेंट क्रूड पुन्हा एकदा ७० डॉलर प्रतिपिंपाच्या जवळ आले आहे. दुसरीकडे, डबल्यूटीआय क्रूड ७० डॉलरच्या खाली आहे.

पाकिस्तानमध्ये पेट्रोल २६ रुपयांनी स्वस्त झाले आहे. 'ग्लोबल पेट्रोल प्राईसेस.



कॉम' वर प्रसिद्ध झालेल्या १४ ऑक्टोबरच्या किंमत सूचीनुसार, भारतात पेट्रोलची सरासरी किंमत १००.९७ रुपये प्रति लिटर आहे, तर पाकिस्तानमध्ये ते ७४.७५ रुपये प्रति लिटर आहे. नेपाळमध्ये पेट्रोल ९८.७५ रुपये प्रति लिटर आणि चीनमध्ये ९४.९६ रुपये प्रति लिटरने विकले जात आहे. बांगला देशात एक लिटर पेट्रोलची किंमत फक्त ८५.०९ रुपये प्रति लिटर आहे. म्हणजे भारतापेक्षा सुमारे १५ रुपये स्वस्त. म्यानमारमध्ये ते आणखी स्वस्त आहे. येथे पेट्रोलचा दर ८३.७० रुपये आहे. भारताच्या तुलनेत भूतानमध्ये पेट्रोल ३७ रुपयांनी स्वस्त आहे. आपल्या शेजारी राष्ट्रांमध्ये श्रीलंका हा एकमेव देश आहे जिथे पेट्रोल भारतापेक्षा महाग आहे. येथे पेट्रोलचा दर १०८.०६ रुपये प्रतिलिटर आहे.

रशिया-युक्रेन युद्धात कच्च्या तेलाची किंमत १३० डॉलर प्रतिपिंपावर पोहोचली होती. नंतर ती ९० डॉलर प्रतिपिंपापर्यंत खाली आली. इस्रायल-हमास युद्धामुळे क्रूड ८० ते ९५ डॉलर प्रति बॅरलच्या दरम्यान जात राहिले. आता ही घसरण गेल्या आठवडाभरापासून सुरूच आहे.

## पंजाबी वंशाचे दहा जण विजयी

# कॅनडाच्या राजकारणात पुन्हा पंजाबी झेंडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**टोरंटो :** कॅनडाच्या राजकारणात पुन्हा एकदा पंजाबी यशाचा झेंडा फडकला आहे. निवडणुकीत पंजाबी वंशाचे दहा उमेदवार विजयी झाले आहेत. त्यामुळे कॅनडाच्या राजकारणात समुदायाचा प्रभाव आणखी मजबूत झाला आहे.

हा विजय अशा वेळी आला आहे, जेव्हा इंडो-कॅनडियन लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. निकराच्या लढतीत, 'एनडीपी' आणि 'कंझर्व्हेटिव्ह' यांनी अनुक्रमे ४६-४५ जागा जिंकल्या, तर ग्रीन पार्टीने दोन जागा जिंकल्या. हे यशस्वी उमेदवार विविध राजकीय पार्श्वभूमीतून आलेले आहेत. ते न्यू डेमोक्रॅटिक पार्टी (एनडीपी) आणि 'कंझर्व्हेटिव्ह पार्टी' या दोन्ही पक्षांचे प्रतिनिधित्व करतात. आरोग्यसेवा सुधारणा, आर्थिक विकास, हवामान कृती आणि स्थलांतरित समुदायांना अधिक समर्थन यासारख्या मुद्द्यांसाठी त्यांनी विविध व्यासपीठांवर भूमिका बजावली आहे.

या निवडणुकीतील विजयाला कॅनडाच्या राजकारणात दक्षिण आशियाई लोकांचे, विशेषतः पंजाबी लोकांचे प्रतिनिधित्व वाढवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल म्हणून पाहिले जाते. त्याने कॅनडाच्या सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या समुदायाला सशक्त बनवले आहे. बीसीच्या राजकीय परिदृश्यातील एक प्रमुख व्यक्तिमत्व काहलॉन यांनी गृहनिर्माण आणि हवामान बदलाशी संबंधित धोरणे पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. दुसरे उल्लेखनीय विजेते राज चौहान हे ब्रिटिश कोलंबियाच्या विधानसभेचे अध्यक्ष आहेत. ते विक्रमी सहाव्यांदा विजयी झाले असून यापूर्वी त्यांनी २०१३ ते २०१७ या काळात विधानसभेचे सहाय्यक उपसभापती आणि २०१७ ते २०२० पर्यंत उपसभापती म्हणून काम पाहिले आहे.

### ॲटर्नी जनरल जिंकले

● 'एनडीपी'चे उमेदवार रवी परमार लँगफोर्ड हायलँडमधून, सुनीता धीर व्हँकुव्हर लंगारा, रिया अरोरा बर्नाबी ईस्टमधून आणि हरविंदर कौर संधू व्हर्नन मोनाश्रीमधून विजयी झाले. हरविंदर दुसऱ्यांदा येथून विजयी झाले आहेत. ॲटर्नी जनरल निक्की शर्मादेखील व्हँकुव्हर हेस्टिंग्जमधून पुन्हा विजयी झाले आहेत.



#रा



'ऋषभ पंतला एक दिवस आधीच गुडघ्याला लागले होते. तो दुखापतग्रस्त असल्याने आम्ही ड्रेसिंग रुममध्ये चर्चा केली होती की त्याच्याबरोबर धावताना त्याच्या दुखापतीचाही विचार करायचा. पण जेव्हा मी शॉट खेळला, तेव्हा मी १०० धावांच्या जवळ होतो, त्यामुळे मी दोन धावा घेऊ असा कॉल दिला.'

'पण पहिली धाव पूर्ण केल्यानंतर मला लगेचच जाणीव झाली की त्याच्या गुडघ्यामध्ये वेदना आहेत. त्यामुळे मी लगेचच त्याला दुसरी धाव नाकारण्यासाठी आवाज दिला. मी माझा हात उंचावला होता, मी थांब, थांब म्हणून ओरडत होतो, पण तो पाहातच नव्हता. सुदैवाने तो वाचला.'

— सर्फराज खान

### इमर्जिंग आशिया चषक २०२४ : वर्माच्या ४४ धावा, अंशुलचे ३ बळी

# भारताने पाकिस्तानला हरवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



०३ बळी

अंशुल कंबोज

**नवी दिल्ली :** भारतीय संघाने ट्वेंटी-२० एमर्जिंग टीम आशिया कप २०२४ स्पर्धेत विजयी सलामी दिली. भारताने अटीतटीच्या लढतीत पाकिस्तानला पराभवाची चव चाखवली. ७ धावांनी विजय मिळवून भारताने स्पर्धेची दणक्यात सुरुवात केली. तिलक वर्माच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारत 'अ' संघाने Pakistan Shaheens संघाला धुतले.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. भारतीय सालामीवीर अभिषेक शर्मा व प्रभ सिमरन सिंग यांनी पहिल्या विकेटसाठी ६८ धावांची भागीदारी केली. सातव्या षटकात अभिषेक शर्मा (३५) झेलबाद झाला. प्रभसिमरन सिंग (३६) देखील माघारी परतला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या तिलक वर्माने फटकेबाजी सुरूच ठेवली. त्याला नेहाल वढेराची साथ मिळाली आणि १२ व्या षटकात भारताची धावसंख्या १०० पार पोहोचवली. १४ व्या षटकात वधेरा (२५) बाद झाला, तर आयुष बदोनी (२) धावा करू शकला.

१९ व्या षटकातील पहिल्या चेंडूवर कर्णधार तिलक (४४) बाद झाला आणि भारताच्या खेळीला ब्रेक लागला. त्यानंतरच्या फलंदाजांना फारशी चांगली कामगीरी करता आली नाही. भारताने २० षटकांत १८३ धावा धावफलकावर लावल्या. भारताच्या १८३ धावांचा पाठलाग करण्यास उतरलेल्या पाकिस्तानने पहिल्याच षटकात विकेट गमवली. अंशुल कंबोजने पाकिस्तानी कर्णधार मोहम्मद हॅरीसला त्रिफळाचीत केले. यासिर खानने पाकिस्तानची एक बाजू लावून धरली, परंतु दुसऱ्या बाजूने विकेट पडत होत्या. यासिर व कासिम अक्रमच्या जोडीने ५४ धावांची भागीदारी केली. पण, ९व्या षटकात यासिरला (३३) रमनदीप सिंग सुंदर एकहाती झेल करत बाद केले. त्याच षटकात कासिमही (२७) बाद झाला.

५ व्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या अरफत म्हिनासने पाकिस्तानचा डाव सावरण्यास सुरूवात केली. त्याला अब्दुल समदची साथ मिळली. पण, रसिख सलामने अरफत म्हिनासला बाद केले. १९व्या षटकातील पहिल्या चेंडूवर कंबोजने अब्दुलला बाद केले आणि सामना भारताच्या बाजूने फिरला. भारताने अवघ्या ७ धावांनी स्पर्धेतील पहिला सामना आपल्या नावे केला.

## शमी ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या मालिकेत पुनरागमन करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मोहम्मद शमी गेल्या वर्षभरापासून पायाच्या दुखापतीमुळे मैदानाबाहेर आहे. न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्याआधी झालेल्या पत्रकार परिषदेत कर्णधार रोहित शर्माने ' शमी पुर्णत: तंदुरूस्त झाल्याशिवाय त्याला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर घेऊन जाऊ शकत नाही', असे वक्तव्य केले. परंतु न्यूझीलंडविरूद्धच्या पहिल्या सामन्यानंतर शमी एम चिन्नस्वामी मैदानावर भारतीय सहाय्यक प्रशिक्षकांसोबत सराव करताना पहायला मिळाला.

आज भारताने न्यूझीलंडविरूद्धचा पहिला कसोटी सामना गमावला. ज्यामध्ये फलंदाजांसोबत गोलंदाजांनाही अपयश आले. सामना संपल्यानंतर शमी भारतीय सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर यांना नेटमध्ये गोलंदाजी करताना दिसला. शमीचा हा सरावाचा व्हिडीओ शोशल मीडियावर पहायला मिळत आहे. त्यामुळे शमी नोव्हेंबर मध्ये सुरू होणाऱ्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफी स्पर्धेमध्ये पुनरागम करणार अशा चर्चा आहे.



## न्यूझीलंडने ३६ वर्षांनी भारताला मायदेशात हरवले

**बेंगळुरू :** न्यूझीलंड क्रिकेट संघाने भारत दौऱ्याची सुरुवात विजयाने केली आहे. न्यूझीलंडने भारताविरुद्ध बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यात ८ विकेट्सने विजय मिळवला. न्यूझीलंडने कसोटीमध्ये तब्बल ३६ वर्षांनंतर भारतात विजय मिळवला आहे. यापूर्वी १९८८ साली मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर न्यूझीलंडने अखेरच्या वेळी १३६ धावांनी विजय मिळवला होता. त्यामुळे हा विजय न्यूझीलंडसाठी विशेष ठरला आहे. न्यूझीलंडने रविवारी विजय निश्चित करत तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात भारताने दुसऱ्या डावात न्यूझीलंडसमोर विजयासाठी १०७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना चौथ्या दिवस अखेर न्यूझीलंडने ४ चेंडू खेळताना शून्य धावा केल्या होत्या. त्यामुळे पाचव्या दिवशी त्यापुढे न्यूझीलंडने खेळायला सुरुवात केली. मात्र दिवसाच्या दुसऱ्या चेंडूवर जसप्रीत बुमराहने कर्णधार टॉम लॅथमला शुन्यावर बाद करत न्यूझीलंडला मोठा धक्का दिला. मात्र त्यानंतर डेवॉन कॉनवेने विल यंगसोबत डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र १७ धावांवर असताना कॉनवेलाही बुमराहने १३ व्या षटकात पायचीत पकडले. त्यामुळे त्यालाही माघारी जावे लागले. परंतु, त्यानंतर विल यंगला रचिन रविंद्रने चांगली साथ दिली. रचिनने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा स्विकारला होता. या दोघांनी नाबाद अर्धशतकी भागीदारी करत न्यूझीलंडच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. न्यूझीलंडने २७.४ षटकात १०७ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. विल यंग ४५ धावांवर आणि रचिन रविंद्र ३९ धावांवर नाबाद राहिला. तत्पुर्वी, या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेला, परंतु भारतीय संघ पहिल्या डावात ४६ धावांवर सर्वबाद झाला.

## के.एल. राहुलने सोडली लखनऊची साथ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावापूर्वी सर्व संघांनी तयारी सुरू केली आहे. संघात कायम ठेवणाऱ्या खेळाडूची यादीसाठी ३१ ऑक्टोबरपर्यंतची मुदत देण्यात आली असून त्यात आता केवळ १३ दिवस उरले आहेत. दरम्यान, लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार केएल राहुलने लखनऊची साथ सोडल्याची बातमी येत आहे. मेगा लिलावापूर्वी संजीव गोयंका यांना तो मोठा धक्का असू शकतात. यावेळी फ्रँचायझींना आयपीएलमध्ये जास्तीत जास्त ६ खेळाडूंना कायम ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे.

आता आयपीएल रिटेन्शन लिस्ट सादर करण्यासाठी केवळ १३ दिवस उरले आहेत. सर्व फ्रँचायझी त्यांच्या रणनीतीनुसार खेळाडूंना कायम ठेवण्याबाबत बोलत आहेत. दरम्यान एका वृत्तानुसार, केएल राहुलला लखनऊ संघा सोबत जायचे नाही. दुसरीकडे, लखनऊ सुपर जायंट्स फ्रँचायझी देखील त्याला कायम ठेवू इच्छित नाही. रिपोर्टनुसार, कोणते खेळाडू कायम ठेवावेत, त्यांची किंमत काय असावी याबाबत मतभेद आहेत. त्यामुळे केएल राहुल फ्रँचायझी सोडून मेगा लिलावात जाऊ शकतो.

केएल राहुल २०२२ च्या हंगामात लखनऊ सुपर जायंट्स संघात सामील झाला होता. त्याने संघासाठी ३८ सामने खेळले असून त्यात त्याने १४१० धावा केल्या आहेत. त्याच्या नेतृत्वाखाली, संघ २०२२ आणि २०२३ हंगामात प्लेऑफसाठी पात्र ठरला.

### श्रेयस अय्यर असं का म्हणतोय?

# कसोटीचं स्वप्न अजूनही पाहतोय, नाहीतर मी पण...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** काही वर्षीपूर्वी श्रेयस अय्यर हा भारतीय कसोटी संघातील मधल्या फळीचा महत्त्वाचा दुवा मानला जात होता, परंतु गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिका दौऱ्यात त्याची कामगिरी खुपच खराब होती. हीच गोष्ट इंग्लंडविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेत पाहायला मिळाली आणि त्यानंतर देशांतर्गत क्रिकेटमध्येही तो फार काही करू शकला नाही. याच कारणामुळे त्याला बांगलादेशविरुद्ध नुकत्याच झालेल्या दोन सामन्यांच्या कसोटी संघातून वगळण्यात आले. अय्यरची न्यूझीलंड मालिकेसाठीही निवड झालेली नाही. अशा परिस्थितीत हा खेळाडू रणजी करंडक खेळत असून त्याने शनिवारी महाराष्ट्राविरुद्ध उत्कृष्ट खेळी खेळली आणि तीन वर्षांनंतर प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये शतक झळकावले.

मुंबईकडून रणजी ट्रॉफीमध्ये खेळणाऱ्या श्रेयस अय्यरने महाराष्ट्राच्या गोलंदाजांची धुलाई करत १९० चेंडूत १४२ धावांची खेळी केली. यादरम्यान श्रेयसच्या बॅटमधून १२ चौकार आणि चार षटकारही आले. या खेळीपूर्वी श्रेयसने २०२१ साली कानपूरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये शेवटचे शतक झळकावले होते, जो त्याचा पदार्पण कसोटी सामना होता.

शतकीय खेळीनंतर श्रेयस अय्यरने पत्रकारांशी संवाद साधला आणि म्हणाला, "बऱ्याच कालावधीनंतर पुनरागमन करून शतक झळकावणं हे विशेष आहे. साहजिकच दुखापतींमुळे थोडा नाराज झालो होतो, पण बराच काळ लोटला आहे. आता शतक झळकावल्यानंतर ही नक्कीच चांगली भावना आहे."

## झिम्बाब्वेने टी-२० मध्ये ठोकल्या तब्बल २८६ धावा!

**नवी दिल्ली :** झिम्बाब्वे क्रिकेट संघाने ट्वेंटी-२० मध्ये इतिहास रचला आहे. झिम्बाब्वेने सेशेल्सविरूद्ध काल ट्वेंटी-२० मध्ये तिसरी सर्वाधिक धावसंख्या उभारली. नुकत्याच



झालेल्या भारत बांगलादेश ट्वेंटी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारताने बांगलादेशविरूद्ध २९७ धावा केल्या व ट्वेंटी-२० मध्ये सर्वाधिक धावा करणारा भारत दुसरा संघ ठरला. तर झिम्बाब्वेने २८ चौकार १८ षटकारांतच्या मदतीने सेशेल्सविरूद्ध २८७ धावा करून ट्वेंटी-२० सर्वाधिक धावांच्या यादित तिसरे स्थान मिळवले आहे. सेशेल्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि झिम्बाब्वेने सामन्याची सुरूवात स्पोटक फलंदाजीने केली. ब्रायन बेनेट व तडिवानाशे मरुमणीने पहिल्या विकेटसाठी तब्बल १४२ धावांची भागिदारी केली. पण, दहाव्या षटकात मरुमणी झेलबाद होवून परतला आणि भागिदारी तुटली. मरुमणीने १० चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ३७ चेंडूत ८६ धावा केल्या. त्यानंतर १३ व्या षटकात ब्रायन बेनेट माघारी परतला आणि ९ धावांनी त्याचे शतक हुकले. त्यानंतरच्या फलंदाजांनी फटकेबाजी सुरूच ठेवली आणि २० षटकांच्या अखेरीस झिम्बाब्वे २८६ धांचा टप्पा गाठला. २८७ धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या सेशेल्स संघाची सुरूवात खराब झाली. सेशेल्स ६ षटकांमध्ये २ विकेट्स गमावत केवळ १८ धावा केल्या. ७व्या षटकात पावसाने हजेरी लावली आणि डकवर्थ-लुईस-स्टर्न पद्धतीनुसार झिम्बाब्वे संघाला ७६ धावांनी विजयी घोषित करण्यात आले.

### ऋतुराज गायकवाड ऑन फायर! अवघ्या ८७ चेंडूत ठोकलं शतक

# महाराष्ट्राचं मुंबईविरुद्ध दमदार पुनरागमन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** रणजी ट्रॉफी २०२४ स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत मुंबई विरुद्ध महाराष्ट्र संघात शरद पवार क्रिकेच अकादमी, बीकेसी येथे सामना सुरू आहे. या सामन्यात पहिल्या डावात मुंबईचे वर्चस्व दिसले, पण दुसऱ्या डावात महाराष्ट्राने दमदार पुनरागमन केले आहे. महाराष्ट्राकडून कर्णधार ऋतुराज गायकवाडने वादळी शतक झळकावले आहे. त्याला सचिन धसने भक्कम साथ दिली असून दीडशतकी भागीदारी केली आहे.

ऋतुराजने तिसऱ्या दिवशी (२० ऑक्टोबर) मुंबईच्या शार्दुल ठाकूरच्या गोलंदाजीवर पुल शॉट खेळत दुहेरी धाव घेतली आणि त्याच्या शतकाला गवसणी घातली.

ऋतुराजने १४ चौकार आणि २ षटकार मारत अवघ्या ८७ चेंडूत त्याचे हे शतक पूर्ण केले आहे. त्याचे हे प्रथम श्रेणी क्रिकेटमधील सातवे शतक आहे. त्याने ही शतकी खेळी करताना त्याला साथ दिलेल्या सचिनने अर्धशतक पूर्ण केलेलं असून तोही शतकाच्या जवळ आहे. महाराष्ट्राने दुसऱ्या डावात ४४ षटकात १ बाद १९४ धावा केल्या आहेत. यावेळी ऋतुराज ११० धावांवर, तर सचिन ८० धावांवर खेळत आहे. मात्र अद्याप महाराष्ट्र संघ १२१ धावांनी पिछाडीवर आहे. दरम्यान, या शतकाने ऋतुराजने पुन्हा एकदा भारतीय संघातील पुनरागमनासाठी दावेदारी ठोकली आहे.

या सामन्यात प्रथम फलंदाजी केलेल्या महाराष्ट्राने पहिल्या डावात ३१.४ षटकात सर्वबाद १२६ धावाच केल्या होत्या. त्यांच्याकडून निखिल नाईक (३८) आणि अझिम काझी (३६) यांनाच ३० धावांचा टप्पा पार करता आला होता. ऋतुराजही शुन्यावर बाद झाला होता. मुंबईकडून मोहित अवस्थी आणि शम्स मुलानी यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या होत्या. त्यानंतर मुंबईने पहिल्या डावात दमदार फलंदाजी कराताना १०३.१ षटकात सर्वबाद ४४१ धावा केल्या आणि ३१५ धावांची आघाडी घेतली.

मुंबईकडून पहिल्या डावात युवा फलंदाज आयुष म्हात्रे याने २३२ चेंडूत १७६ धावांची मोठी खेळी केली होती.

## कसोटीत ९९ धावांवर बाद होणारा पंत हा चौथा यष्टिरक्षक

**नवी दिल्ली :** भारताविरुद्ध बंगळुरू येथे सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडला विजयासाठी १०७ धावांचे लक्ष्य मिळाले आहे. एम चिन्नास्वामी



स्टेडियमवर शनिवारी झालेल्या दुसऱ्या डावात भारताने सर्वबाद ४६२ धावा केल्या. या कसोटी सामन्यात भारतीय संघ पहिल्या डावात ४६ धावांवर बाद झाला. प्रत्युत्तरात न्यूझीलंडने ४०२ धावा केल्या आणि ३५६ धावांची आघाडी घेतली. न्यूझीलंडविरुद्धच्या बंगळुरू कसोटीत ऋषभ पंतचे शतक हुकले. पंत ९९ धावा करून बाद झाला. कसोटीत ९९ धावांवर बाद होणारा तो जगातील चौथा आणि दुसरा भारतीय यष्टीरक्षक आहे. बंगळुरू कसोटीतील चौथ्या दिवसातील टॉप रेकॉर्ड्स... भारताच्या दुसऱ्या डावात ऋषभ पंत ९९ धावा करून बाद झाला. विल्यम ओ'रुर्केच्या चेंडूने बॅटची कड घेतली आणि स्टंपवर आदळला. कसोटीत ९९ धावांवर बाद होणारा पंत हा जगातील चौथा आणि दुसरा भारतीय यष्टिरक्षक आहे. कसोटीत ९९ धावांवर बाद होणारा न्यूझीलंडचा ब्रेंडन मॅक्युलम हा जगातील पहिला यष्टिरक्षक ठरला आहे.

## विराट कोहलीने एबी डिव्हिलियर्सला लिहिले पत्र

■ राष्ट्रै संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताचा स्टार क्रिकेटर विराट कोहलीने दक्षिण आफ्रिकेचा माजी फलंदाज एबी डिव्हिलियर्ससाठी पत्र लिहिले आहे. डिव्हिलियर्सचा आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समावेश झाल्यानंतर कोहलीने हे पत्र लिहिले आहे. डीव्हिलियर्सचा बुधवारी इंग्लंडचा महान खेळाडू ॲलिस्टर कुक आणि भारताच्या नीतू डेव्हिडसह आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समावेश करण्यात आला.

हे पत्र आयसीसीने जारी केले आहे, ज्यामध्ये कोहलीने आयपीएल संघ रॉयल चॅलेंजर्स बंगलोर (RCB) च्या त्याच्या माजी सहकाऱ्याचे कौतुक केले आहे.

कोहलीने लिहिले, 'तु तुझ्या जागेसाठी पूर्णपणे पात्र आहेस. शेवटी, हॉल ऑफ फेम तुमच्या खेळावरील प्रभावाचे प्रतिनिधित्व करतो आणि तुझे योगदान खरोखरच मोठे आहे. लोक नेहमीच तुमच्या क्षमतेबद्दल बोलत असतात आणि ते योग्यही आहे. मी ज्यांच्यासोबत खेळलो आहे त्यात तू सर्वात प्रतिभावान क्रिकेटर आहेस, तू नक्कीच नंबर वन आहेस.

### प्रो कबड्डी लीग ११ वा हंगाम

# पुणेरीची विजयी सुरुवात; हरियाणावर मात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**हैदराबाद :** पंकज मोहिते आणि मोहित गोयत (प्रत्येकी चार गुण) यांनी चढाईत केलेल्या चमकदार कामगिरीनंतर गौरव खत्रीने (सात गुण) बचावात दाखवलेल्या चपळाईच्या जोरावर गतविजेत्या पुणेरी पलटण संघाने प्रो कबड्डी लीगच्या ११ व्या हंगामाला विजयी सुरुवात केली. शनिवारी झालेल्या लढतीत त्यांनी गतउपविजेत्या हरियाणा स्टीलर्स संघाला ३५-२५ अशा फरकाने नमवले.

हैदराबादच्या गचिबोवली इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या सामन्याच्या पहिल्या सत्रात दोन्ही संघांनी सावध सुरुवात केली. मात्र, १३व्या मिनिटाला पुणेरी संघाने हरियाणावर पहिला लोण चढवत १३-७ अशी आघाडी घेतली. मध्यंतराला पुणेरी संघाकडे १९-१३ अशी आघाडी होती.

पहिल्या सत्रात पुणेरीकडून अस्लम ईनामदार, पंकज आणि मोहित गोयत यांनी चमक दाखवली. दुसऱ्या सत्रात हरियाणा संघाने आपला खेळ उंचावला. मात्र, पुणेरी संघाने सामन्याला दोन मिनिटे शिल्लक असताना हरियाणावर दुसरा लोण चढवत विजय निश्चित केला. त्यापूर्वी, दिवसाच्या पहिल्या सामन्यात तमिळ थलायवाजने यजमान तेलुगू टायटन्स संघाला ४४-२९ असे पराभूत केले.

मध्यंतराला तमिळकडे २०-१७ अशी आघाडी होती. दुसऱ्या सत्रात तमिळ संघाने आपला खेळ आणखी उंचावला आणि तेलुगूला सामन्यात पुनरागमनाची संधी दिली नाही. तमिळ संघाने सामन्यात तेलुगूवर दोन लोण चढवले.

तमिळकडून नरेंदर होशियार आणि सचिन (१० गुण) यांनी चढाईत चमक दाखवली. साहिलने (५ गुण) बचावात चांगली कामगिरी केली. तेलुगूकडून पवन सेहरावत (१० गुण) आणि विजय मलिक (९ गुण) यांनाच झुंज देता आली.